❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती बुधवार, दि. ३० सप्टेंबर २०२६ ❖ पाने : ८ ❖ अंक : २७५ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com Epaper - www.sandhyaepaper.com www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक संध्या

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या यूट्युब चॅनलला सबस्क्राईब करा

SUBSCRIBE

www.sandhyaepaper.com

4x400m रिलेमध्ये सुवर्णपदकावर कोरलं नाव

भारतीय वाघिणींचा 'गोल्डन रन'!



■ मुंबई (दै. संध्या)

भारतीय महिला संघाने ४x४०० मीटर रिलेमध्ये ३ मिनिटे २९.६९ सेकंदांची वेळ नोंदवत सुवर्णपदक जिंकले. आशियाई क्रीडा स्पर्धेतील हे भारताचे सहावे सुवर्णपदक आहे. यासह भारताने सलग सहाव्यांदा ५० पदके जिंकली.

यापूर्वी मंगळवारी, गुलवीर सिंगने ५००० मीटरमध्ये कांस्यपदक जिंकून पदकांची हॅटट्रिक पूर्ण केली. त्याने ही शर्यत १३ मिनिटे ४२.७५ सेकंदात पूर्ण करून असे करणारा पहिला भारतीय पुरुष धावपटू ठरला. यापूर्वी त्याने १०,००० मीटर आणि १५०० मीटरमध्ये रौप्यपदक जिंकले होते.

नीरू धांडानेही महिलांच्या ट्रॅप शूटिंगमध्ये सुवर्णपदक जिंकून इतिहास रचला. १० दिवसांपूर्वी फ्लूमुळे रुग्णालयात दाखल झालेली नीरू, या स्पर्धेत सुवर्णपदक जिंकणारी पहिली भारतीय महिला ठरली. याव्यतिरिक्त, भारताने ४x१०० मीटर मिश्र रिलेमध्ये कांस्यपदक जिंकले. संघाने ही शर्यत ४१.०६ सेकंदात पूर्ण केली.

नीरूचे प्रशिक्षक म्हणाले, "ध्येयावर लक्ष केंद्रित कर" : दहा दिवसांपूर्वी, जेव्हा नीरूला फ्लू झाल्यामुळे रुग्णालयात दाखल करण्यात आले होते, तेव्हा ती पाच दिवस काहीही खाऊ किंवा पिऊ शकली नव्हती. तिचे प्रशिक्षक, मनशेर सिंग यांनी तिला तिचा आजार विसरून पूर्ण ताकदीने खेळण्यासाठी प्रोत्साहित केले.

विजयानंतर नीरू म्हणाली, "मनशेर सर फक्त म्हणाले, जे काही घडले ते विसर आणि ध्येयावर लक्ष केंद्रित कर, आणि मी अगदी तेच केले."



भारताचे पाचवे सुवर्णपदक; नेमबाजीतील दुसरे गोल्ड : २०२६ च्या आशियाई क्रीडा स्पर्धेतील भारताचे हे पाचवे सुवर्णपदक असून, वैयक्तिक प्रकारातील हे पहिलेच सुवर्णपदक आहे. भारताची एकूण पदकांची संख्या ४७ वर पोहोचली आहे; यात ५ सुवर्ण, २१ रौप्य आणि २१ कांस्य पदकांचा समावेश आहे.

नेमबाजांनी भारतासाठी दुसरे सुवर्णपदक जिंकले आहे. याआधी त्यांनी एक सुवर्ण, आठ रौप्य आणि चार कांस्य पदके जिंकली होती. नेमबाजी प्रकारात आतापर्यंत एकूण १४ पदके जिंकली गेली आहेत.

४x१०० मीटर मिश्र रिलेमध्ये कांस्यपदक : भारताने ४१.०६ सेकंदांच्या वेळेसह ४x१०० मीटर मिश्र रिलेमध्ये कांस्यपदक जिंकले. चीनने ४०.७८ सेकंदांच्या वेळेसह सुवर्णपदक, तर थायलंडने ४०.८७ सेकंदांच्या वेळेसह रौप्यपदक पटकावले.

गुरिंदरवीर सिंगने भारताला दमदार सुरुवात करून दिली आणि स्नेहाने तोच वेग कायम ठेवला. थायलंडच्या बूनसनने अनिमेशला मागे टाकले, पण हरिताने अंतिम टप्प्यात जोरदार धाव घेत भारताला पदक मिळवून दिले.

पूजाने महिलांच्या उंच उडीत कांस्यपदक जिंकले : पूजाने १.८४ मीटर उंची पार करत महिलांच्या उंच उडीत कांस्यपदक जिंकले. १.८७ मीटर उंचीवरील तिचे तिन्ही प्रयत्न अयशस्वी ठरले.

पुरुषांच्या ४x४०० मीटर रिलेमध्ये कांस्यपदक : महिलांच्या सांघिक सुवर्णपदकानंतर, पुरुष संघाने सुवर्णपदक जिंकण्याच्या आशेने या स्पर्धेत प्रवेश केला, परंतु त्यांना केवळ कांस्यपदक मिळवता आले. जपानने सुवर्णपदक आणि कतारने रौप्यपदक जिंकले. भारतासाठी, मनु टी. आणि विशाल टी.के. यांनी दुसऱ्या आणि चौथ्या टप्प्यात दमदार कामगिरी केली, परंतु संघ जपान आणि कतारची बरोबरी करू शकला नाही. भारतीय संघात धर्मवीर चौधरी, मनु टी., जय कुमार आणि विशाल टी.के. यांचा समावेश होता.

देव मीणाने राष्ट्रीय विक्रम प्रस्थापित केला : पुरुषांच्या पोल व्हॉल्टमध्ये, देव कुमार मीणाने ५.५० मीटर उडी मारून स्वतःचाच राष्ट्रीय विक्रम सुधारला, परंतु तो सातव्या स्थानी राहिला. कुलदीप कुमार ५.३५ मीटरसह दहाव्या स्थानी राहिला.

बॉक्सिंगच्या दोन अंतिम फेऱ्या, नरेंद्रने कांस्यपदक पटकावले: महिलांच्या ६५ किलो वजनी गटात, परवीनने चीनच्या ली शूचा ५-० ने पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला. आता तिचा सामना चायनीज तैपेईच्या चेन निएन-चिनशी होईल. पुरुषांच्या 80 किलो गटात अंकुश पंघालने उझबेकिस्तानच्या फजलिद्दीन एर्किनबोएव्हचा 4-1 असा पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला.

थोडक्यात...

साखरेला ५० रुपये हमीभाव द्या : राजू शेट्टी

हुबळी : दैनिक संध्या

आगामी ऊस गळीत हंगामाच्या पार्श्वभूमीवर केंद्र व राज्य सरकारच्या धोरणांविरोधात ऊस उत्पादक शेतकरी रस्त्यावर उतरला आहे. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रमुख तथा माजी खासदार राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र आणि कर्नाटक या दोन्ही राज्यांतील शेतकरी संघटनांनी आज (29 सप्टेंबर) कर्नाटकातील हुबळी येथे केंद्रीय अन्न व नागरी पुरवठामंत्री प्रल्हाद जोशी यांच्या निवासस्थानाबाहेर अभूतपूर्व असे बेमुदत धरणे आंदोलन सुरू केले आहे. दोन राज्यांतील हजारो ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी मंत्र्यांच्या घरासमोरच थेट रस्त्यावर ठिय्या मारल्याने प्रशासनाची मोठी धावपळ उडाली आहे. साखरेचा हमीभाव वाढवणे, मोलॅसिसचे दर निश्चित करणे आणि उसाच्या गळीत हंगामाची तारीख पुढे ढकलणे या मागण्यांसाठी हे आंदोलन पुकारण्यात आले आहे. "केंद्र सरकारने आमच्या मागण्यांवर तातडीने निर्णय न घेतल्यास या आंदोलनाची दिशा अधिक तीव्र आणि आक्रमक केली जाईल," असा कडक इशारा राजू शेट्टी यांनी दिला आहे.

माजी अग्निवीरांना नोकरीत आरक्षण

मुंबई : दैनिक संध्या

राज्यातील 256 तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर केल्यानंतर आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली राज्य मंत्रिमंडळाची महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत प्रामुख्याने राज्यातील दुष्काळी परिस्थिती, पाणीपुरवठा आणि विविध उपाययोजनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच, दुष्काळ जाहीर न झालेल्या उर्वरित तालुक्यांमधील शेतकऱ्यांनाही दिलासा व मदत देण्याच्या अनुषंगाने या बैठकीत महत्त्वपूर्ण विचारविनिमय झाला. या मंत्रिमंडळ बैठकीत एकूण 10 महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले असून, त्यामध्ये महाराष्ट्रातील माजी अग्निवीरांना शासकीय नोकरीत 10 टक्के समांतर आरक्षण देण्याचा मोठा निर्णय समाविष्ट आहे. याअंतर्गत माजी अग्निवीरांना 'गट-क' मधील गणवेशधारी सेवांच्या पदांवर नियुक्ती दिली जाणार आहे. याशिवाय, कोल्हापूर येथील उच्च न्यायालयाच्या खंडपीठासाठी 459 नवीन पदांच्या निर्मितीला मंजुरी आणि राज्यात लॉजिस्टिक पार्क उभारण्यासारख्या अनेक महत्त्वाच्या निर्णयांवरही आजच्या बैठकीत शिक्कामोर्तब करण्यात आले. माजी अग्निवीरांना 10 टक्के आरक्षण: सैन्य दलातून चार वर्षांच्या सेवेनंतर निवृत्त झालेल्या माजी अग्निवीरांना राज्य शासनाच्या 'गट-क'मधील गणवेशधारी सेवांच्या पदांवर 10 टक्के समांतर आरक्षण देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. महाराष्ट्र वैरण विकास धोरण जाहीर: राज्यातील पशुधनासाठी चाऱ्याची उपलब्धता निश्चित करण्यासाठी हे धोरण जाहीर करण्यात आले आहे.

उरलेल्या सर्व दुष्काळग्रस्त तालुक्यांचा समावेश करणार : मुख्यमंत्री फडणवीस

■ मुंबई (दै. संध्या)



राज्यातील दुष्काळाच्या तीव्रतेवरून आणि काही तालुके दुष्काळी यादीतून वगळल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेल्या संतापाची गंभीर दखल राज्य सरकारने घेतली आहे. "पहिल्या टप्प्यात 265 तालुक्यांची घोषणा झाल्यानंतर राहिलेल्या आणि खरोखर पिके करपलेल्या सर्वच तालुक्यांचा दुष्काळग्रस्त यादीत समावेश करण्याचा मोठा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला आहे. निकषांच्या तांत्रिक अडचणींमुळे कोणत्याही शेतकऱ्यावर अन्याय होऊ देणार नाही," अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. तसेच, कार्यकाळ पूर्ण करून परतणाऱ्या पहिल्या बॅचमधील अग्निवीरांना महाराष्ट्र पोलीस दल आणि तत्सम सुरक्षा दलांमध्ये विनापरीक्षा थेट सामावून घेण्याचा ऐतिहासिक निर्णयही राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आल्याचे मुख्यमंत्र्यांनी पत्रकार परिषदेत जाहीर केले.

दुष्काळी यादीच्या विस्ताराबाबत सविस्तर माहिती देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, "यंदा राज्यात अत्यंत विचित्र नैसर्गिक परिस्थिती निर्माण झाली आहे. पहिल्या दोन महिन्यांत अतिवृष्टी झाली आणि नंतरच्या दोन महिन्यांत पावसाने पूर्णपणे पाठ फिरवली. यामुळे पिके करपली असली तरी अनेक तालुके 'ट्रिगर-१' च्या सरासरीच्या तांत्रिक निकषांत बसू शकले नाहीत."

"एखाद्या महसूल मंडळात चांगला पाऊस झाल्यामुळे संपूर्ण तालुक्याची सरासरी फुगलेली दिसते आणि दुष्काळग्रस्त भाग यादीतून सुटतो, हे निदर्शनास आले आहे. त्यामुळे आता केवळ तालुका पातळीवर न थांबता थेट महसूल मंडळ स्तरावर जाऊन प्रत्यक्ष शेतातील परिस्थिती तपासली जाईल."

"कॅबिनेट उपसमितीला यासंदर्भात पूर्ण अधिकार देण्यात आले आहेत. ज्या ज्या भागात पिके जळून खाक झाली आहेत, त्या सर्व भागांना विशेष बाब म्हणून दुष्काळाचे सर्व १२ फायदे व सवलती लागू केल्या जातील. एकाही शेतकऱ्याला मदतीपासून वंचित ठेवले जाणार नाही."

शहरी भागाच्या तुलनेत ग्रामीण भागात स्तनपानाचं प्रमाण जास्त, शहरी स्थिती अत्यंत भयावह - तुकाराम मुंढे

■ मुंबई (दै. संध्या)



अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी पत्रकार परिषद घेत विविध मुद्द्यांवर भाष्य केलं आहे. अन्न व औषध प्रशासन विभागानं आतापर्यंत 22 रेग्युलेशन आणली आहेत, तर 11 ऑर्डर काढल्या आहेत. त्या ऑर्डरचा परिणाम पाहायला मिळतोय, असं मुंढे म्हणाले.शाळांबाबत आपण ऑर्डर काढली होती ती 22 महिने ते 18 वर्ष मुलांसाठी ऑर्डर काढली होती. आता 22 महिन्यांच्या आतल्या मुलांचं काय? यासाठी आज काढण्यात आलेली ऑर्डर नवजात बालकांसाठीची आहे. जी 2 वर्षापर्यंतची लहान मुले आहेत त्यांच्यासाठी आहे, असं तुकाराम मुढे यांनी म्हटलं.

2 वर्षांच्या खालील मुलांना पॅकेजमधून दिला जाणारं प्रत्येक उत्पादन जे असेल. त्यात शिशु फॉर्म्युला, शिशु दूधअन्न, यासह इतर गोष्टी असतात. पॅक बंद पारंपरिक शिशु अन्न 6 महिन्यानंतर दोन वर्षापर्यंत दिलं जातं. 6 महिन्यांपर्यंत आईचेच दूध शिशुला द्यावे, असं तुकाराम मुंढे म्हणाले. पुरवठादार, ब्रँड मालक, ई कॉमर्स विक्रेते या सगळ्यांना ऑर्डर लागू राहील, असं देखील त्यांनी सांगितलं.

गेल्या काही महिन्यात राज्यभरात आम्ही याबाबत तपास केला आहे. आईचं दूध सर्वोत्तम दूध अशा प्रकारची सूचना शिशु प्रॉडक्ट्स वर पुढील बाजूला हवी ती अनेक ठिकाणी दिसली नाही. त्यामुळं मुलांच्या आरोग्यवर परिणाम होतोय. अन्न कोणत्या वेळापासून द्यावं हे सांगणारी सूचना देखील त्यात नाही. इशारा सूचना देखील आढळल्या नाहीत. ही सूचना आवश्यक असणार आहे. बेसिक तत्व या ऑर्डर मागे आहे ते म्हणजे पॅकेजमध्ये शिशुला हे अन्न कधी दिले जावे यांची माहिती देणे गरजेचं आहे.भारतात यामागे दोन कायदे आहेत, असं तुकाराम मुंढे यांनी म्हटलं.

फॉर्म्युला मिल्कला बंदी नाही, पण नियम पाळणे गरजेचं आहे. हेल्थ वर याचा इम्पॅक्ट कसा होतो याचा डेटा आमच्याकडे आहे. बालकांना आहार चुकीच्या पद्धतीने जात आहे. 6 महिन्याखालील मुलांचे आईच्या दुधाचे स्तनपानाचे प्रमाण पाच वर्षात 63.7 टक्क्यांवरून 55 टक्क्यांपर्यंत आलं आहे. शिशुच्या जन्मानंतर पहिले 6 महिने आईचेच दूध द्यायचं असतं ते कमी झालंय, असं तुकाराम मुंढे यांनी म्हटलं. राज्यातील शहरी भागात 52 टक्के स्तनपान केलं जात तर ग्रामीण भागात 75 टक्के स्तनपानाचे प्रमाण आहे. यामध्ये शहरी भागाच्या तुलनेत ग्रामीण भागातील स्थिती चांगली आहे. डिलेव्हरी झाल्यानंतर 1 तासात स्तनपान झालं पाहिजे. मात्र याची आकडेवारी कमी होत चालली आहे. याचाच अर्थ असा आहे की 50 टक्के महाराष्ट्र मधील माता मुलं जन्मलेल्या नंतर तासाभरात दूध पाजत नाही. डॉक्टर व्यवस्थित माहिती देत नाहीत असा याचा अर्थ होतो, असं तुकाराम मुंढे यांनी म्हटलं.

तुकाराम मुंढे यांनी म्हटलं की या सगळ्याचा परिणाम आरोग्यावर होत आहे. वयोगट 10 ते 12 वर्ष पाहिला तर 35 टक्के बीपी उच्च रक्तदाबाचे प्रमाण दिसतंय.10 ते 19 वयोगट पाहिला तर मधुमेहचं प्रमाण 12.3 टक्के आहे, अशी माहिती तुकाराम मुंढे यांनी दिली.

कमी पावसामुळे रब्बी हंगामाचे आव्हान

कृषिमंत्री भरणेंची केंद्राकडे १,००० कोटींची मागणी

■ मुंबई (दै. संध्या)



महाराष्ट्रातील अनेक भागांत यंदा कमी आणि असमान पाऊस झाल्याने आगामी रब्बी हंगामात शेतकऱ्यांसमोर अनेक अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे. जमिनीतील ओलावा कमी असल्याने रब्बी पिकांच्या उत्पादनावर परिणाम होण्याची शक्यता लक्षात घेऊन महाराष्ट्र सरकारने केंद्राकडे विशेष उपाययोजनांची मागणी केली आहे. कृषी यांत्रिकीकरणासाठी अतिरिक्त 500 कोटी रुपये, सूक्ष्म सिंचनासाठी 500 कोटी रुपये आणि 10 लाख रब्बी ज्वारी बीज मिनी किट्स उपलब्ध करून देण्याची मागणी राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी केंद्र सरकारकडे केली.

राष्ट्रीय कृषी संमेलन-रब्बी अभियान 2026 च्या दुसऱ्या दिवशी केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण मंत्री शिवराजसिंह चौहान यांच्या अध्यक्षतेखाली परिषद झाली. या परिषदेत महाराष्ट्रातील सध्याची पावसाची परिस्थिती, रब्बी हंगामाची तयारी आणि शेतकऱ्यांना आवश्यक असलेल्या मदतीबाबत कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी महाराष्ट्राची भूमिका मांडली.

परिषदेला केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण राज्यमंत्री रामनाथ ठाकूर आणि भागीरथ चौधरी, केंद्रीय कृषी सचिव अतीश चंद्रा, भारतीय कृषी अनुसंधान परिषदेचे महासंचालक डॉ. एम. एल. जाट यांच्यासह विविध राज्यांचे कृषिमंत्री, वरिष्ठ अधिकारी, कृषी क्षेत्रातील वैज्ञानिक आणि संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

महाराष्ट्रातील काही भागांमध्ये कमी पावसामुळे शेतकरी अडचणीत आहेत. या पार्श्वभूमीवर केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी महाराष्ट्राचा पाहणी दौरा करण्याचे ठरवले आहे. हा दौरा लवकरात लवकर करावा, अशी मागणी दत्तात्रय भरणे यांनी केली. केंद्र सरकारने केवळ कागदोपत्री आढावा न घेता शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन प्रत्यक्ष परिस्थिती पाहावी आणि त्यानुसार आवश्यक मदत द्यावी, अशी भूमिका त्यांनी मांडली. महाराष्ट्रातील मोठ्या प्रमाणावर शेती पावसावर अवलंबून आहे. यंदा अनेक भागांत पावसाचे प्रमाण कमी राहिले, तर काही ठिकाणी पावसात मोठे खंड पडले. त्यामुळे जमिनीतील ओलावा कमी झाला आहे. रब्बी हंगामात पिकांची निवड करताना उपलब्ध पाणी आणि जमिनीतील ओलावा यांचा विचार करणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांना याबाबत योग्य आणि वेळेवर मार्गदर्शन मिळणे गरजेचे असल्याचे भरणे यांनी सांगितले.

या परिस्थितीचा परिणाम हरभरा, गहू, रब्बी ज्वारी, करडई आणि इतर तेलबियांच्या उत्पादनावर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे हवामान, पाण्याची उपलब्धता आणि जमिनीची स्थिती लक्षात घेऊन शेतीचे नियोजन करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

एका बाजुला दुष्काळ! दुसऱ्या बाजुला वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस

■ मुंबई (दै. संध्या)



राज्यात एका बाजुला दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. राज्यातील बहुतांश भागात पावसानं दडी मारल्यामुळं शेतकऱ्यांची पिकं करपून गेली आहे. असं असतानाच सध्या दुसरीकडे मुंबईत मात्र, सध्या वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस सुरु आहे. मुंबईच्या पश्चिम उपनगरात सुरु असलेल्या जोरदार पावसामुळे जोगेश्वरी पश्चिम वीरा देसाई रोड पाण्याखाली गेला आहे. वीरा देसाई रोडवर दीड ते दोन फूट पाणी भरले आहे. रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पाणी भरल्यामुळे वाहन चालकांना मोठी कसरत करावी लागत आहे. तर या मुसळधार पावसाचा विमान सेवेवर देखील परिणाम झाला आहे. मुंबईतील हवाई सेवा अचानक झालेल्या मुसळधार पावसामुळे आणि सोसाट्याच्या वाऱ्यामुळे विस्कळीत झाली आहे. अनेक विमानांना विलंब झाला आहे. काही विमाने दुसऱ्या मार्गाने वळवण्यात आली आहेत.

मुंबईच्या पश्चिम उपनगरात तासाभरापासून मुसळधार पाऊस सुरु आहे. या जोरदार पावसामुळे अंधेरी सबवे पाण्याखाली गेला आहे. अंधेरी सबवे मध्ये दोन ते तीन फूट पाणी भरल्यामुळे अंधेरी सबवे मागील एक तासापासून वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे. अंधेरी सबवे वाहतुकीसाठी बंद केल्यामुळे अंधेरी पश्चिम एस. व्ही रोड परिसरात मोठी वाहतूक कोंडी निर्माण झाली आहे. रस्त्यावर वाहनांच्या लांबच लांब रांगा पाहायला मिळत आहे. तर सबवे मध्ये भरलेलं पाणी काढण्यासाठी मुंबई महानगरपालिकेकडून जनरेटरच्या माध्यमातून पाणी काढले जात आहे. वाहतूक सुरळीत करण्यासाठी वाहतूक पोलिसांकडून देखील युद्ध पातळीवर प्रयत्न केला जात आहे. अंधेरी सबवे मध्ये भरलेल्या पाण्यात ओमीनी कार आणि पोलिसांच्या बॅरिकेट वाहून गेल्या आहेत.

गेल्या एक तासभरापासून मुंबईत झालेल्या मुसळधार पावसामुळे आणि सोसाट्याच्या वाऱ्यामुळे अनेक ठिकाणी झाडे कोसळल्याच्या घटना देखील घडल्या आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, फिल्म सिटीमध्ये अनेक ठिकाणी झाडे पडली आहेत. दरम्यान, कोणतीही जीवितहानी झाल्याचे वृत्त नाही. वादळी वारा आणि मुसळधार पावसामुळं वाहतुकीवर देखील मोठा परिणाम झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. एका बाजुला विमानसेवा विस्कळीत झाली आहे. तर दुसऱ्या बाजूला रोडवरील वाहतूक देखील संथ गतीने सुरु आहे. मोठ्या प्रमाणात ट्रॅफिक असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. अंधेरी सब वे पाण्याखाली गेल्याने वाहतुकीसाठी तो रोड बंद करण्यात आला आहे.

थोडक्यात पण महत्वाचे



चाकणला नवीन गॅस पाईपलाईन जोडणीचा दिमाखात शुभारंभ

चाकण : दैनिक संध्या

चाकण नगरपरिषद प्रभाग क्रं. अकरा मधील श्रीरामनगर येथे गटनेते, नगरसेवक साहेबराव कड यांच्या विशेष प्रयत्नातुन व पाठपुराव्याने पूर्ण झालेल्या महाराष्ट्र नॅंचरल गॅसच्या पाईपलाईन जोडणीचा मोठ्या दिमाखात माजी आमदार दिलीप मोहिते यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी पुणे जिल्हा परिषदेचे सदस्य गणेश आरगडे, चाकण नगरपरिषदेचे विरोधी पक्षनेते प्रकाश भुजबळ, नगरसेवक आकाश जाधव, धीरज मुटके, सागर बनकर, नगरसेविका ॲड. वर्षा शेवकरी, विजया तोडकर, तृप्ती जगनाडे, करण सोनवणे, तसेच चाकण मंडल उपाध्यक्ष माऊली मुंगसे, उदयोजक दत्तात्रय जाधव, ॲड. सुयोग शेवकरी, विजय भोंडवे आदींसह विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर, ग्रामस्थ, महिला व तरुण कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी सुनील कापसे व निलेश तोरवणे यांच्या घरी नवीन कनेक्शन शेगडी प्रज्वलित करून या जोडणीचा मोहिते यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. यावेळी दिलीप मोहिते यांनी नगरसेवक साहेबराव कड यांच्या कामाचे कौतुक केले. भविष्यकाळात लागणारे सर्व सहकार्य निश्चित केले जाईल, असे आश्वासनही मोहिते यांनी यावेळी कार्यकर्त्यांना दिले. माऊली मुंगसे यांनी सूत्रसंचालन केले. अजय मनसुक यांनी आभार मानले.



रेखाकला परीक्षेत १८२ विद्यार्थ्यांचा सहभाग

चाकण : दैनिक संध्या

स्व. आ. सुरेशभाऊ गोरे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, चाकण येथे घेण्यात आलेल्या शासकीय रेखाकला एलिमेंटरी व इंटरमिजिएट परीक्षेत १८३ विद्यार्थ्यांनी भाग घेतला. संस्थेचे अध्यक्ष विकास गोरे यांच्या हस्ते परीक्षा केंद्राचे उद्घाटन झाले. यावेळी ज्ञानवर्धिनी विद्यालयाच्या प्राचार्या प्रमिला गोरे, भामा इंग्लिश मीडियम स्कूलच्या प्राचार्या माधुरी गोरे, स्व. आ. सुरेशभाऊ गोरे विद्यालयाचे प्राचार्य सचिन आभाळे, केंद्र संचालक नीता शेवकरी, कला शिक्षक गणेश काळे, दत्तात्रय लिंभोरे, वैशाली राऊत, राजेंद्र वाघमारे, तनुजा चव्हाण, कार्तिकी बोर्डे आदी उपस्थित होते. परीक्षा केंद्रावर एलिमेंटरी ड्रॉईंग ग्रेड परीक्षेतील वस्तुचित्र व स्मरणचित्र हे पेपर नियोजित वेळेत सुरळीतपणे पार पडले. परीक्षा केंद्रावर एकूण १८२ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली असल्याचे प्राचार्या प्रमिला गोरे यांनी सांगितले. परीक्षेचे नियोजन व आयोजन यशस्वीरीत्या पार पाडल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष विकास गोरे व प्राचार्या प्रमिला गोरे, कला शिक्षक गणेश काळे यांनी सर्वांचे कौतुक केले.



विद्यार्थांनी अभ्यास आणि शिक्षणावर लक्ष केंद्रित करावे : रविंद्र पाटील

नीरा : दैनिक संध्या

कोणाला अधिकारी व्हायचे असेल, शिक्षण क्षेत्रात काम करायचे असेल किंवा समाजसेवा करायची असेल, तर शिक्षण हेच एकमेव माध्यम आहे. जे तुम्हाला त्या पदापर्यंत पोहोचवू शकते. शिक्षणाचा हा प्रवास सुरळीत राहावा यासाठी सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांच्या या वयात चुका होऊ शकतात. पण एका चुकीवर दुसरी चूक झाकण्याचा प्रयत्न केला, तर तुम्ही अडचणीत सापडाल आणि मानसिक तणावात राहाल. म्हणून अभ्यासावर आणि शिक्षणावर लक्ष केंद्रित करा. असा सल्ला जेजुरीचे पोलिस निरीक्षक रविंद्र पाटील यांनी विद्यार्थ्यांना दिला. नीरा (ता.पुरंदर) येथील महात्मा गांधी विद्यालय व किलाचंद कनिष्ठ महाविद्यालय, सौ.लिलावती रिखवलाल शहा कन्या विद्यामंदीर तसेच रयत इंग्लिश मिडीयम स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने पदमविभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील यांची १३९ वी जयंती समारंभानिमित्त राधाकृष्ण मंगल कार्यालयात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून जेजुरी पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक रविंद्र पाटील बोलत होते. यावेळी रयतचे माजी सहाय्यक विभागीय अधिकारी शंकरराव पवार ,रयतचे पश्चिम विभागाचे सदस्य लक्ष्मणराव चव्हाण, रयतचे माजी विभागीय अधिकारी चंद्रकांत जाधव, ॲड. आदेश गिरमे, ॲड. पृथ्वीराज चव्हाण, इकबाल मुल्ला, बाळासाहेब ननवरे, मोहंम्मदगौस आतार, शांतीकुमार कोठडिया, रेखा चव्हाण, रेणुका कोठडिया, तनुजा शहा,यांच्यासह शिक्षकवृंद, विद्यार्थी उपस्थित होते.माजी विभागीय अधिकारी चंद्रकांत जाधव म्हणाले की, साबरमतीच्या आश्रमामध्ये महामानव महात्मा गांधींनासुद्धा जे अशक्य होतं, कोल्हापूरच्या शाहू महाराजांना जे अशक्य वाटलं, ते अस्पृश्यता निर्मूलनाचे काम, जातीभेदाच्या भिंती मोडण्याचं काम कर्मवीर अण्णांनी पुर्ण करून दाखवलं. प्रास्ताविक सौ.लि.रि.शहा. कन्याविद्यामंदीराच्या मुख्याध्यापिका निर्मला माने यांनी केले तर आभार महात्मा गांधी विद्यालयाचे प्राचार्य अनिल धुमाळ यांनी मानले. विद्यार्थ्यांनो, रयतमधून घेतलेल्या शिदोरीवर भविष्यकाळात तुम्ही ज्या ठिकाणी जगाच्या पाठीवर विविध क्षेत्रांमध्ये भरारी घ्याल, त्यावेळी त्यावेळच्या कर्तृत्वाला रयतेच्या मातीचा स्पर्श आहे हे तुम्ही विसरू नका. रयतचं काम अधिक गतिमान करण्यासाठी, रयतची शाळा जेंव्हा जेंव्हा तुम्हाला हाक देईल.

अजितदादांप्रमाणेच मी आपल्या सर्वांच्या सोबत उभी आहे : सुनेत्रा पवार

■ बारामती (दै. संध्या)

दि बारामती सहकारी बँक लि.च्या ६५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेला महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा श्रीमती सुनेत्रा वहिनी अजितदादा पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत राजमाता जिजाऊ सांस्कृतिक भवन, भिगवण रोड, बारामती येथे पार पडली.

यावेळी सभेला संबोधित करताना उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा पवार भावुक झाल्या. त्या म्हणाल्या, "अनेक वर्षांपासून सगळे म्हणायचे, वहिनी तुम्ही अजितदादांसोबत वार्षिक सर्वसाधारण सभेत हजर राहायला हवे. मात्र, अशा सभांना मला एकट्याने यावे लागेल, असे मला कधीच वाटले नव्हते. अजितदादांची सर कधीच कोणाला येणार नाही," असे म्हणताना त्यांच्या डोळ्यांत अश्रू तरळले.



"काळ कोणासाठीही थांबत नाही. आता आपल्या सर्वांची जबाबदारी आहे की, अजितदादांनी घालून दिलेला वारसा आणि विचार पुढे न्यावा. गेल्या पाच वर्षांत अजितदादांच्या नेतृत्वाखाली बँकेने अत्यंत दमदार कामगिरी केली आहे. बँकेने ३८.८५ कोटी रुपयांचा निव्वळ नफा मिळवला आहे. ही कामगिरी निश्चितच कौतुकास्पद आहे," असे त्यांनी नमूद केले.

बारामती सहकारी बँकेचा राज्यभर विस्तार करताना तिला आधुनिक स्वरूप देण्याची गरज असल्याचे सांगून त्या म्हणाल्या, "सभासदांचा विश्वास जपत बँकेने उद्योगधंदे, शेतकरी आणि तरुणांना आर्थिक मदतीचा हात दिला आहे. भविष्यातही हीच भूमिका अधिक सक्षमपणे पुढे न्यावी. सहकारी संस्थांच्या यशामध्ये सभासद आणि संचालकांचा महत्त्वाचा वाटा असतो," असे त्यांनी सांगितले.बँकेच्या वाढत्या डिजिटल व्यवहारांच्या पार्श्वभूमीवर सायबर सुरक्षा अधिक मजबूत करण्याची सूचनाही त्यांनी केली. तसेच, "स्वर्गीय अजितदादांनी लावलेली आर्थिक शिस्त आपण सर्वांनी जपली पाहिजे. बारामती सहकारी बँक ही केवळ एक बँक नाही, तर बारामतीकरांचा विश्वास आहे," असे उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा पवार यांनी सांगितले.

"आदरणीय अजितदादांप्रमाणेच मी आपल्या सर्वांच्या सोबत उभी आहे," अशी ग्वाहीही त्यांनी सभासदांना दिली. राज्यातील दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर त्यांनी सामाजिक आवाहन करताना पुष्पगुच्छ व सत्कार स्वीकारू नयेत तसेच पाण्याचा जपून वापर करावा,असे आवाहन केले. यावेळी बँकेचे पदाधिकारी, संचालक, सभासद तसेच संबंधित अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पर्यावरणपूरक गणेशोत्सवासह कृत्रिम कुंड व पारंपारिक वाद्यांना तुफान पसंती

■ चाकण (दै. संध्या)

पर्यावरणपूरक गणेशोत्सवासह चाकणला कृत्रिम कुंड व पारंपारिक वाद्यांना तुफान पसंती होती. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने याबाबत निष्कर्ष काढून कार्यकर्त्यांचे कौतुक केले. राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाकडून राज्यभरात पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य नितीन गोरे यांनी गणेशोत्सव काळात खेड तालुक्यातील नागरिकांना केलेल्या आवाहनाला आणि प्रशासनाच्या नियोजनाला सकारात्मक प्रतिसाद मिळाला. चाकण व खेड तालुक्यातील नागरिकांनी यंदाचा गणेशोत्सव अत्यंत उत्साहपूर्ण आणि पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा केला. चाकण नगरपरिषद व तालुक्यातील प्रशासनाला आवश्यक त्या उपाययोजना करण्याच्या सूचनाही करण्यात आल्या होत्या. त्यानुसार नगरपरिषद व स्थानिक प्रशासनाच्या वतीने गणेश मूर्ती विसर्जनासाठी उभारण्यात आलेल्या कृत्रिम विसर्जन कुंडांचा व निर्माल्य गोळा करण्यासाठी केलेल्या स्वतंत्र व्यवस्थेचा नागरिकांनी वापर केला. श्रींच्या मूर्तीचे पावित्र्य जपुन विसर्जन या कृत्रिम कुंडांमध्येच केल्यामुळे परिसरातील नद्यांचे तसेच नैसर्गिक जलस्रोतांचे होणारे प्रदूषण टाळण्यात यश आले आहे.

जलप्रदूषणासोबतच ध्वनी प्रदूषण टाळण्यासाठीही यंदा सर्व गणेश मंडळांनी विशेष पुढाकार घेतला. विसर्जन मिरवणुकांमध्ये सर्व मंडळांनी पारंपरिक वाद्यांच्या गजरात आणि शिस्तबद्ध पद्धतीने मिरवणुका काढल्या होत्या.

दोन टन निर्माल्य गोळा

चाकण नगरपरिषदेने एकूण दोन टन निर्माल्य गोळा केले आहे. निर्माल्य अस्ताव्यस्त न टाकता कुंडात साठविण्यात आले आहे. नदीत निर्माल्य टाकले गेले नसल्यामुळे गोळा करण्यात आलेल्या निर्माल्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावण्यात येणार आहे."

" प्रशासनाने केलेल्या सूचनांनुसार उभारण्यात आलेल्या कृत्रिम विसर्जन कुंडांचा नागरिकांनी केलेला वापर व मिरवणुकीत राखलेली शिस्त यामुळे नैसर्गिक जलस्रोत व पर्यावरणाची हानी टळली आहे. निसर्ग संवर्धनाच्या या महान कार्यात सर्वांनी एकजुटीने सहकार्य केल्यास प्रशासनाचे काम सोपे होईल."

- नितीन गोरे, सदस्य, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,



पर्यावरणपूरक गणेशोत्सवाच्या या आवाहनाला प्रतिसाद देत निसर्ग संवर्धनासाठी सहकार्य करणाऱ्या चाकण शहर व खेड तालुक्यातील सर्व नागरिक व सार्वजनिक गणेश मंडळांचे व सुयोग्य नियोजन करणाऱ्या प्रशासनाचे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य नितीन गोरे यांनी कौतुक केले.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ तसेच पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग महाराष्ट्र शासन यांच्या आवाहनाला साथ देत खेड तालुक्यातील सुजाण नागरिकांनी व सर्व गणेश मंडळांनी पर्यावरण रक्षणाच्या दृष्टीने मोठी जबाबदारी पार पाडली आहे.



अनेकान्त एज्युकेशन सोसायटीच्या कॉलेज ऑफ फार्मसीत उपक्रम

■ बारामती (दै. संध्या)

जागतिक फार्मासिस्ट दिनानिमित्त अनेकान्त एज्युकेशन सोसायटीज कॉलेज ऑफ फार्मसी, बारामती येथे विविध जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन करून जागतिक फार्मासिस्ट दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी बी. फार्मसी व डी. फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी 'आरोग्यदायी भविष्यासाठी औषध निर्मात्यांचे सक्षमीकरण' या विषयावर बारामती बस स्थानक व महिला शासकीय ग्रामीण रुग्णालय येथे जनजागृतीपर पथनाट्य सादर केले. पथनाट्य उपक्रमात ३५ विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेतला असून बारामती व पंचक्रोशीतील नागरिकांपर्यंत औषधसुरक्षा, फार्माकोव्हिजिलन्स, औषधांचा योग्य वापर, सुरक्षित औषधोपचार, औषधांचे दुष्परिणाम व फार्मासिस्टची भूमिका याबाबत जनजागृती करण्यात आली.

तसेच महाविद्यालयात रील मेकिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी औषधांची सुरक्षितता, योग्य वापर व फार्मासिस्टच्या भूमिकेवर आधारित रील्स सादर केल्या.

या रील्सचे परीक्षण प्रा. राहुल चौधरी, विभागप्रमुख, पत्रकारिता व जनसंपर्क विभाग, तुळजाराम चतुरचंद कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बारामती तसेच डॉ. संतोष जाधव, अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे कॉलेज ऑफ फार्मसी, बारामती यांनी केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दर्शन शहा यांच्या मार्गदर्शनाखाली हे उपक्रम यशस्वीपणे पार पडले. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी प्राध्यापकवर्ग, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष मा. श्री. जवाहर शाह वाघोलीकर व सचिव मा. श्री. मिलिंद शहा वाघोलीकर यांनी फार्मासिस्ट डे च्या शुभेच्छा देऊन मार्गदर्शन केले.

महात्मा फुले विचार मंचच्या १५ व्या वार्षिक सभेत स्वतः च्या मालकीची इमारत उभारणीचा निर्णय

■ नारायणगाव (दै. संध्या)

महात्मा फुले विचार मंच, जुन्नर तालुका या सामाजिक संस्थेची १५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. या सभेत संस्थेची स्वतःच्या मालकीची सुसज्ज कॉर्पोरेट इमारत उभारण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्याबाबत चर्चा करण्यात आली. तसेच आगामी वर्षासाठी नवीन कार्यकारिणीची निवड करण्यात आली.

सभेच्या प्रारंभी संस्थेचे प्रेरणास्थान महात्मा ज्योतिराव फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करण्यात आले. तसेच श्री गणेश आणि श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमांचे पूजन करून सभेला सुरुवात झाली. यावेळी दिवंगत सौ.आशाताई बुचके, महाराष्ट्राचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच तालुक्यातील ज्ञात-अज्ञात व्यक्तींना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

सभेत मागील वर्षातील कामकाजाचा आढावा घेण्यात आला. मागील वर्षाचे ठराव वाचून दाखविण्यात आले. तसेच संस्थेचे वार्षिक हिशोबपत्रक आणि नफा-तोटा पत्रक सादर करून त्यास मंजुरी देण्यात आली. संस्थेच्या मागील वर्षातील कार्याचा आढावा कार्याध्यक्ष श्री.आत्माराम संते यांनी मांडला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष सुरेशशेठ वव्हाडी यांनी संस्थेच्या कामकाजाचे कौतुक केले. संस्थेचा वाढता विस्तार लक्षात घेता स्वतःच्या मालकीची सुसज्ज कॉर्पोरेट इमारत उभारण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. आगामी वर्षात इमारतीचे काम पूर्ण करून पुढील वार्षिक सभा स्वतःच्या जागेत घेण्याचे उद्दिष्ट ठेवावे, अशी सूचना त्यांनी मांडली. त्यांच्या या सूचनेला उपस्थित सर्व सभासदांनी एकमताने पाठिंबा दिला. यानंतर आगामी वर्षासाठी संस्थेची नवीन कार्यकारिणी निवडण्यात आली.

त्यामध्ये अध्यक्षपदी श्री.हेमंत कोल्हे, कार्याध्यक्षपदी श्री.आत्माराम संते, उपाध्यक्षपदी श्री.रविंद्र माळी, सचिवपदी श्री.शरद शिंदे, तर खजिनदारपदी श्री. राजेंद्र गायकवाड आणि श्री.शिवदास विधाटे यांची निवड करण्यात आली.तसेच संचालक म्हणून ॲड. मिलिंद घोडेकर, श्री. सचिन वव्हाडी, श्री.लक्ष्मण मंडलिक, श्री. रोहिदास डोके, श्री.संदीप नाईक, श्री.सुभाष डोके, श्री.संदीप शिंदे आणि श्री.गणेश बेळे यांची निवड करण्यात आली. प्रसिद्धीप्रमुख म्हणून प्रा. दत्तात्रय म्हस्के सर यांची नियुक्ती करण्यात आली.

वेलकम मेळाव्यांमुळे बालकांच्या शारीरिक, मानसिक व भावनिक विकास होईल : कांबळे

अंगणवाडी क्रमांक ५ जाधववाडी येथे वेलकम मेळाव्याचे आयोजन



■ पुरंदर (दै. संध्या)

शासनाच्या नवचेतना व आधारशिला कार्यक्रमांतर्गत वेलकम मेळाव्यांमुळे बालकांच्या शारीरिक, मानसिक व भावनिक विकास होईल अशी प्रतिपादन पुरंदर तालुका एकात्मिक बाल विकास प्रकल्प अधिकारी अनिल कांबळे यांनी केले.

जाधववाडी (ता. पुरंदर) येथील दिवे ग्रामपंचायत अंतर्गत जाधववाडी क्रमांक ५ ही डेमो अंगणवाडी म्हणून निवडली आहे येथे नवचेतना व आधारशिला कार्यक्रमांतर्गत वेलकम मेळावाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उद्घाटन प्रसंगी सर्व अंगणवाडी सेविका, बालकांच्या मातांना मार्गदर्शन करताना श्री. कांबळे बोलत होते. ९ सप्टेंबर ते ९ ऑक्टोबर हा कालावधी पोषण माह म्हणून साजरा करण्यात येत असल्याने"बीट स्तरीय" पोषण माहचा कार्यक्रम सुद्धा जाधववाडी अंगणवाडीत घेण्यात आला. सदर कार्यक्रमात विविध पाककृतीचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. अंगणवाडी सेविकांनी वेलकम मेळाव्यामध्ये बालकांच्या शारीरिक, मानसिक व भावनिक विकासासाठी विविध स्टॉल लावून त्याच्या माध्यमातून पालकांना प्रत्यक्ष प्रात्यक्षिक दाखवून माहिती दिली. बालकांच्या जन्मपूर्व ते ३ वर्ष, तसेच ३ वर्ष ते ६ वर्षाच्या मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच माता पालक, ग्रामस्थ व समुदाय, अंगणवाडी व प्राथमिक शाळा यांच्या संयुक्त समन्वयाने नवचेतना आणि आधारशीला उपक्रम राबवण्यात आला. यावेळी पुरंदर प्रकल्पाचे विस्तार अधिकारी बाळकृष्ण काकडे, पर्यवेक्षिका पुष्पल माळी , मुख्याध्यापक सुनील लोणकर, सहशिक्षिका सुरेखा लोणकर , सामाजिक कार्यकर्ते निखिल आढाळगे,भिवडी बीटच्या सर्व अंगणवाडी सेविका , अंगणवाडीतील बालकांच्या माता उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे नियोजन अंगणवाडी सेविका अश्विनी गायकवाड व मदतनीस अक्षदा आढळगे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पर्यवेक्षिका श्रीम. पुष्पल माळी यांनी केले. सूत्रसंचालन अश्विनी गायकवाड यांनी केले. आभार सुनील लोणकर यांनी मानले.

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले. संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

थोडक्यात पण महत्वाचे



स्वरमयी गुरुकुलतर्फे युवा गायकांची शास्त्रीय गायन मैफल रंगली

पुणे : दैनिक संध्या

डॉ. प्रभा अत्रे फाउंडेशन संचालित 'स्वरमयी गुरुकुल'च्या वतीने 'आंतरराष्ट्रीय स्वरप्रभा गायन स्पर्धे'तील विजेत्या युवा गायकांची विशेष हिंदुस्थानी शास्त्रीय गायन मैफल आयोजित करण्यात आली होती. या मैफलीला रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. युवा गायक गणेश जगदाळे आणि श्रुती वैद्य यांनी आपल्या सादरीकरणाने रसिकांची दाद मिळवली. तबल्यावर ऋषिकेश जगताप आणि संवादिनीवर संतोष अत्रे यांनी समर्पक साथसंगत केली. गणेश जगदाळे यांनी आपल्या सादरीकरणाची सुरुवात डॉ. प्रभा अत्रे यांच्या रचनांनी केली. राग मालकंसमध्ये विलंबित एकतालातील 'कल नही आए सावरे' ही बंदिश आणि तीनतालातील मध्यलयीत 'जागू मैं सारी रैना' ही बंदिश त्यांनी सादर केली. त्यानंतर त्यांनी संगीतबद्ध केलेली राग मिश्र किरवाणीमधील 'बैरन रतिया' ही ठुमरी केरवा तालातील मध्यलयीत सादर केली. श्रुती वैद्य यांनी राग परमेश्वरीमधील मध्यलय रूपक तालातील 'तुम बिन मोहन' ही बंदिश सादर करून त्यानंतर द्रुत तीनतालातील तराणा सादर केला. मिश्र मांड-भैरव रागातील 'अजहुँन आयो मोरे सांवरिया' हा दादरा आणि मिश्र मांड रागातील 'सख्या या चांदण्या राती' ही गझल त्यांनी गायली. कार्यक्रमाचा समारोप मिश्र भैरवी रागातील 'जगत जननी भवतारिणी' या रचनेने झाला. कलाकारांचे स्वागत गायिका सोनाली सरदेसाई यांनी केले, तर सूत्रसंचालन वीणा सातपुते यांनी केले. कार्यक्रमास संगीतप्रेमी, विद्यार्थी आणि जाणकार रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन डॉ. प्रभा अत्रे फाउंडेशनच्या सचिव डॉ. भारती एम. डी. यांनी केले.



मतदार याद्यांतील गोंधळाची चौकशी करा; ज्ञानेश कुमार यांचा राजीनामा घ्या

पुणे : दैनिक संध्या

मतदार याद्यांतील कथित अनियमितता आणि निवडणूक आयोगाच्या निर्णयप्रक्रियेबाबत समोर आलेल्या बाबी गंभीर असून, या संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र आणि निष्पक्ष चौकशी करण्यात यावी. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून पदाचा राजीनामा द्यावा, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे अध्यक्ष शिवराज मोरे यांनी सोमवारी पुण्यात केली. महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष शिवराज मोरे, प्रदेश उपाध्यक्ष प्रथमेश आबनावे, माध्यम प्रमुख अक्षय जैन, पुणे शहर युवक काँग्रेसचे अध्यक्ष सौरभ अमराळे, पुणे ग्रामीण युवक काँग्रेसचे अध्यक्ष उमेश पवार, पिंपरी-चिंचवड युवक काँग्रेसचे अध्यक्ष कौस्तुभ नवले, प्रदेश सरचिटणीस गणेश उबाळे, उमेश कंधारे, विश्वजीत जाधव, दिलीपसिंह देशमुख, प्रदेश सचिव प्रियंका चौधरी, पंकज पोळ, आनंद दासा आदी उपस्थित होते. पत्रकार परिषदेत युवक काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी पांढरे मास्क परिधान करून आणि हातांना निळा रंग लावून प्रतीकात्मक निषेध नोंदविला. शिवराज मोरे म्हणाले, "लोकशाही व्यवस्थेमध्ये प्रत्येक पात्र नागरिकाचे नाव मतदार यादीत असणे आणि त्याचा मतदानाचा अधिकार अबाधित राहणे अत्यंत महत्त्वाचे आहे. मतदारांची नावे समाविष्ट करणे किंवा वगळणे यासारख्या मूलभूत प्रक्रियेबाबत निवडणूक आयोगातीलच दोन आयुक्तांनी वारंवार आक्षेप नोंदविल्याचे वृत्त समोर आले आहे. त्यामुळे या प्रश्नांकडे केवळ राजकीय आरोप म्हणून न पाहता पारदर्शक चौकशी होणे आवश्यक आहे." द इंडियन एक्स्प्रेसच्या तपासणीनुसार निवडणूक आयुक्त सुखबीर सिंह संधू आणि विवेक जोशी यांनी मागील दहा महिन्यांत मतदार नोंदणी, नावे वगळणे, फॉर्म-६ मधील बदल तसेच मतदारयादीच्या डेटाबेससंदर्भातील विविध निर्णयांवर किमान १४ वेळा लेखी आक्षेप नोंदविले आहेत. या वृत्तानंतर निवडणूक आयोगाच्या अंतर्गत निर्णयप्रक्रियेबाबतही राजकीय प्रश्न उपस्थित झाले आहेत. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी या घडामोडींनंतर मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. "राहुल गांधी यांनी सातत्याने मतदार याद्यांतील कथित अनियमितता आणि 'वोट चोरी'चा मुद्दा देशासमोर मांडला आहे. आता निवडणूक आयोगाच्या अंतर्गत प्रक्रियेबाबतच गंभीर प्रश्न समोर येत असतील, तर त्यांची उत्तरे देशाला मिळाली पाहिजेत. निवडणूक आयोगासारख्या घटनात्मक संस्थेवरील जनतेचा विश्वास कायम ठेवण्यासाठी प्रत्येक निर्णय पारदर्शक आणि कायद्याच्या चौकटीत झाला पाहिजे," असे शिवराज मोरे यांनी नमूद केले. महाराष्ट्रातील मतदार याद्यांबाबतही युवक काँग्रेसने प्रश्न उपस्थित केले. मतदारांची नावे यादीतून गायब होणे, मतदारांच्या नोंदींबाबत निर्माण होणारा गोंधळ तसेच नाव नोंदणी आणि वगळण्याच्या प्रक्रियेबाबत येणाऱ्या तक्रारींची निवडणूक आयोगाने गांभीर्याने दखल घ्यावी. महाराष्ट्रातील मतदार याद्यांबाबत ज्या तक्रारी आणि शंका उपस्थित होत आहेत, त्यांची पारदर्शक पद्धतीने पडताळणी झाली पाहिजे. कोणत्याही पात्र मतदाराचे नाव चुकीच्या पद्धतीने वगळले जाणार नाही आणि प्रत्येक नागरिकाचा मतदानाचा हक्क सुरक्षित राहील, याची खात्री निवडणूक आयोगाने करावी," अशी मागणी त्यांनी केली. देशातील बेरोजगारीबरोबरच महाराष्ट्रातील एमपीएससी आणि विविध सरकारी विभागांमधील रिक्त पदांचा प्रश्न युवक काँग्रेसने पत्रकार परिषदेत उपस्थित केला.

30 सप्टेंबरपासून खुला होणार इव्हेंशनचा आयपीओ, कमाईची संधी सोडू नका

पुणे : दैनिक संध्या

28th September, 2026: Eventions Limited IPO शेअर बाजारात IPO गुंतवणुकीच्या संधी शोधणाऱ्या गुंतवणूकदारांसाठी महत्त्वाची बातमी आहे. MICE आणि कॉर्पोरेट इव्हेंट्स क्षेत्रात कार्यरत असलेल्या Eventions Limited चा IPO 30 सप्टेंबर 2026 रोजी खुला होणार आहे. कंपनी या IPOच्या माध्यमातून ₹38.12 कोटी उभारण्याच्या तयारीत आहे. हा IPO 5 ऑक्टोबर 2026 रोजी बंद होईल. ₹112 ते ₹118 असा IPO Price Band Eventions Limited ने IPO साठी ₹112 ते ₹118 प्रति इक्विटी शेअर असा प्राइस बँड निश्चित केला आहे. कंपनी या इश्यूच्या माध्यमातून एकूण 32,30,400 इक्विटी शेअर्स जारी करणार आहे. प्रत्येक शेअरचे फेस व्हॅल्यू ₹10 आहे.कंपनीच्या शेअर्सचे प्रस्तावित लिस्टिंग NSE SME प्लॅटफॉर्मवर होणार आहे. IPO ची अंतिम किंमत बुक बिल्डिंग प्रक्रियेद्वारे निश्चित केली जाणार आहे. Retail Investors साठी किती गुंतवणूक? या IPOचा मार्केट लॉट 1,200 शेअर्सचा आहे. Retail Investorsना किमान 2 लॉटसाठी अर्ज करावा लागणार आहे. म्हणजेच ₹118 या अप्पर प्राइस बँडनुसार किरकोळ गुंतवणूकदारांना किमान ₹2.83 लाख गुंतवावे लागतील.



पर्यटन आणि चित्रपटनिर्मिती क्षेत्रांत दिग्दर्शनाच्या नव्या संधी

■ पुणे (दै. संध्या)

पर्यटन आणि लघुपट-चित्रपटनिर्मिती ही परस्परपूरक क्षेत्रे ठरू शकतात आणि त्यामध्ये युवा दिग्दर्शकांसाठी अनेक नव्या संधी आहेत. त्या संधींचा योग्यप्रकारे लाभ उठवायला हवा, असे मत प्रसिद्ध अभिनेते, दिग्दर्शक, निर्माते ओम राऊत यांनी व्यक्त केले. पर्यटन आणि चित्रपट, या दोन्ही ठिकाणी आपण एक गोष्ट सोबत घेऊन येतो, जी आपल्याला जागे करते, संवेदनशील बनवते, जाणिवा समृद्ध करते, असेही ते म्हणाले.

जागतिक पर्यटन दिनानिमित्त परभन्ना फाऊंडेशन, महाराष्ट्र पर्यटन विभाग, दादासाहेब फाळके चित्रनगरी आणि अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने बाणेर येथील यशदामध्ये आयोजित पाचव्या आंतरराष्ट्रीय पर्यटन लघुपट महोत्सवाच्या पुरस्कार वितरण समारंभात ते बोलत होते. यावेळी ओम राऊत यांना 'परभन्ना विशेष योगदान पुरस्कार' ज्येष्ठ अभिनेते शशांक शेंडे आणि माजी सनदी अधिकारी शेखर गायकवाड यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. विहार ट्रॅव्हल्सचे दीपक पुजारी यांना 'परभन्ना जीवनगौरव पुरस्कार' देण्यात आला. तो ऋषिकेश पुजारी यांनी स्वीकारला. उत्कृष्ट कृषी पर्यटन पुरस्कार मधुबन ऍग्रो टुरिझम चंद्रपूर यांना देण्यात आला.

समारोपावेळी महोत्सवाचे प्रमुख संयोजक गणेश चप्पलवार, अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज राजेभोसले, चित्रनगरीचे जनसंपर्क अधिकारी पंकज चव्हाण, परीक्षक वैशाली केंदळे आणि डॉ. अनमोल कोठडिया, तर उद्घाटन सोहळ्याला ज्येष्ठ संपादक संजय आवटे, महाराष्ट्र शासनाचे सांस्कृतिक कार्य विभाग आणि मराठी भाषा विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी, महाराष्ट्र आर्थिक विकास परिषदेचे अध्यक्ष सचिन इटकर, पुणे पर्यटन विभागाचे उपसंचालक भरत लांधी, महोत्सवाचे सल्लागार प्रा. राजीव घोडे, फाउंडेशनचे सचिव मनीषा उगले आदी उपस्थित होते.

'चित्रपटांच्या माध्यमातून पर्यटनाचा प्रसार' या संकल्पनेवर आधारित या दोन दिवसीय महोत्सवात लघुपट प्रदर्शनासह मुलाखती, परिसंवाद, समूहचर्चा आणि मास्टरक्लास अशी संवादात्मक सत्रे झाली. दोन दिवसांत २६ लघुपट, माहितीपटांचे स्क्रिनींग झाले. निवडक ५० छायाचित्रांचे प्रदर्शन लागले होते. यंदाच्या महोत्सवात लघुपट, माहितीपट, व्हीलॉग आणि विद्यार्थी चित्रपट, अशा विभागांत पुरस्कार देण्यात आले. सर्वोत्कृष्ट माहितीपटाचा प्रथम पुरस्कार 'द रिकार्ड डान्स'ला, तर सर्वोत्कृष्ट लघुपट पुरस्कार 'केकी' या लघुपटाला मिळाला. उत्कृष्ट दिग्दर्शक पुरस्कार माहितीपटासाठी नीलेश कुंजीर, तर लघुपटासाठी तुषार उडेग यांना मिळाला.

शशांक शेंडे यांनी सर्जनशील निर्मितीमध्ये आशय सर्वात महत्त्वाचा असून, तो लघुपटांतून जपण्याचे आवाहन केले. शेखर गायकवाड म्हणाले, पर्यटनाच्या संकल्पना बदलत आहेत. नवी पिढी आता केवळ स्थळदर्शन न करता, तेथील विशिष्ट अनुभवाला प्राधान्य देत आहे. यशदामधील सर्व प्रशिक्षणांचा प्रारंभ कुठल्यातरी औचित्यपूर्ण लघुपट, माहितीपटानेच होतो. आपल्याकडे प्रत्येक गावाचे ब्रँडिंग होणे आवश्यक आहे, इतकी विविधता आणि वेगळेपण आहे. ते नेमकेपणाने ओळखून मांडण्याची आवश्यकता आहे. गणेश चप्पलवार यांनी असे वेगळेपण शोधण्याची कल्पकता या महोत्सवाच्या आयोजनातून दाखवली आहे.

मेघराज राजेभोसले यांनी महोत्सवाला मिळणारा प्रतिसाद अभिनंदनीय आहे. हा महोत्सव वेगळेपण जपणारा आहे. त्यामुळे यापुढेही महोत्सवाला आमचे सहकार्य मिळत राहील, असे सांगितले. पंकज चव्हाण यांनी महोत्सवाचे आयोजन आव्हानात्मक असून चित्रनगरीचे सहकार्यही महोत्सवासाठी असेल. नव्या फिल्म मेकर्सनी चित्रनगरीच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले. परीक्षकांतर्फे मनोगत मांडताना कोठडिया यांनी नव्या दिग्दर्शकांनी निर्मितीच्या विविध शक्यता आजमावण्याची गरज अधोरेखित केली. वैशाली केंजळे यांनीही मनोगत मांडले. ज्येष्ठ पत्रकार जयश्री बोकील यांनी मानपत्र लेखन आणि वाचन केले. अमित त्रिभुवन यांनी आभार मानले. आरजे तेजस्वी फुलसुंदर, प्रा. डॉ. सुनील धनगर यांनी सूत्रसंचालन केले.

'द रिकार्ड डान्स', एकोज ऑन द वॉल्स' व 'केकी'ची बाजी

सर्वोत्कृष्ट माहितीपटाचा प्रथम पुरस्कार 'द रिकार्ड डान्स' व 'एकोज ऑन द वॉल्स' या माहितीपटाला, तर द्वितीय पुरस्कार 'द लास्ट पॅरेडाईज' आणि 'होड्यांचे गाव' या माहितीपटाना विभागून देण्यात आला. सर्वोत्कृष्ट लघुपटाचा पुरस्कार 'केकी' या लघुपटाला मिळाला. उत्कृष्ट व्हीलॉगचा पुरस्कार 'द शॅटर्ड मिरर्स ॲन एपिफनी' आणि 'वास्टर बीर' यांना प्रदान करण्यात आला. विद्यार्थी विभागात सर्वोत्कृष्ट माहितीपटाचा पुरस्कार 'अलक', तर सर्वोत्कृष्ट लघुपटाचा पुरस्कार 'द व्हॉईस ऑफ ओल्ड' याला मिळाला. उत्कृष्ट दिग्दर्शक (माहितीपट) म्हणून नीलेश कुंजीर, तर लघुपटासाठी तुषार उडेग यांची निवड करण्यात आली. महाराष्ट्र पर्यटन विशेष उल्लेखनीय पुरस्कार 'कोकणातील शाश्वत पर्यटन' आणि 'दिंडी – वे ऑफ लाईफ' यांना मिळाला. तसेच परीक्षकांचा विशेष पुरस्कार 'लीगसी इन ट्यून्स', 'आगम' आणि 'महाबळेश्वर फॉरेस्ट' या कलाकृतींना देण्यात आला.

लोककला ही आपली सांस्कृतिक परंपरा

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या विश्वस्त डॉ.माधवी वैद्य ; शाहीर हिंगे लोककला प्रबोधिनीतर्फे शाहीर हिंगे युवा कलागौरव पुरस्कार

■ पुणे (दै. संध्या)



जनजाती कल्याण आश्रम आणि सेवा सहयोग फाउंडेशन, पुणे यांच्या प्रयत्नातून तसेच एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, घोडेगाव, तहसील कार्यालय खेड आणि पंचायत समिती खेड यांच्या समन्वयातून विठ्ठलवाडी येथे ३१० लाभार्थ्यांना जातीचे दाखले व रेशनकार्डचे वितरण करण्यात आले.

खेड तालुक्यातील विठ्ठलवाडी येथे हुतात्मा नाग्या महादू कातकरी यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात रेशनकार्ड व जातीचे दाखले वितरित करण्यात आले.या उपक्रमामुळे कातकरी समाजातील नागरिकांना विविध शासकीय योजना व सुविधांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रे उपलब्ध होण्यास मदत झाली. नाशिक जनजाती कल्याण आश्रमाचे सचिव शरद शेळके, प्रकल्प अधिकारी श्रीमती प्रियंका घनवट, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, घोडेगावचे वरिष्ठ आदिवासी निरीक्षक शरद काळे, जनजाती कल्याण आश्रमाचे जिल्हा उपाध्यक्ष दशरथ चौरे उपस्थित होते. श्री. शेळके यांनी मार्गदर्शनात हुतात्मा नाग्या महादू कातकरी यांच्या बलिदानाचा तसेच आदिवासी समाजाच्या हक्कांसाठी त्यांनी केलेल्या संघर्षाचा उल्लेख केला. त्यांच्या विचारांपासून प्रेरणा घेऊन आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी सामूहिक प्रयत्न करण्याचे आवाहन त्यांनी केले. हुतात्मा नाग्या महादू कातकरी यांच्या स्मृतींना अभिवादन करत आदिवासी समाजातील नागरिकांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी विविध विभागांच्या समन्वयातून राबविण्यात आलेल्या या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी हुतात्मा नाग्या महादू कातकरी यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. उमा वाघ यांनी केले, तर घोडेगाव आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृहाच्या गृहपाल रेणुका जाधव यांनी आभार मानले. कार्यक्रमास अरुण काठे, उपस्थित होते.

रकस नेटवर्क्सने केला भारतात विस्तार

■ पुणे(दै. संध्या)



संपूर्ण कनेक्शन सोल्यूशन्सची अग्रगण्य जागतिक पुरवठादार कंपनी असलेल्या बेल्डेन इन्कॉर्पोरेटेडने आज देशभरातील ग्राहकांसाठी आयसीएक्स इथरनेट स्विचिंगचे उत्पादन करण्याकरिता रकस नेटवर्क्सचा भारतात विस्तार करण्याची घोषणा केली. रकस नेटवर्क्स हा बेल्डेनचा ब्रँड आहे. यासाठी पुण्यातील बेल्डेनच्या सध्याच्या उत्पादन क्षमतेचा उपयोग केला जाईल. बेल्डन आणि रकस नेटवर्क्स या कंपन्या अधिग्रहणानंतर भरीव व्यावसायिक परिणाम साधण्यासाठी एकत्र येत आहेत. तसेच नवीन ग्राहक आणि बाजारपेठेच्या संधींपर्यंत रकस नेटवर्क्स ची पोहोच वाढवत आहेत. यासाठी कार्यान्वयनाचा हा टप्पा एक महत्त्वाचे पहिले पाऊल ठरणार आहे.

रकस नेटवर्क्स चा विस्तार हा भारतातील नाविन्यपूर्णता, अभियांत्रिकी, ग्राहक यश आणि प्रतिभा विकास या क्षेत्रांमधील कंपनीच्या व्यापक कटिबद्धतेवर आधारित आहे. बंगळूरु हे कंपनीचे संशोधन आणि विकास (आरएन्डडी) व ग्राहक यशासाठीचे सर्वात मोठे जागतिक केंद्र आहे. याच्या जोडीला बेल्डेनचे कस्टमर इनोव्हेशन सेंटर आहे. त्याद्वारे नवीन उत्पादने सह-विकसित करण्यासाठी आणि प्रमाणित करण्यासाठी ग्राहक, भागीदार आणि तज्ज्ञ एकत्र येतील. रकस नेटवर्क्स ने चेन्नईमध्ये इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी मद्रास रिसर्च पार्कच्या (आयआयटीएमआरपी) सहकार्याने आपले संशोधन आणि रचना (आरएन्डडी) केंद्र स्थापन केले आहे. ते सॉफ्टवेअर विकास, अभियांत्रिकी प्रतिभा आणि नेटवर्किंग इनोव्हेशनला पाठबळ पुरवेल. पुण्याच्या समावेशामुळे उत्पादन क्षेत्रातही या उपस्थितीचा विस्तार झाला.

प्रत्येकाच्या योगदानातूनच समाजामध्ये होत असते व्यापक परिवर्तन

■ पुणे(दै. संध्या)



"बदलत्या जीवनशैलीत एकत्र कुटुंबपद्धती, माणुसकी, चांगले आचरण आणि सामाजिक बांधिलकी यांचे महत्त्व अधिक अधोरेखित करण्याची गरज आहे. एकत्रित कुटुंब हीच संस्कारांची पहिली शाळा असून, चांगले वागणे, एकमेकांना आधार देणे आणि समाजाच्या जडणघडणीत योगदान देणे ही मूल्ये पुढील पिढीपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. सुषमा व प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया हे दाम्पत्य हेच काम गेल्या अनेक वर्षांपासून करत आहेत. नव्या पिढीला आदर्श, मूल्ये, संस्कार आणि सामाजिक जाणिवेची शिकवण देण्याचे कार्य कौतुकास्पद आहे," असे प्रतिपादन ज्येष्ठ अभिनेते रझा मुराद यांनी केले.

सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशन संचालित बन्सीरत्न वेल्फेअर ट्रस्टच्या वतीने आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्यात ते बोलत होते. महर्षीनगर येथील शिवशंकर सभागृहातील साधना सदनमध्ये झालेल्या कार्यक्रमावेळी अहिंसा विश्वभारतीचे संस्थापक अध्यक्ष आचार्य डॉ. लोकेश मुनीजी, ज्येष्ठ शास्त्रज्ञ व 'आयसर'चे सल्लागार डॉ. अरविंद नातू, ज्येष्ठ अभिनेते रजा मुराद, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, ज्येष्ठ शास्त्रीय गायिका डॉ. सोमा घोष, सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया, उपाध्यक्ष व सचिव सुषमा चोरडिया, सहयोगी उपाध्यक्षा स्नेहल नवलखा व डॉ. किमया गांधी, मुख्य विकास अधिकारी सिद्धांत चोरडिया, स्वर्णिमा सिद्धांत चोरडिया आदी उपस्थित होते.

या पुरस्कारांमध्ये गुरुदेव परमपूज्य रमणिक मुनीजी महाराज साहेब यांना 'सूर्यरत्न दी सेंट ऑफ मॉडर्न इंडिया, सूर्यदत्त राष्ट्रीय जीवनगौरव पुरस्कार', परमपूज्य हिमानीजी महाराज साहेब यांना 'सूर्यदत्त साध्वीरत्न राष्ट्रीय पुरस्कार', पद्मश्री डॉ. सोमा घोष यांना 'सूर्यदत्त स्त्रीशक्ती राष्ट्रीय पुरस्कार', पन्नालाल मोतीलाल कोठारी व मोतीबन परिवाराला 'सूर्यदत्त बन्सीरत्न आदर्श परिवार पुरस्कार', श्रीमती सरला व पृथ्वीराज धोका यांना 'सूर्यदत्त बन्सीरत्न आदर्श मातापिता पुरस्कार', श्रीमती विमल अनिल बाफना 'सूर्यदत्त बन्सीरत्न समाज शिरोमणी ज्ञानसेवा पुरस्कार', सुदेशकुमार चंपालाल साकलेचा यांना 'सूर्यदत्त बन्सीरत्न समाज शिरोमणी पुरस्कार', श्रीमती निर्मला चंद्रकांत छाजेड यांना 'सूर्यदत्त बन्सीरत्न समाजरत्न पुरस्कार', कुंदनलाल दर्डा व मोहनलाल कन्हैयालाल संचेती यांना 'सूर्यदत्त बन्सीरत्न समाजभूषण पुरस्कार', तर आशीष रमणलाल बोरा, मनोज मदनलाल छाजेड व सुनील पोपटलाल नहार यांना 'सूर्यदत्त बन्सीरत्न मानवसेवा पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

दहावी व बारावीच्या परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवलेल्या जैन समाजातील १०० गुणवंत विद्यार्थ्यांना मानपत्र, सन्मानचिन्ह, सुवर्णपदक व स्कार्फ देऊन गौरविण्यात आले. डॉ. लोकेश मुनीजी म्हणाले, "समाज घडविण्यासाठी केवळ वैयक्तिक यश महत्त्वाचे नसून, कुटुंब आणि समाजाप्रती असलेली जबाबदारीही तितकीच महत्त्वाची आहे. एकत्र कुटुंबपद्धतीतून हीच माणुसकी आणि सामाजिक बांधिलकीची भावना पुढे जाते. आजही काही कुटुंबात अनेक पिढ्या एकत्र राहत असून, परस्परांमध्ये प्रेम,

थोडक्यात पण महत्वाचे

वॉकेथॉनमध्ये रोटरी क्लब ऑफ डायनॅमिक भोसरीचा उत्स्फूर्त सहभाग



भोसरी : दैनिक संध्या

जागतिक हृदय दिनाचे औचित्य साधून मेडीकव्हर हॉस्पिटल, भोसरी यांच्या वतीने रविवारी (दि.२७) सकाळी भव्य वॉकेथॉनचे आयोजन करण्यात आले. हृदयविकाराबाबत जनजागृती, प्रतिबंधात्मक काळजी आणि निरोगी जीवनशैलीचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला. या वॉकेथॉनमध्ये रोटरी क्लब ऑफ डायनॅमिक भोसरी, डिस्ट्रिक्ट ३१३१च्या सदस्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. क्लबचे अध्यक्ष रो. डॉ. योगेश गाडेकर यांच्या नेतृत्वाखाली अनेक रोटेरियन आणि सामाजिक कार्यकर्ते या उपक्रमात सहभागी झाले होते. समाजाच्या आरोग्यासाठी रोटरी क्लब करत असलेल्या सातत्यपूर्ण कार्याची दखल घेत मेडीकव्हर ग्रुपच्या वतीने अध्यक्ष रो. डॉ. योगेश गाडेकर तसेच रोटरी क्लब ऑफ डायनॅमिक भोसरीच्या संपूर्ण टीमचा विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना रो. डॉ. योगेश गाडेकर म्हणाले, "निरोगी हृदय हाच निरोगी जीवनाचा पाया आहे. हृदयाचे आरोग्य जपणे ही काळाची गरज असून समाजाच्या आरोग्य संवर्धनासाठी रोटरी क्लब नेहमीच पुढाकार घेत राहील." या वॉकेथॉनमध्ये मेडीकव्हर हॉस्पिटलचे डॉक्टर, कर्मचारी, विविध क्षेत्रातील नागरिक तसेच आरोग्यप्रेमींनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. या उपक्रमातून नियमित व्यायाम, चालणे आणि आरोग्यपूर्ण जीवनशैलीचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

नगरसेवक राहुल कलाटेंच्या जनसंपर्क कार्यालयात विशेष लाभार्थी शिबिर

वाकड: दैनिक संध्या

जनसामान्यांच्या अडचणी समजून घेत त्यांना विविध शासकीय योजना व आवश्यक सुविधांचा लाभ सहज उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने पिंपरी चिंचवड महापालिकेचे नगरसेवक राहुल कलाटे यांच्या जनसंपर्क कार्यालयाच्या माध्यमातून मागील तीन महिन्यांपासून विविध ठिकाणी 'जनकल्याण शिबिरां'चे आयोजन करण्यात येत आहे. या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, विविध योजनांसोबतच कलाटे यांच्यावतीने मोफत NCMC कार्डसाठी मोठ्या संख्येने नागरिकांनी, विशेषतः ज्येष्ठ नागरिकांनी नोंदणी केली आहे. या नोंदणी केलेल्या लाभार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात प्रमाणपत्रांचे वाटप करण्यासाठी मंगळवार, दि. २९ सप्टेंबर रोजी राहुल कलाटे जनसंपर्क कार्यालय, वाकड येथे विशेष 'लाभार्थी शिबिर' आयोजित करण्यात आले आहे. या कार्यक्रमात भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या हस्ते जनकल्याण शिबिरातील लाभार्थ्यांना प्रमाणपत्र वाटप करण्यात येणार आहेत तसेच राहुल कलाटे यांच्या वतीने आयोजित या शिबिराच्या डॅशबोर्डचे देखील अनावरण केले जाणार आहे. 'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत आयोजित या उपक्रमातून नागरिकांना शासकीय योजना व लोककल्याणकारी सुविधांचा लाभ अधिक सुलभ पद्धतीने मिळवून देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. जनतेच्या प्रश्नांवर केवळ चर्चा न करता त्यासाठी प्रत्यक्ष कार्यवाही आणि सेवा उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात येत असल्याचे कलाटे यांनी कार्यक्रमाची माहिती देताना सांगितले आहे. राहुल कलाटे जनसंपर्क कार्यालयाच्या माध्यमातून आयोजित जनकल्याण शिबिरांमध्ये आतापर्यंत ६४ पेक्षा जास्त शिबिरे घेण्यात आली असून, ८,५०० पेक्षा जास्त लाभार्थ्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यात आला आहे. नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी सुरू असलेल्या या जनसेवेच्या उपक्रमाला पुढेही अधिक व्यापक स्वरूप देण्यात येणार असल्याचे राहुल कलाटे यांनी सांगितले आहे.

वाकडमध्ये 'हरित प्रभाग' अभियानाचा मंगळवारी शुभारंभ

वाकड : दैनिक संध्या

पर्यावरण संवर्धन आणि प्रदूषणमुक्त शहराच्या उद्देशाने प्रभाग क्रमांक २५ मध्ये 'हरित प्रभाग २५' या विशेष उपक्रमाला सुरुवात करण्यात येणार आहे. या अभियानाचा शुभारंभ वाकड येथील अटलांटा सोसायटीत मंगळवारी (दि. २९) सकाळी ८.३० वाजता होणार असून, भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते वृक्षारोपण कार्यक्रम पार पडणार आहे. नगरसेविका श्रुती वाकडकर आणि पिंपरी चिंचवड भाजपा शहर उपाध्यक्ष रामभाऊ वाकडकर यांच्या पुढाकारातून हा उपक्रम संपन्न होत आहे. वाकड प्रभाग २५ मधील सुमारे ३५० सोसायट्यांमध्ये वड, पिंपळ आणि लिंब यांसारख्या स्थानिक व पर्यावरणपूरक वृक्षांची लागवड करण्याचा संकल्प या उपक्रमांतर्गत करण्यात आला आहे.

जाहीर नोटीस

तमाम लोकांना कळविण्यात येते की, खालील परिशिष्ट यात वर्णन केलेली मिळकत आम्ही' १) दिलीप नामदेव ढोले. (२) चंद्रकांत नामदेव ढोले (वारस) अंजना चंद्रकांत ढोले, प्रियांका सदाशिव पाटे, सुप्रिया चंद्रकांत ढोले, यज्ञेश चंद्रकांत ढोले (३) पुष्पा नामदेव ढोले (४) दत्तात्रय नामदेव ढोले (वारस) निर्मला दत्तात्रय ढोले, योगेश दत्तात्रय ढोले, गौरव दत्तात्रेय ढोले, दिपाली समीर चिलप.सर्व हिस्सेदार रा.विठ्ठलवाडी ता. जुन्नर, जि. पुणे यांच्या अविभक्त हिश्याचे मालकीची असून, सदरची मिळकत निर्वेध, निर्जोखमी, बोजारहित असल्याचा भरवसा त्यांनी आमच्या अशिल श्री श्री सिद्धेश शिवाजी वर्षे राहणार गाव मौजे येणेरे ता जुन्नर जि पुणे यांना विक्री करीत आहे. तरी सदरील मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, ताबा, लीज, लीन, पोटगी, चार्ज, खरेदीखत, बक्षीसपत्र, अन्न, वस्त्र इत्यादी असल्यास त्यांनी त्याबाबत आम्हास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत लेखी कळवून व कागदपत्र दाखवून खात्री पटवून द्यावी अन्यथा सदर मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही स्वरूपाचा हक्क नाही किंवा असल्यास तो जाणीवपूर्वक सोडून दिला आहे, असे समजले जाईल. सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल. नंतर कोणाचीही तकार चालणार नाही.

'परिशिष्ट'

१) मिळकतीचे वर्णन :- तुकडी पुणे, पोट तुकडी तालुका जुन्नरचे, मे. राब रजिस्ट्रार साहेब, जुन्नर यांच्या हद्दीतील जिल्हा परिषद, पुणे यांच्या हद्दीतील गाव मौजे विठ्ठलवाडी, ता. जुन्नर, जि. पुणे येथील जमीन गट क्रमांक १७५ खाते क्रमांक ३०४ वरील १ हेक्टर ३८ आर पो. ख. ० हे ०१ आर आकार २ रु. ४४ पै. पैकी अविभक्त हिश्याचे संपुर्ण क्षेत्र व गट क्रमांक १५४ खाते क्रमांक ७८ वरील ० हेक्टर ६० आर आकार ०१ रु. १८ पै. पैकी अविभक्त हिश्याचे संपुर्ण क्षेत्र व गाव मौजे येणेरे ता जुन्नर जि पुणे येथील गट क्रमांक ४९८ खाते क्रमांक १३२ वरील ० हेक्टर ५९ आर आकार ०३ रु. १८ पै. पैकी अविभक्त हिश्याचे संपुर्ण क्षेत्र यांसी चतुःसीमा पुढीलप्रमाणे -

गट क्र.	पूर्वेस	दक्षिणेस	पश्चिमेस	उत्तरेस
१७५	गट क्र १७६	गट क्र १७४, १८०	गट क्र १७२	गट क्र १५९, १५८
१५४	गट क्र ८०, ७९	गट क्र १५३	गट क्र १७८	गट क्र १५५
४९८ (जुना ९२५)	गट क्र ९२६	गट क्र ९२४	गट क्र ९१०, ९०९	गट क्र ९२६

स्थळ : जुन्नर
दिनांक : २२/०९/२०२६

सही/-
श्री. सुदर्शन हनुमंत पारखे (ॲडव्होकेट)
जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे
मो. नं. ७७०९१९११६३

देशद्रोही ज्ञानेश कुमार यांना सेवेतून बडतर्फ करून अटक करा

■ पुणे (दै. संध्या)



लोकशाहीची नव्हे, तर केवळ सत्तेची गुलामी करण्यात भारताचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार व्यस्त आहेत. मतदार यादीतून कोट्यवधी पात्र मतदारांना बाद करण्याचे, ऐन निवडणुकीत पात्र उमेदवारांना अपात्र ठरवण्याचे, सत्ताधाऱ्यांच्या अपात्र उमेदवारांना पात्र ठरवण्याचे पाप याच ज्ञानेश कुमार यांनी केले आहे. त्यांच्या पापाचा घडा आता भरला आहे, म्हणूनच इतर २ निवडणूक आयुक्तांनी गेल्या १० महिन्यांत १४ वेळा मुख्य निवडणूक आयोगांच्या विविध निर्णयांबाबत असहमती, तरीही ज्ञानेश कुमार यांनी सत्तेची चाकरी करत आपले निर्णय रेटून नेले. निवडणूक आयोगाच्या या गुलामगिरीच्या विरोधात पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने पूर्व विभागाचे अध्यक्ष प्रशांत जगताप यांच्या नेतृत्वाखाली पुणे जिल्हाधिकारी कार्यालय येथे तीव्र आंदोलन करण्यात आले.

निवडणूक आयोगच सत्ताधाऱ्यांचे गुलाम असेल, तर आपली लोकशाही उध्वस्त होईल, म्हणूनच मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांचा राजीनामा पुणे भारतीय लोकशाहीच्या अस्तित्वासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. याबाबत उपजिल्हाधिकारी श्रीमती. ज्योती कदम यांना पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने निवेदनही देण्यात आले.

या आंदोलनात सहभागी होत असंख्य पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी, स्वाभिमानी पुणेकर नागरिकांनी निवडणूक आयोगाच्या पक्षपाती कारभाराचा निषेध व्यक्त केला. तसेच, सत्तेच्या वळचणीला गेलेले मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी राजीनामा द्यावा अशी सर्वांनी आग्रही मागणी केली. यावेळी ज्येष्ठ नेते माजी आमदार मोहन जोशी, नगरसेवक अरविंद शिंदे, प्रदेश प्रवक्ते गोपाळ तिवारी, नगरसेवक रफिक शेख, नगरसेविका आसिया मणियार, नगरसेविका सुमय्या नदाफ, लताताई राजगुरू, स्थायी समितीचे माजी अध्यक्ष शिवा मंत्री, महिला काँग्रेसच्या शहराध्यक्षा सौ. स्वाती शिंदे, युवक काँग्रेस अध्यक्ष सौरभ अमराळे, चंद्रशेखर कपोते, इंटक अध्यक्ष चेतन अगरवाल, ओ.बी.सी. अध्यक्ष जीवन चाकणकर, सतीश पवार, द. स. पोळेकर, रमेश सकट, अक्षय जैन, वैभव डांगमाळी, मोहन चव्हाण, आयुब पठाण, आसिफ शेख, भाऊसाहेब आजबे, उमेश कंधारे, संदिप मोकाटे, सुरेश कांबळे, फैय्याज शेख, नागेश भालेराव, रवि आरडे, अमित कांबळे, क्लेमेंट लाजरस, रमेश सोनकांबळे, सईद शेख, मजहर मणियार, अनुसया गायकवाड, सिमा सावंत, अनिता धिमधिमे, प्रियंका मधाळे, ऋग्वेदिता सपकाळ यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

"सज्ज आहेत माझे हात" - अपोलो हॉस्पिटल्सच्या मोहिमेचा विश्वविक्रम !

■ मुंबई : (दै. संध्या)



नवी मुंबईतील अपोलो हॉस्पिटल्सने 8 जुलै ते 7 ऑगस्ट 2026 या काळात "सज्ज आहेत माझे हात" ही अभिनव मोहीम राबवली. यामध्ये अपोलोने 50,000 लोकांनी सीपीआर शिकण्याची शपथ घ्यावी तसेच वैद्यकीय आणीबाणीच्या परिस्थितीत तज्ज्ञांची मदत मिळण्यापूर्वी आपल्यापैकी सामान्य लोकांनी सज्ज राहून मदत करावी, हे लक्ष्य ठेवले होते. नवी मुंबईकरांनी केवळ हे लक्ष्य ओलांडले नाही, तर त्याला एका सामूहिक चळवळीचे रूप दिले आणि अशाप्रकारे सज्ज राहण्यासाठी अनेक लोक एकत्र आले.

या काळात 120 हून अधिक संस्था, ज्यामध्ये शाळा, महाविद्यालये, कामाची ठिकाणे आणि सामाजिक संस्थांचा समावेश होता, या उपक्रमात सहभागी झाल्या. यामध्ये विद्यार्थी, शिक्षक, आरोग्य कर्मचारी, नोकरदार वर्ग, कुटुंबे आणि सामान्य नागरिक एकत्र आले. लोकांनी वैद्यकीय आणीबाणीच्या वेळी अधिक सज्ज आणि तत्परतेने प्रतिसाद द्यावा, यासाठी प्रोत्साहन देणे हा या उपक्रमामागचा उद्देश होता. या संपूर्ण मोहिमेदरम्यान तब्बल 61,221 लोकांनी सीपीआर शिकण्याची शपथ घेतली आणि एका छोट्याशा आवाहनाचे रूपांतर एका मोठ्या जनचळवळीत झाले.

एका महिन्यापेक्षा अधिक काळ चाललेल्या या अभूतपूर्व प्रतिसादाची दखल घेत गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड्स™ ने नवी मुंबईतील अपोलो हॉस्पिटल्सच्या नावावर 'एका महिन्यात सीपीआर शिकण्याचा सर्वाधिक संकल्प' या विक्रमाची अधिकृत नोंद केली. अपोलो हॉस्पिटल्स एंटरप्रायझेस लिमिटेडच्या कार्यकारी उपाध्यक्षा डॉ. प्रीथा रेड्डी आणि सुप्रसिद्ध अभिनेत्री करिष्मा कपूर यांच्या उपस्थितीत हा सन्मान सोहळा पार पडला.

यावेळी बोलताना अपोलो हॉस्पिटल्स एंटरप्रायझेस लिमिटेडच्या कार्यकारी उपाध्यक्षा डॉ. प्रीथा रेड्डी म्हणाल्या, "गेली दहा वर्षे नवी मुंबईने आमच्यावर जो विश्वास दाखवला, त्याचा हा गौरव आहे. 61,000 हून अधिक लोक आज दुसऱ्याला मदत करण्यासाठी पुढे येण्यास सज्ज झाले आहेत. यामुळे एकजुटीची ताकद पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे. याच प्रेरणेतून 'सज्ज आहेत माझे हात' या चळवळीचा जन्म झाला आहे, एक अशी चळवळ जी देशभरातील सामान्य नागरिकांच्या हातात जीवन वाचवण्याचे ज्ञान देण्याचा प्रयत्न करते. नवी मुंबईने आमच्यावर जो विश्वास दाखवला आहे.

गुंतवणुकीसाठी सज्ज व्हा! 30 सप्टेंबरला उघडणार या नवा आयपीओ, जाणून घ्या डिटेल्स

■ पुणे : (दै. संध्या)

Sollfege Smart Electronics IPO Opening: स्मार्ट इलेक्ट्रॉनिक्स आणि प्रीमियम होम एंटरटेनमेंट क्षेत्रातील Sollfege Smart Electronics Limited आपला Initial Public Offering म्हणजेच IPO घेऊन येत आहे. कंपनीचा IPO 30 सप्टेंबर 2026 रोजी सब्स्क्रिप्शनसाठी खुला होणार असून 5 ऑक्टोबर 2026 रोजी बंद होईल. या IPOच्या माध्यमातून कंपनी ₹21.78 कोटी उभारण्याच्या तयारीत आहे.

IPO ची किंमत ₹55 प्रति शेअर Sollfege Smart Electronics IPO अंतर्गत एकूण 39,60,000 इक्विटी शेअर्स जारी केले जाणार आहेत. प्रत्येक शेअरची फेस व्हॅल्यू ₹10 असून, IPO ची इश्यू प्राइस ₹55 प्रति इक्विटी शेअर निश्चित करण्यात आली आहे. कंपनीच्या इक्विटी शेअर्सचे लिस्टिंग BSE SME प्लॅटफॉर्मवर करण्याचा प्रस्ताव आहे. IPO ची संपूर्ण इश्यू प्राइस अर्जाच्या वेळी भरावी लागणार आहे. Retail गुंतवणूकदारांसाठी किती रक्कम? या IPO मध्ये एका मार्केट लॉटमध्ये 2,000 इक्विटी शेअर्स असतील. Retail Investorsना किमान 2 लॉटसाठी अर्ज करावा लागणार आहे. म्हणजेच गुंतवणूकदारांना किमान ₹2.20 लाख गुंतवावे लागतील. HNI गुंतवणूकदारांसाठी किमान 3 लॉटची अट असून, त्यासाठी ₹3.30 लाख इतकी किमान गुंतवणूक आवश्यक असेल. Finshore Management Services Ltd. या IPOची Book Running Lead Manager आहे, तर Kfin Technologies Ltd. Registrar म्हणून काम पाहणार आहे. IPO मधून मिळालेला पैसा कुठे वापरणार?Sollfege Smart Electronics IPO मधून मिळणाऱ्या निधीचा मोठा भाग कंपनीच्या विस्तारासाठी वापरला जाणार आहे.

दोन महिन्यांत २५ हून अधिक रोबोटिक-असिस्टेड हृदय शस्त्रक्रिया यशस्वी

■ पुणे : (दै. संध्या)



जागतिक हृदय दिनानिमित्त, जुलै २०२६ मध्ये दा विंची एक्स आई रोबोटिक सर्जिकल सिस्टिम सुरू केल्यानंतर अवघ्या दोन महिन्यांत अपोलो हॉस्पिटल्स पुणे येथे २५ हून अधिक रोबोटिक-असिस्टेड हृदय शस्त्रक्रिया पूर्ण करण्यात आल्या आहेत. या यशस्वी टप्प्याची सुरुवात जुलैमध्ये करण्यात आलेल्या रुग्णालयातील पहिल्या रोबोटिक-असिस्टेड कोरोनरी आर्टरी बायपास ग्राफ्ट शस्त्रक्रियेपासून झाली. हे हृदयविकाराच्या उपचारांमध्ये मिनिमली इन्व्हेसिव्ह पद्धतींचा वाढता वापर अधोरेखित करते.

डॉ. नरेश मुनोट, इंटरव्हेन्शनल कार्डिओलॉजिस्ट, अपोलो हॉस्पिटल पुणे म्हणाले: "जागतिक हृदय दिन हा हृदयाच्या आरोग्याला प्राधान्य देण्याची आणि प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा व सातत्यपूर्ण जीवनशैलीतील बदलांचे महत्त्व अधोरेखित करण्याची एक महत्त्वाची आठवण आहे.

नियमित व्यायाम, संतुलित आहार, पुरेशी झोप तसेच मधुमेह, उच्च रक्तदाब आणि उच्च कोलेस्ट्रॉल यांसारख्या जोखीम घटकांचे वेळेवर व्यवस्थापन केल्याने दीर्घकालीन हृदय आरोग्य राखण्यास मदत होऊ शकते. नियमित आरोग्य तपासणी आणि वेळेवर उपचार यामुळे हृदयाशी संबंधित जोखीम गंभीर होण्यापूर्वी ओळखणे शक्य होते."

'आयसीआयसीआय लाइफ पार्टनर स्टॅक 2.0'चे अनावरण

■ मुंबई : (दै. संध्या)

आयसीआयसीआय प्रुडेंशियल लाइफ इन्शुरन्सने 2026 मध्ये आपल्या पार्टनर स्टॅकमध्ये नवीन क्षमतांचा समावेश करून त्याला 'आयसीआयसीआय लाइफ पार्टनर स्टॅक 2.0' असे स्वरूप दिले आहे. या स्टॅकमध्ये एआय-सक्षम साधने, भागीदारांच्या प्रणालींसोबत अधिक सखोल एकात्मिकरण आणि डिजिटल क्षमता यांचा समावेश करण्यात आला असून, विक्री, ऑनबोर्डिंग आणि ग्राहक सेवा या सर्व टप्प्यांमध्ये कंपनीच्या सल्लागार आणि वितरण नेटवर्कला यामुळे सक्षम केले जाते.

या सुधारणांचा उद्देश सल्लागार आणि वितरण भागीदारांना ग्राहकांसाठी योग्य उपाययोजना ओळखणे, कोटेशन तयार करणे, ग्राहकांचे ऑनबोर्डिंग करणे आणि डिजिटल माध्यमातून त्यांना सेवा देणे सुलभ करून ग्राहकांचा संपूर्ण प्रवास अधिक सोपा करणे हा आहे. eQuote App मध्ये एआय-आधारित उत्पादन शिफारस प्रणालीचा वापर करण्यात आला आहे. ही प्रणाली ग्राहकांचा विभाग आणि जीवनातील टप्पा लक्षात घेऊन योग्य उत्पादनांची शिफारस करते. तसेच, सल्लागारांना वैयक्तिकृत कोटेशन तयार करून ते ग्राहकांसोबत शेअर करण्याची सुविधाही या ॲपद्वारे मिळते. LIVA हा एआय सक्षम चॅटबॉट असून, तो संवादात्मक इंटरफेस उपलब्ध करून देतो. ग्राहकांशी संवाद साधताना सल्लागारांना उत्पादनांची वैशिष्ट्ये आणि कोटेशन सहजपणे उपलब्ध करून देण्यास तो मदत करतो. आयसीआयसीआय लाइफ पार्टनर स्टॅक 2.0 विषयी बोलताना आयसीआयसीआय प्रुडेंशियल लाइफ इन्शुरन्सचे मुख्य वितरण अधिकारी श्री. अमिष बंकर म्हणाले, "ग्राहकांना जीवन विम्याच्या उपाययोजना समजून घेण्यास आणि त्या उपलब्ध करून घेण्यास मदत करण्यात आमचे सल्लागार आणि वितरण भागीदार महत्त्वाची भूमिका बजावतात. योग्य उपाययोजना ओळखणे आणि कोटेशन तयार करण्यापासून ते ऑनबोर्डिंग आणि सेवा देण्यापर्यंतची दैनंदिन कामे अधिक सोपी आणि ग्राहकाभिमुख करण्यासाठी त्यांना डिजिटल आणि एआय सक्षम साधने उपलब्ध करून देणे हा आयसीआयसीआय लाइफ पार्टनर स्टॅक 2.0 चा उद्देश आहे. या क्षमतांना भागीदारांच्या प्रणालींसोबत एकत्र करून आम्ही प्रक्रिया अधिक जलद आणि सुरळीत करत आहोत. यामुळे आमचे भागीदार ग्राहकांच्या गरजा समजून घेण्यावर आणि त्या पूर्ण करण्यासाठी त्यांना सेवा देण्यावर अधिक लक्ष केंद्रित करू शकतात." पार्टनर स्टॅक 2.0 मुळे भागीदारांच्या प्रणालींसोबत अधिक सखोल एकत्रीकरणाची सुविधाही उपलब्ध होते. भागीदारांच्या CRM प्लॅटफॉर्मशी जोडल्यामुळे माहिती सहज उपलब्ध होते आणि ग्राहकांना सेवा देण्याची प्रक्रिया अधिक सुरळीत होते. API एकात्मिकरणाद्वारे भागीदार त्यांच्या स्वतःच्या प्लॅटफॉर्मवरून ग्राहक सेवा विनंती नोंदवू शकतात. या विनंत्यांवर आयसीआयसीआय प्रुडेंशियल लाइफ इन्शुरन्सकडून प्रक्रिया केली जाते आणि त्याबाबतचे अपडेट्स डिजिटल माध्यमातून शेअर केले जाते.

महावितरणच्या वीजयंत्रणेत खासगी व्यक्तींकडून कामे करून घेतल्यास थेट बडतर्फीसारखी कारवाई

■ मुंबई (दै. संध्या)

महावितरणच्या वीजयंत्रणेमधील नादुरुस्त ट्रान्सफॉर्मर बदलणे, तांत्रिक दुरुस्ती, वीजबिल वसूली किंवा मीटर काढणे यासारखी कामे विद्युत सुरक्षा नियमांचे पालन करून करण्याची पूर्णतः जबाबदारी तारमार्ग संवर्गातील तांत्रिक कर्मचाऱ्यांची आहेत. अशी तांत्रिक व जोखमीची कामे करवून घेण्यासाठी कोणत्याही प्रकारे खासगी व्यक्ती किंवा अनधिकृत मनुष्यबळाचा वापर करू नये. असे प्रकार आढळून आल्यास व विद्युत अपघात झाल्यास संबंधित दोषी कर्मचाऱ्यांविरुद्ध बडतर्फीसारखी कठोर कारवाई करण्यात येईल असे महावितरणकडून स्पष्ट करण्यात आले आहे. याबाबत संचालक (संचालन) श्री. धनंजय औंढेकर यांनी नुकतेच परिपत्रक काढून क्षेत्रीय मुख्य अभियंते व अधीक्षक अभियंत्यांना याबाबत खातरजमा करण्याचे आदेश दिले आहेत.

महावितरणच्या वीज वितरण यंत्रणेचे सुरक्षित संचालन, देखभाल व दुरुस्ती आणि ग्राहकांच्या तक्रारींचे तातडीने निवारण करणे हे प्रत्येक संबंधित अभियंता व तांत्रिक कर्मचाऱ्यांचे प्राथमिक कर्तव्य आहे. वीज यंत्रणेमध्ये प्रत्यक्ष कामे करण्यासाठी क्षेत्रीय कार्यालयांतर्गत तारमार्ग संवर्गामध्ये प्रधान तंत्रज्ञ, वरिष्ठ तंत्रज्ञ आणि तंत्रज्ञ यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. या कर्मचाऱ्यांवर नादुरुस्त वितरण रोहित्र बदलणे, डीओ फ्यूज बदलणे, विद्युत वाहिनीमधील बिघाड शोधणे, वीज पुरवठ्याच्या ग्राहक तक्रारी सोडवणे, वीजबिलांची वसूली करणे आणि थकबाकीदार ग्राहकांचे मीटर काढून आणणे यासारख्या कामांची जबाबदारी सोपवण्यात आलेली आहे.

तथापि, महावितरणचे काही तारमार्ग कर्मचारी ही कामे स्वतः करण्याऐवजी खासगी व्यक्ती किंवा अनधिकृत मनुष्यबळाचा वापर करून घेत असल्याचे प्रकार निदर्शनास आले आहे. याबाबतच्या तक्रारी मुख्यालयस्तरावर प्राप्त झाल्या आहेत. महावितरणच्या वीजयंत्रणेतील कामांसाठी खासगी व अनधिकृत व्यक्तींचा वापर करणे अत्यंत गंभीर बाब आहे. अशा अनधिकृत व्यक्तींकडे पुरेसे तांत्रिक ज्ञान व सुरक्षेचे प्रशिक्षण नसते. त्यामुळे विद्युत व यांत्रिक अपघात घडून संबंधित खासगी व्यक्ती तसेच कर्मचाऱ्यांचा अपघात होण्याची मोठी शक्यता आहे. याशिवाय वीज ग्राहक व महावितरणच्या मालमत्तेचे नुकसान सहन करावे लागते.

'सेंट्रल इलेक्ट्रिसिटी अथॉरिटी (मेझर्स रिलेटिंग टू सेफ्टी ॲण्ड इलेक्ट्रिक सप्लाय) रेग्युलेशन्स २०२३' मधील नियम ३ नुसार केवळ अधिकृत व्यक्तीच वीज वितरण सेवेशी संबंधित कामे करू शकते किंवा विद्युत वाहिन्या व उपकरणांवर काम करण्यास पात्र असते. त्यामुळे महावितरणकडून अधिकृतपणे नामनिर्देशित न केलेल्या किंवा अपात्र खासगी व्यक्तीस वीज यंत्रणेवर कोणत्याही प्रकारचे काम करण्यास परवानगी देणे अथवा त्याच्याकडून काम करून घेणे हे पूर्णपणे बेकायदेशीर व अनधिकृत कृत्य आहे. तसेच महावितरणच्या सेवाविनियमांनुसार ही बाब अत्यंत गंभीर स्वरूपाच्या गैरवर्तणुकीत मोडते.

या सर्व गंभीर बाबींची दखल घेत महावितरणचे संचालक (संचालन) श्री. धनंजय औंढेकर यांनी एका परिपत्रकाद्वारे कठोर निर्देश जारी केले आहेत.

अनधिकृत मनुष्यबळाचा वापर करून काम केल्याचे किंवा अशा प्रकारच्या गैरवर्तणुकीमुळे कोणतीही दुर्घटना, अपघात किंवा मालमत्तेचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित प्रकरणी तात्काळ चौकशी करण्यात यावी असे निर्देश संचालक श्री. औंढेकर यांनी दिले आहेत.

चौकशीअंती दोषी ठरणाऱ्या कर्मचाऱ्यांविरुद्ध सेवाविनियमातील तरतुदींनुसार बडतर्फी किंवा सेवासमाप्ती यासारखी कठोर कारवाई केली जाईल, असा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे. यासोबतच क्षेत्रिय कार्यालयातील मुख्य अभियंते व अधीक्षक अभियंते यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात वीज वितरणाच्या कामांमध्ये कुठल्याही परिस्थितीत खासगी व अनधिकृत मनुष्यबळाचा वापर होत नाही याची वेळोवेळी खातरजमा करावी असे आदेशही संचालक श्री. धनंजय औंढेकर यांनी दिले आहेत.

थोडक्यात पण महत्वाचे



शहरातील विविध साहित्य संस्थांच्या वतीने शिवाजीराव शिर्के यांना आदरांजली

पिंपरी : दैनिक संध्या

ज्येष्ठ साहित्यिक, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते शिवाजीराव शिर्के यांना पिंपरी-चिंचवड शहराच्या वतीने आदरांजली कार्यक्रम महाराष्ट्र कामगार कल्याण केंद्र , संभाजीनगर येथे नुकताच घेण्यात आला. पिंपरी चिंचवड शहरातील विविध सामाजिक संस्था, साहित्य संस्था यांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत आदरांजली वाहण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला हरिभक्त परायण शामराव गायकवाड यांनी प्रवचन केले. महंमद शरीफ मुलाणी यांनी प्रास्ताविक केले. याप्रसंगी गुणवंत कामगार कल्याण मंडळाच्या अध्यक्ष भारतीताई चव्हाण, बंधुता प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रकाश रोकडे, कामगार नेते अरुण बोऱ्हाडे, अशोककुमार पगारिया, नवयुग साहित्य व शैक्षणिक मंडळाचे अध्यक्ष राज अहेरराव, पिंपरी चिंचवड व्याख्यानमाला समन्वय समितीचे राजेंद्र घावटे, दिलासा संस्था आणि शब्दधन काव्यमंचाचे अध्यक्ष सुरेश कंक, मानवी हक्क संरक्षण आणि जागृती या संस्थेचे शहराध्यक्ष अण्णा जोगदंड, कलारंजन प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्रीकांत चौगुले, वसुंधरा पर्यावरण संस्थेचे अध्यक्ष तानाजी एकोंडे, गुणवंत कामगार राजेश हजारे, उद्योजक रामदास माने, गिर्यारोहक अरविंद वाडकर, महाराष्ट्र कामगार कल्याण केंद्र उद्योग नगर केंद्रप्रमुख प्रदीप बोरसे, गुणवंत कामगार सुदाम शिंदे, शंकर आथरे, कवी सुभाष चटणे, बी आर माडगूळकर, कवी शामराव सरकाळे, मुरलीधर दळवी, हरिभक्त परायण अशोक महाराज गोरे, भरत शिंदे, महेंद्र गायकवाड, शरद काणेकर, अण्णा गुरव, पांडुरंग सुतार, शिवराज शिंदे, नामदेव हुले या सर्व मान्यवरांनी शिवाजीराव शिर्के यांच्या आठवणी सांगत आदरांजली समर्पित केली. लेखक, कवी, ज्येष्ठ पत्रकार, इतिहास अभ्यासक, संपादक, सामाजिक कार्यकर्ते अशा विविध भूमिकेतून शिवाजीराव शिर्के यांनी जे योगदान दिले त्याच्या आठवणी मान्यवरांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केल्या. याप्रसंगी शहरातील असंख्य गुणवंत कामगार, साहित्यिक उपस्थित होते. हरिभक्त परायण साखरचंद लोखंडे यांनी पसायदान म्हणून आदरांजली सभेची सांगता झाली.

'रोजगार महाकुंभातून मिळणार करिअरच्या नव्या संधी : आमदार शंकर जगताप

पिंपरी : दैनिक संध्या

नोकरीच्या शोधात असलेल्या युवक-युवतींसाठी 'रोजगार महाकुंभ महाराष्ट्र २०२६' आयोजित करण्यात आला आहे. इच्छुक उमेदवारांनी त्वरित नोंदणी करून रोजगाराची संधी मिळवण्यासाठी महाकुंभात सहभागी व्हावे," असे आवाहन चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे आमदार शंकर जगताप यांनी केले आहे. वैश्विक नेतृत्व, देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या जन्मदिनानिमित्त हा रोजगार मेळावा मंगळवार, २९ सप्टेंबर २०२६ रोजी दि न्यू मिलेनियम इंग्लिश मीडियम स्कूल, नवी सांगवी येथे होणार आहे.या रोजगार महाकुंभात विविध क्षेत्रांतील नोकरीच्या संधींची माहिती, कंपन्यांशी थेट संवाद आणि रोजगार मार्गदर्शन उपलब्ध होणार असल्याचे आमदार जगताप यांनी नमूद केले. करिअरची पुढील दिशा ठरवण्यासाठी आवश्यक माहितीही युवक-युवतींना एकाच ठिकाणी मिळणार आहे. इच्छुक तरुण तरुणींनी अधिक माहितीसाठी 99210 99214, 73500 79955 किंवा 75759 81111 या क्रमांकावर तसेच https://docs.google.com/forms/d/1Ac8em2RstBW6zH6n9vO2k6trJKHABEGRqRm7KCFiogg/viewform?edit_requested=true या लिंकवर नावनोंदणी करावी आणि कार्यक्रमाला येताना आवश्यक कागदपत्रे सोबत आणावीत असे आवाहन आयोजकांनी केले आहे. पिंपरी-चिंचवड आणि परिसरातील आपल्या तरुण-तरुणींना त्यांच्या कौशल्यानुसार रोजगाराच्या सर्वोत्तम संधी एकाच छताखाली उपलब्ध व्हाव्यात, हा या 'रोजगार महाकुंभा'चा मुख्य उद्देश आहे. नामांकित कंपन्यांशी थेट संवाद साधून स्वतःच्या करिअरला नवी दिशा देण्याचे हे एक प्रभावी व्यासपीठ ठरेल. परिसरातील सर्व पात्र आणि इच्छुक युवक-युवतींनी या सुवर्णसंधीचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा आणि मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे शंकर जगताप आमदार,चिंचवड विधानसभा मतदारसंघ यांनी सांगितले.

पिंपरी-चिंचवडमध्ये महसुली कार्यालयांसाठी हक्काच्या जागेचा मार्ग मोकळा!

पिंपरी : दैनिक संध्या

पिंपरी-चिंचवड : भोसरी विधानसभा मतदारसंघातील मंडल अधिकारी आणि ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) कार्यालयांना हक्काची जागा मिळावी, यासाठी आमदार महेश लांडगे यांनी केलेल्या पाठपुराव्याला सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या मालकीच्या इमारतींमधील गाळे आणि खोल्या या कार्यालयांसाठी उपलब्ध करून देण्याबाबत कार्यवाही सुरू झाली असून, अपर तहसीलदार कार्यालयाने चार ठिकाणच्या जागांचा प्रस्ताव महापालिकेकडे पाठवला आहे. पुणे जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली १५ सप्टेंबर २०२६ रोजी झालेल्या बैठकीत आमदार लांडगे सहभागी झाले होते. मंडल अधिकारी आणि तलाठी कार्यालयांसाठी योग्य जागा उपलब्ध होण्याची गरज त्यांनी या बैठकीत मांडली. त्यानंतर महापालिकेच्या मालकीच्या इमारतींमधील उपलब्ध जागांबाबत पुढील कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या. त्या अनुषंगाने अपर तहसीलदार कार्यालयाकडून बोऱ्हाडेवाडी, डुडुळगाव, वडमुखवाडी आणि दापोडी येथील जागांचा प्रस्ताव पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेकडे पाठवण्यात आला आहे. संबंधित ग्राम महसूल अधिकाऱ्यांच्या अहवालानुसार प्रस्तावित जागा कार्यालयांसाठी योग्य आहेत. मात्र, जागा प्रत्यक्ष कार्यालयांना उपलब्ध करून देण्याची पुढील प्रक्रिया महापालिका स्तरावर पूर्ण होणे बाकी आहे. जमिनीचे अधिकार अभिलेख, सातबारा व ८-अ उतारे, फेरफार अर्ज आणि त्यांची स्थिती अशा बाबी महसूल व्यवस्थेशी संबंधित आहेत. राज्याच्या भूमी अभिलेख विभागाच्या संकेतस्थळावर यांपैकी अनेक सुविधा ऑनलाइन उपलब्ध असल्या, तरी अर्ज, नोंदी किंवा स्थानिक पातळीवरील कामांबाबत नागरिकांना संबंधित महसूल यंत्रणेशी संपर्क साधावा लागतो. अशा वेळी कार्यालयांचा निश्चित आणि सहज पोहोचता येणारा पत्ता असणे नागरिकांच्या दृष्टीने उपयोगाचे ठरते. महाराष्ट्र भोसरी मतदारसंघातील संबंधित भागांमध्ये महसुली कार्यालयांसाठी जागा उपलब्ध झाल्यास नागरिकांना आपल्या परिसरातच अधिकाऱ्यांशी संपर्क साधणे आणि कामाचा पाठपुरावा करणे सोयीचे होऊ शकते. विशेषतः कार्यालय कुठे आहे, कोणत्या ठिकाणी अर्जाबाबत चौकशी करायची किंवा आवश्यक कागदपत्रांसाठी कोणाशी संपर्क साधायचा, याबाबत अधिक स्पष्टता मिळण्याची अपेक्षा आहे. कार्यालये सुरू होण्याची तारीख मात्र पुढील प्रशासकीय कार्यवाही पूर्ण झाल्यानंतरच स्पष्ट होईल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली या विषयाचा सातत्याने पाठपुरावा केल्याचे आमदार महेश लांडगे यांनी म्हटले आहे. प्रस्तावित जागांबाबत महापालिकेची कार्यवाही लवकर पूर्ण व्हावी.

विधानसभा उपाध्यक्ष बनसोडे यांचा शनिवारी भव्य नागरी सत्कार सोहळा

सुनेत्रा पवार, पार्थ पवार यांच्यासह अनेक मंत्री, आमदार उपस्थित राहणार



■ पिंपरी (दै. संध्या)

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ८ जुलै १९४५ रोजी स्थापन केलेल्या पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या शासकीय नियामक मंडळावर महाराष्ट्र राज्य विधान सभेचे उपाध्यक्ष अण्णासाहेब बनसोडे यांची नियुक्ती झाली आहे. त्यानिमित्त शनिवारी (दि. ३ ऑक्टोबर) सकाळी ११ वाजता अण्णासाहेब बनसोडे यांचा केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले यांच्या हस्ते भव्य नागरी सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या सत्कार सोहळ्याचे अध्यक्षस्थान पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे महापौर रवी लांडगे हे भूषवणार आहेत. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा ताई पवार, सामाजिक न्याय मंत्री महाराष्ट्र राज्य संजय शिरसाट, पालकमंत्री भरतशेठ गोगावले, खासदार पार्थ पवार, खासदार श्रीरंग बारणे, आमदार महेश दादा लांडगे, शंकर जगताप, गोपीचंद पडळकर, उमाताई खापरे, शंकर मांडेकर, बापू पठारे, सुनील कांबळे, सुनील शेळके, माजी आमदार विलास लांडे, सुनील टिंगरे आदी उपस्थित राहणार आहेत.

हॉटेल रागा पॅलेस, काळेवाडी विजयनगर पिंपरी (मदर टेरेसा उड्डाणपूल लगत) येथे सकाळी ११ वाजता, हा भव्य नागरी सत्कार सोहळा होणार आहे. याचे आयोजक महाराष्ट्र विधानसभा उपाध्यक्ष माननीय अण्णासाहेब बनसोडे गौरव समिती पिंपरी चिंचवड शहर आणि सहआयोजक नगरसेवक सिद्धार्थ बनसोडे युवा मंच पिंपरी चिंचवड शहर यांच्या वतीने समितीचे पदाधिकारी सुरेश निकाळजे, अंजना गायकवाड, गोपाळ मोरे, निलेश निकाळजे, प्रमोद क्षीरसागर, गंगाताई धेंडे, नितीन ओव्हाळ, संदीप पिसाळ, राहुल सोनवणे यांनी प्रसिद्धीस दिली आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी वंचित, शोषित आणि दुर्बल घटकांना विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी शिक्षणाच्या माध्यमातून सक्षम करण्याचे ध्येय ठेवून पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ऐतिहासिक वारसा पुढे नेणारी ही एक महत्वपूर्ण शैक्षणिक संस्था आहे. सध्या या संस्थेचे अध्यक्ष केंद्रीय मंत्री रामदास आठवले साहेब आहेत. या संस्थेच्या शासकीय नियामक मंडळावर अण्णासाहेब बनसोडे यांची नियुक्ती होणे हे अभिमानास्पद आणि गौरवास्पद आहे.

अण्णा बनसोडे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली पिंपरी चिंचवड शहरात एक कार्यकर्ता म्हणून सामाजिक आणि राजकीय कार्यात सहभाग घेऊन सुरुवात केली. पिंपरी चिंचवड महानगरपालिका नगरसेवक, स्थायी समितीचे अध्यक्ष, पिंपरी विधानसभा मतदार संघातून तीन वेळा आमदार आणि महाराष्ट्र राज्य विधानसभेचे उपाध्यक्षपद असा अण्णासाहेब बनसोडे यांचा राजकीय चढता आलेख आम्हा सर्व कार्यकर्त्यांना प्रेरणादायी आणि मार्गदर्शक आहे. पीपल्स एज्युकेशन सोसायटी या ऐतिहासिक संस्थेवर अण्णा बनसोडे यांची नियुक्ती करून सरकारने त्यांचा आणि पिंपरी चिंचवड शहरातील नागरिकांचा सन्मान केला आहे अशी भावना शहरवासीयांच्या मनात आहे. अण्णा बनसोडे यांच्या या नियुक्तीमुळे शहरात सर्वत्र आनंदाचे वातावरण आहे हा आनंद द्विगुणीत करण्याच्या उद्देशाने शनिवारी (दि.३) सकाळी ११ वाजता हजारो नागरिकांनी हॉटेल रागा पॅलेस येथील भव्य नागरी सत्कार सोहळ्यास उपस्थित रहावे असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

दोन ऑक्टोबरला जलसमाधी आंदोलन

■ पिंपरी : (दै. संध्या)



पवना धरणग्रस्तांचे गेल्या साठ वर्षांपासून रखडलेले पुनर्वसन तातडीने पूर्ण करावे, तसेच पवना बंदिस्त जलवाहिनी प्रकल्प रद्द करावा अशी मागणी पवना धरणग्रस्त संयुक्त संघटनेने केली आहे. याबाबत संघटनेच्या वतीने धरणग्रस्तांच्या विविध प्रलंबित प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी २ आक्टोंबरला पवना धरणात शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली जलसमाधी आंदोलन करण्याचे ठरविले आहे,अशी माहिती सोमाटणे येथे झालेल्या पत्रकार परिषदेत देण्यात आली.

या पत्रकार परिषदेत धरणग्रस्त संयुक्त संघटनेचे अध्यक्ष नारायण बोडके, कार्याध्यक्ष रामभाऊ कालेकर आणि सचिव बाळासाहेब काळे , ज्ञानेश्वर दळवी, जमीन हक्क परिषदेचे अध्यक्ष माऊली सोनावणे, रविंद्र भेगडे, रघुवीर शेलार,भारत ठाकूर, नरेंद्र मुऱ्हे, प्रकाश बालवडकर उपस्थित होते. मागण्यांसाठी पाठपुरावा सुरू ठेवला आहे. संघटनेच्या म्हणण्यानुसार, ९ मे १९७३ च्या आदेशानुसार यापूर्वी ज्या खातेदारांचे पुनर्वसन झाले आहे, त्याच धर्तीवर उर्वरित प्रलंबित खातेदारांचेही पुनर्वसन करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली. पुनर्वसित गावांना गावठाणाचा दर्जा देऊन आवश्यक नागरी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, तसेच पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीत असलेल्या नोकऱ्यांमध्ये पवना धरणग्रस्त खातेदारांच्या वारसांसाठी ५ टक्के पुनर्वसन राखीव कोटा प्राधान्याने ठेवावा, अशी मागणी संघटनेने केली आहे. तसेच अद्याप वाटप न झालेल्या धरणग्रस्त खातेदारांची यादी व संबंधित संकलन तक्ता अद्ययावत करावा. पूर्वी वाटप झाल्यानंतरही प्रत्यक्ष ताबा न मिळालेल्या खातेदारांना ताबा द्यावा किंवा त्यांचा नवीन वाटप यादीत समावेश करावा.

स्तंभलेखक नलावडे यांना नक्षत्राचं देणं काव्यमंच यांचा 'समाजभूषण पुरस्कार'

■ चिंचवड(दै. संध्या)



नक्षत्रांचं देणं काव्यमंच, पुणे आयोजित २७ वी राज्यस्तरीय काव्यमैफल व पुरस्कार वितरण समारंभ नुकताच सायन्स पार्क, चिंचवड, पुणे येथे संपन्न झाला. याप्रसंगी जुन्नर तालुक्याचा व्यक्तीचित्रणात्मक इतिहास असलेल्या आणि जुन्नर तालुक्याचे सांस्कृतिक संचित असा गौरव प्राप्त झालेल्या 'शिवनेरीची श्रीमंती' आणि 'शिवनेरीचे वैभव' या गाजलेल्या पुस्तकाचे लेखक स्तंभलेखक संजय नलावडे यांना त्यांच्या या संशोधनात्मक कामासाठी 'समाजभूषण पुरस्कार - २६' देऊन गौरविण्यात आले. समाजासाठी योगदान देणाऱ्या विविध क्षेत्रातील मान्यवरांना नक्षत्राचं देणं काव्यमंच पुणे आणि या मंचाचे राष्ट्रीय अध्यक्ष कवी वादळकार राजेंद्र सोनवणे यांच्याकडून दरवर्षी पुरस्कार देऊन गौरविण्यात येते.

सहजसुंदर भाषाशैली, प्रभावी लेखनशैली, उत्तम मांडणी आणि संशोधनात्मक आणि अभ्यासपूर्ण लेखन अशी स्तंभलेखक संजय नलावडे यांची वाचकांना ओळख आहे. संजय नलावडे यांनी गेल्या दोनशे वर्षांमधील विविध क्षेत्रातील काळाच्या पडद्याआड गेलेली किंवा काळाच्या ओघात विस्मृतीत गेलेली अनेक रत्ने शोधून त्यांची नवीन पिढीला अभ्यासपूर्ण पद्धतीने ओळख करून दिली.

गोल्डन गाईजच्या तिसऱ्या गोल्डन वाहनावरही पोलिसांची कारवाई

■ पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड शहरात चर्चेत असलेल्या 'गोल्डन गाईज'च्या आणखी एका आलिशान गोल्डन मर्सिडीजवर पिंपरी-चिंचवड वाहतूक पोलिसांनी कारवाई केली आहे. या प्रकरणी चालक सनी वाघचौरे आणि वाहन मालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांनी ६ हजार ५०० रुपयांचा दंड ठोठावला आहे.

पिंपरीतील साई चौक परिसरात गस्तीवर असताना वाहतूक पोलिसांना GJ 06 PE 4444 क्रमांकाची गोल्डन मर्सिडीज-बेंझ आढळून आली. वाहनाची तपासणी केली असता काचांवर नियमबाह्य काळी फिल्म, फॅन्सी नंबर प्लेट, नोंदणी न करता बदललेला वाहनाचा रंग, वैध विम्याचा अभाव तसेच वाहतुकीला अडथळा निर्माण होईल अशा पद्धतीने वाहन उभे केल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. पोलिसांनी तातडीने कारवाई करत काळी फिल्म आणि फॅन्सी नंबर प्लेट जागीच काढून ताब्यात घेतली. मोटार वाहन कायद्यातील विविध तरतुदींच्या उल्लंघनाबद्दल चालक आणि वाहन मालकाविरुद्ध कारवाई करण्यात आली. गोल्डन गाईजच्या वाहनांवर यापूर्वीही वाहतूक पोलिसांकडून कारवाई करण्यात आली आहे. आता तिसऱ्या वाहनावरही कारवाई झाल्याने, वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांबाबत पोलिसांकडून पुढे कोणती भूमिका घेतली जाते, याकडे लक्ष लागले आहे. वाहतूक नियमांचे पालन करा.

'मन की बात'चा सलग चौथ्या महिन्यात १००% बुथवर यशस्वी जागर!

■ पिंपरी- चिंचवड (दै. संध्या)



भोसरी विधानसभा मतदारसंघात माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'मन की बात' कार्यक्रमाचे सलग चौथ्या महिन्यात मतदारसंघातील सर्व ४८३ बुथवर, म्हणजेच १०० टक्के बुथवर यशस्वी आयोजन करण्यात आले. आमदार महेश लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली राबवलेल्या या उपक्रमामुळे भोसरीतील भाजपाची संघटनात्मक ताकद आणि कार्यकर्त्यांची निष्ठा पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे. भाजपाचे वरिष्ठ उपाध्यक्ष संजय पटनी यांनी ही माहिती दिली.

'मन की बात' हा केवळ रेडिओ कार्यक्रम नसून देशाच्या प्रत्येक घटकाशी थेट संवाद साधणारा जनसंवाद आहे, असे पटनी यांनी सांगितले. सामान्य माणसांच्या असामान्य कार्याची दखल घेणारा आणि राष्ट्रनिर्माणात प्रत्येकाचे योगदान अधोरेखित करणारा हा उपक्रम घराघरांत पोहोचावा, या उद्देशाने मतदारसंघात सातत्याने प्रयत्न सुरू आहेत.सलग चार महिने सर्व ४८३ बुथवर कार्यक्रम घेणे सोपे नसते. त्यासाठी सातत्य, शिस्त, संघटन कौशल्य आणि देशाप्रती निष्ठा लागते, ती कार्यकर्त्यांनी सिद्ध करून दाखवली, असे पटनी यांनी नमूद केले. या यशात बुथप्रमुख व बुथ कार्यकर्ते, शक्तिकेंद्रप्रमुख, मंडल अध्यक्ष, पदाधिकारी, तसेच महिला, युवा, ज्येष्ठ नागरिक आणि भोसरीतील जागरूक नागरिकांचा मोलाचा वाटा असल्याचे त्यांनी सांगितले. बुथप्रमुख व बुथ कार्यकर्ते : प्रत्येक बुथवर नियोजन, व्यवस्था आणि उपस्थितीची जबाबदारी निष्ठेने पार पाडली. शक्तिकेंद्रप्रमुख, मंडल अध्यक्ष व पदाधिकारी : समन्वय साधून संपूर्ण मतदारसंघात एकसमान अंमलबजावणी केली. महिला, युवा व ज्येष्ठ नागरिक : उत्साहाने सहभागी होऊन कार्यक्रमाची शोभा वाढवली. भोसरीतील नागरिक : वेळ काढून राष्ट्रहिताचे विचार ऐकले आणि इतरांपर्यंत पोहोचवले. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रेरणादायी नेतृत्व आणि प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांचे मौलिक मार्गदर्शन लाभत असल्याचे पटनी यांनी आवर्जून सांगितले.

महानगरपालिकेच्या वतीने थेरगाव येथे सफाई मित्र सुरक्षा शिबिर संपन्न

■ पिंपरी(दै. संध्या)



शहराच्या स्वच्छतेची जबाबदारी पार पाडणाऱ्या सफाई सेवकांच्या आरोग्याची नियमित तपासणी तसेच सुरक्षित कामकाजाबाबत जनजागृती करण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या वतीने 'स्वच्छता ही सेवा २०२६' अंतर्गत 'सफाई मित्र सुरक्षा शिबिरा'चे आयोजन करण्यात आले.

थेरगाव येथील कै. शंकरराव गावडे कामगार भवन येथे झालेल्या या शिबिरात 'अ', 'ब', 'ड' 'ग' आणि 'ज' या पाच क्षेत्रीय कार्यालयांतर्गत कार्यरत १,५०० हून अधिक सफाई सेवकांनी सहभाग घेतला होता,या शिबिराचे उद्घाटन ग क्षेत्रीय अधिकारी मुकेश कोळप यांनी केले.

यावेळी आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अभयचंद्र दादेवार, उप आयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, सहाय्यक आरोग्य अधिकारी श्रीराम गायकवाड, सुधीर वाघमारे, अंकुश झिटे, अतुल सोनवणे, राजू साबळे, शांताराम माने, डॉ. संजय सोनेकर, डॉ. शंकर मोसलगी, आदी उपस्थित होते. शिबिरात सफाई सेवकांची हिमोग्लोबिन, रक्तदाब, उच्च रक्तदाब आणि मधुमेहाची मोफत तपासणी करण्यात आली. दैनंदिन कामाच्या धावपळीत आरोग्याकडे दुर्लक्ष होऊ नये, यासाठी संतुलित आहार, व्यायाम, योगासने, प्राणायाम, ताणतणावाचे व्यवस्थापन आणि नियमित आरोग्य तपासणीचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. कामाच्या स्वरूपानुसार सुरक्षिततेच्या उपाययोजना आणि आरोग्यविषयक सवयींबाबतही माहिती देण्यात आली.

उप आयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल म्हणाले, सफाई सेवकांचे काम शारीरिकदृष्ट्या आव्हानात्मक असल्याने संतुलित आहार, नियमित व्यायाम, योगासने आणि आरोग्य तपासणी आवश्यक आहे. आरोग्यविषयक समस्या वेळीच लक्षात आल्यास त्यावर योग्य उपचार आणि प्रतिबंधात्मक उपाय करता येतात. आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे म्हणाले, नियमित आरोग्य तपासणीमुळे प्राथमिक अवस्थेतील आरोग्यविषयक समस्या वेळीच निदर्शनास येतात. त्यामुळे सफाई सेवकांनी आरोग्य तपासणीसोबतच आहार आणि ताणतणावाच्या व्यवस्थापनाकडेही लक्ष द्यावे. सफाई सेवकांच्या आरोग्यासोबतच त्यांच्या कुटुंबातील युवक-युवतींना कौशल्यविकास आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने समाजविकास विभागाच्या वतीने 'लाईट हाऊस कौशल्य'च्या माध्यमातून माहिती केंद्र उभारण्यात आले होते. या केंद्राद्वारे १८ ते ३५ वयोगटातील युवक-युवतींसाठी उपलब्ध असलेल्या विविध मोफत कौशल्य प्रशिक्षण अभ्यासक्रमांची माहिती वैशाली खरात यांनी दिली. यामध्ये लेखा सहाय्यक, विद्युत उपकरण दुरुस्ती, विक्री प्रतिनिधी, विद्युत वाहन तंत्रज्ञ, बँकिंग व वित्तीय सेवा, सामान्य परिचर, परिचर्या सेवा, संगणक नियंत्रित यंत्रचालक, बँक ग्राहक संबंध अधिकारी, माहिती विश्लेषक, चित्ररचना, उपाहारगृह व्यवस्थापन, वाहतूक व साठवणूक व्यवस्थापन, विद्युत मंडल जोडणी उपकरण हाताळणी, संगणकीय विपणन, वैयक्तिक प्रशिक्षण, क्रीडा पोषण, बालसंगोपन व शिक्षण, वातानुकूलन व शीतकरण यंत्र दुरुस्ती, किरकोळ विक्री केंद्र व्यवस्थापन, दुचाकी दुरुस्ती, हॉटेल व्यवस्थापन आणि भ्रमणध्वनी दुरुस्ती आदी कौशल्य प्रशिक्षण अभ्यासक्रमांची माहिती देण्यात आली.

थोडक्यात पण महत्वाचे



श्री सिद्धेश्वर विकास सोसायटीची वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीत संपन्न

कोऱ्हाळे : दैनिक संध्या

श्री सिद्धेश्वर विकास सोसायटीची वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीत पार पडली. सोसायटीच्या सर्वसाधारण सभेप्रसंगी प्रमुख उपस्थित मान्यवर श्री सोमेश्वर कारखान्याचे माजी व्हाईस चेअरमन व विद्यमान संचालक श्री.सुनिल तात्या भगत यांनी त्यांच्या भाषणात संस्था हि सभासदांचा प्रपंच आहे. तसेच साखर कारखान्याच्या माध्यमातून सभादांना कशा प्रकारे मदत करता येईल यावर जास्त भर दिला.त्याच बरोबर त्यांचे चुलते स्वर्गीय भगत बापू आणि जुन्या-जाणत्या लोकांच्या आठवणींना उजाळा दिला. श्री.विलास भगत यांनी प्रास्ताविक केले. सचिव आनंदा जायपत्रे यांनी अहवाल वाचन केले. यावेळी संस्थेच्या चेअरमन सौ.आशाताई सावंत, व्हाईस चेअरमन सौ.मंजुळा भगत, श्री.दत्तात्रय भगत, बाळासाहेब हगारे, विश्वास भगत, विठ्ठल भगत, शरद खोमणे, भरत पवार, राहुल मिसाळ, नाना खोमणे यांसह सर्व संचालक मंडळ, स्टाफ व सोसायटीचा सभासदवर्ग मोठ्या प्रमाणात उपस्थित होता.

रोहित बनकर, सुरज भोसले व निलेश गजरमल यांची पक्षातून हकालपट्टी

बारामती : दैनिक संध्या

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष या.श्री.हर्षवर्धन सपकाळ यांच्या विरोधात अनुचित व पक्षशिस्तीस बाधक ठरतील अशा स्वरूपाचे भाष्य केले आहे व पक्ष शिस्तीचा भंग करून, पक्षाची बदनामी केल्याप्रकरणी रोहित बनकर, सुरज भोसले, निलेश गजरमल यांची पक्षातून हकालपट्टी करण्यात आली. बारामती दौऱ्याच्या आढावा बैठकीमध्ये पक्षाच्या अधिकृत भूमिकेच्या विरोधात भाष्य करून पक्षविरोधी भूमिका मांडली. तसेच बैठकीदरम्यान केलेल्या चुकीच्या वक्तव्याचे रेकॉर्डींग करून सोशल मीडियावर व्हायरल करून पक्षाची बदनामी केली.हा प्रकार पक्षाच्या शिस्तीच्या दृष्टीने गंभीर असून पक्षाची प्रतिमा व संघटनात्मक शिस्त यावर परिणाम होऊ शकतो. पक्षाची शिस्त, पक्षाचे अधिकृत निर्णय तसेच वरिष्ठ नेतृत्वाचा सन्मान राखणे ही प्रत्येक पदाधिकारी व कार्यकर्त्याची जबाबदारी आहे.पक्षाच्या अधिकृत भूमिकेच्या विरोधात वक्तव्य करणे अथवा पक्षांतर्गत बैठकीमध्ये पक्षविरोधी भूमिका मांडणे हे पक्षशिस्तीच्या विरोधात आहे. त्यामुळे गंभीर दखल घेऊन पुणे जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने रोहित बनकर, सुरज भोसले व निलेश गजरमल या तिघांवर शिस्तभंगाची कारवाई करून काँग्रेस पक्षातून हकालपट्टी करण्यात आली आहे.



ग्रामीण भागातील मेळावे सर्वसामान्य नागरिकांसाठी आधारवड : सागर थोरात

कोरेगावमुळ : दैनिक संध्या

ग्रामीण भागातील नागरिकांना विविध शासकीय कागदपत्रांसाठी शहराच्या ठिकाणी जावे लागू नये, तसेच गावातील शेवटच्या घटकापर्यंत शासकीय सुविधांचा लाभ पोहोचावा, या उद्देशाने हिंगणगाव येथे आधार कार्ड दुरुस्ती व नोंदणी, मतदार नाव नोंदणी तसेच महिला शेतकरी प्रमाणपत्र मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या मेळाव्यास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मोठ्या संख्येने नागरिकांनी सहभागी होत आधार कार्डमधील दुरुस्ती, नवीन नोंदणी, मतदार यादीत नाव नोंदणी तसेच महिला शेतकरी प्रमाणपत्रासंदर्भातील आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून घेतली. या उपक्रमाचे आयोजन हिंगणगावचे माजी सरपंच सागर थोरात यांनी केले होते. यावेळी बोलताना सागर थोरात म्हणाले, 'गावपातळीवर अशा प्रकारचे उपक्रम नियमितपणे आयोजित केल्यास ग्रामीण भागातील नागरिकांना मोठा फायदा होतो. शासकीय कार्यालयांच्या फेऱ्या कमी होऊन गावातील शेवटच्या घटकापर्यंत विविध सुविधांचा लाभ पोहोचविता येतो. सर्वसामान्य नागरिकांना आवश्यक कागदपत्रे सहज उपलब्ध करून देण्यासाठी असे उपक्रम उपयुक्त ठरतात.' यावेळी यशवंत सहकारी साखर कारखान्याचे संचालक कुंडलिक थोरात, हिंगणगावचे माजी सरपंच कुंडलिक थोरात, भगवान गडदे, काळुराम थोरात, हिंगणगावचे पोलीस पाटील काळुराम थोरात, नितेश धावडे, विजय थोरात, सूरज थोरात, मनोहर गडदे आदी उपस्थित होते.

द्राक्ष, मनुके आयातीसाठी कठोर नियमावली तयार करा : अनिल मेहेर

नारायणगाव : दैनिक संध्या

भारतात बेकायदेशीर मार्गाने आयात होणाऱ्या द्राक्ष, मनुके तसेच इतर सुकविलेल्या फळांच्या आयातीवर कठोर निर्बंध घालून प्रभावी नियमावली तयार करावी, अशी मागणी नारायणगाव येथील कृषी विज्ञान केंद्राचे चेअरमन आणि भारतीय अन्न सुरक्षा व मानक प्राधिकरणाच्या सल्लागार समितीचे सदस्य कृषिरत्न अनिल मेहेर यांनी केली. विशाखापट्टणम येथे भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाच्या (FSSAI) ५१ व्या परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत ते बोलत होते. यावेळी द्राक्ष व मनुका उत्पादकांचे हित जपणे, अन्नपदार्थांची सुरक्षितता सुनिश्चित करणे आणि दूध उत्पादकांना न्याय मिळवून देणे या मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली. परदेशातून बेकायदेशीर मार्गाने भारतात येणाऱ्या मनुके आणि इतर सुकविलेल्या फळांमध्ये विविध रासायनिक अवशेष आढळण्याची शक्यता आहे. अशा उत्पादनांची बाजारपेठेत विक्री होत असल्यास ग्राहकांच्या आरोग्याच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. त्याचबरोबर बेकायदेशीर आयातीमुळे देशांतर्गत मनुका उत्पादकांना आर्थिक नुकसान सहन करावे लागत असल्याचे मेहेर यांनी बैठकीत निदर्शनास आणून दिले. या पार्श्वभूमीवर अशा उत्पादनांच्या आयातीवर नियंत्रण आणण्यासाठी कठोर नियमावली तयार करून तिची प्रभावी अंमलबजावणी करावी, अशी मागणी मेहेर यांनी केली. या मागणीला प्रतिसाद देत अशा उत्पादनांच्या आयातीवर नियंत्रण आणण्यासाठी नवीन नियमावली तयार करण्याचा विषय अजेंड्यावर घेऊन आवश्यक कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन भारतीय अन्न सुरक्षा व मानक प्राधिकरणाचे अध्यक्ष रणजित पुनहोनी यांनी दिले. द्राक्ष, मनुके आणि इतर सुकविलेल्या फळांच्या बेकायदेशीर आयातीवर नियंत्रण आणण्यासाठी कठोर उपाययोजना झाल्यास देशातील द्राक्ष व मनुका उत्पादकांना देशांतर्गत बाजारपेठेत अधिक योग्य संधी मिळण्यास मदत होईल, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

रयत शाळांमध्ये स्पर्धात्मक प्रशिक्षण केंद्रे ही काळाची गरज - प्राचार्य रत्नपारखी

■ कवठे यमाई (दै. संध्या)



रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक, शिक्षणमहर्षी पद्मभूषण कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३९ व्या जयंतीनिमित्त शिरूर तालुक्यातील कवठे येमाई येथील न्यू इंग्लिश स्कुल व जुनिअर महाविद्यालयात विविध शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांनी जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली.कर्मवीरांच्या शैक्षणिक विचारांचे स्मरण करून विद्यार्थ्यांनी त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन शिक्षणाच्या माध्यमातून समाजाच्या विकासात योगदान द्यावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. डी. जी. हिंगणे होते. प्रमुख उपस्थिती म्हणून प्राचार्य किसनराव रत्नपारखी उपस्थित होते,तर प्रमुख वक्ते म्हणून डॉ. ज्ञानेश्वर थोरात यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी मार्गदर्शन करताना प्राचार्य किसनराव रत्नपारखी यांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शैक्षणिक कार्याचा आढावा घेतला.ग्रामीण व सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे महान कार्य कर्मवीरांनी केले.आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ पदवीचे शिक्षण पुरेसे नसून विद्यार्थ्यांना विविध स्पर्धात्मक परीक्षांसाठी सक्षम करणे आवश्यक आहे.त्यामुळे रयत शिक्षण संस्थेच्या शाळांमध्ये स्पर्धात्मक परीक्षेच्या प्रशिक्षणासाठी स्वतंत्र प्रशिक्षण केंद्रे उभारणे ही आता काळाची गरज आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

विद्यार्थ्यांनी शालेय शिक्षणाबरोबरच स्पर्धा परीक्षा, सामान्य ज्ञान, चालू घडामोडी, विज्ञान, तंत्रज्ञान तसेच विविध कौशल्यांचा अभ्यास करावा. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता असून योग्य मार्गदर्शन व संधी मिळाल्यास ते राज्य व राष्ट्रीय पातळीवर उल्लेखनीय यश संपादन करू शकतात, असेही रत्नपारखी यांनी नमूद केले. प्रमुख वक्ते डॉ. ज्ञानेश्वर थोरात यांनी कर्मवीरांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकताना, कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शिक्षण हे केवळ नोकरी मिळविण्याचे साधन न ठेवता समाजपरिवर्तनाचे प्रभावी माध्यम बनवले असे सांगितले. "कमवा आणि शिका" या विचारातून त्यांनी हजारो विद्यार्थ्यांच्या आयुष्याला नवी दिशा दिली. प्रतिकूल परिस्थितीतही शिक्षणाची वाट न सोडता विद्यार्थ्यांनी कर्मवीरांच्या विचारांचा आदर्श घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी माजी पंचायत समिती सुदाम इचके, विद्यमान पंचायत समिती सदस्य कांचनताई सांडभोर, रामदास सांडभोर, रितेश शहा, पांडुरंग भोर, जवाहरलाल बाफना, संदीप वागदरे, सोपान वागदरे, अविनाश पोकळे, भाऊसाहेब घोडे, अरुण मुंजाळ, विठ्ठल मुंजाळ, संतोष उचाळे, डॉ.आरतीताई उचाळे, प्रशांत सांगडे, प्रमोद गायकवाड माजी प्राचार्य आर के मोमीन सर, रामदास रोहिले सर, भरत रोडे, विलास सालकर, सुप्रिया सरोदे, मच्छिंद्र पुंडे इत्यादी मान्यवर उपस्थित होते. अध्यक्षीय मनोगत प्रा. डॉ. डी. जी. हिंगणे यांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कार्याची आजच्या काळातील उपयुक्तता अधोरेखित केली. शिक्षणासोबत संस्कार, स्वावलंबन, सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्रप्रेम विद्यार्थ्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग झाले पाहिजेत, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमादरम्यान कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन व अभिवादन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी भाषणे, विचारप्रदर्शन तसेच विविध उपक्रमांतून कर्मवीरांच्या कार्याला अभिवादन केले. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीसाठी शुभेच्छा दिल्या.कर्मवीरांच्या विचारांचा वारसा पुढे नेत ग्रामीण विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबत स्पर्धात्मक परीक्षांसाठी सक्षम करण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला. त्यामुळे कवठे विद्यालयातील हा जयंती सोहळा केवळ स्मरणाचा कार्यक्रम न ठरता विद्यार्थ्यांना नव्या शैक्षणिक दिशेची प्रेरणा देणारा ठरला.

श्री तुळजाभवानी मातेच्या पलंगाचे जुन्नर येथून तुळजापूरकडे प्रस्थान

■ नारायणगाव (दै. संध्या)

श्री तुळजाभवानी माता श्रमनिद्रेसाठी तुळजापूर येथे जात असताना, मातेच्या पवित्र पलंगाचे जुन्नर शहरातून अत्यंत भक्तीमय आणि पारंपरिक वातावरणात रविवार, दि.२७ सप्टेंबर रोजी भंडारा-खोबऱ्याची उधळण करत आणि वाद्यांच्या गजरात मातेच्या पलंगाचे प्रस्थान झाले.

शनिवारी, १९ सप्टेंबर रोजी आंबेगाव तालुक्यातील घोडेगाव येथून श्री तुळजाभवानी मातेच्या पलंगाचे जुन्नर शहरात मोठ्या उत्साहात आगमन झाले होते. जुन्नरमध्ये आगमन झाल्यानंतर मातेच्या पलंगाची आणि पालखीची संपूर्ण शहरातून वाजतगाजत भव्य मिरवणूक काढण्यात आली.

जुन्नर येथील तिळवण तेली समाज कार्यालयात या पवित्र पलंगाचे एकूण आठ दिवस वास्तव्य होते. या उत्सव काळात तिळवण तेली समाजाच्या वतीने विविध धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. शनिवारी, २६ सप्टेंबर रोजी मंदिरात भव्य होमहवन पार पडले आणि संध्याकाळच्या सुमारास भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. या आठ दिवसांच्या काळात मातेच्या दर्शनासाठी संपूर्ण जुन्नर शहरातून आणि ग्रामीण भागातून भाविकांनी प्रचंड गर्दी केली होती.

विद्यार्थ्यांच्या दप्तराचे ओझे कमी करण्यासाठी 'राजे ग्रुप'चे गटशिक्षणाधिकाऱ्यांना निवेदन

■ नारायणगाव (दै. संध्या)

शालकरी विद्यार्थ्यांच्या पाठीवर दिवसेंदिवस वाढणारे दप्तराचे ओझे हा केवळ एक शैक्षणिक विषय उरलेला नसून, तो आता विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी संबंधित एक अत्यंत गंभीर प्रश्न बनला आहे. वाढत्या वयातील मुलांच्या पाठीवर क्षमतेपेक्षा जास्त वजन पडल्यामुळे त्यांच्या पाठीवर, मणक्यावर आणि मानेवर प्रचंड ताण येत असून आरोग्याच्या गंभीर समस्या निर्माण होत आहेत. या पार्श्वभूमीवर शासनाने निश्चित केलेल्या मार्गदर्शक नियमांची काटेकोर अंमलबजावणी व्हावी यासाठी 'राजे ग्रुप महाराष्ट्र राज्य' यांच्या वतीने जुन्नरचे गटशिक्षणाधिकारी अशोक लांडे यांना नुकतेच एक निवेदन देण्यात आले.

या निवेदनाद्वारे विद्यार्थ्यांच्या पाठीवरील दप्तराचे ओझे तात्काळ कमी करण्यात यावे, अशी आग्रही मागणी करण्यात आली आहे. राजे ग्रुपचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष जुबेर शेख व सचिव विजय घेगडे यांनी हे निवेदन सोपवून शासनाच्या मार्गदर्शक नियमांची शाळांमध्ये काटेकोर अंमलबजावणी करण्याची आवश्यकता असल्याचे स्पष्ट केले.

या निवेदनाची गंभीर दखल घेत गटशिक्षणाधिकारी अशोक लांडे यांनी सकारात्मक आश्वासन दिले आहे. तालुक्यातील सर्व शाळांची प्रत्यक्ष पाहणी करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. शाळांनी या विषयाकडे गांभीर्याने पहावे यासाठी कार्यक्षेत्रातील सर्व शाळांना लेखी पत्र पाठवले जाणार आहे. त्याचसोबत, शासनाच्या नियमांची अंमलबजावणी प्रत्यक्षात होते आहे की नाही, हे तपासण्यासाठी स्वतः अधिकारी शाळांना अचानक भेटी देऊन दप्तरांच्या वजनाची पाहणी करतील, असा विश्वास अशोक लांडे यांनी राजे ग्रुपच्या पदाधिकाऱ्यांना दिला.

शासनाच्या संबंधित नियमानुसार विद्यार्थ्यांच्या दप्तराचे वजन हे त्यांच्या शरीराच्या एकूण वजनाच्या १० टक्क्यांपेक्षा जास्त नसावे. या नियमाची अंमलबजावणी सर्व शाळांमध्ये करावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांचे आरोग्य हीच आपली पहिली प्राथमिकता असायला हवी. शाळांमध्ये विद्यार्थ्यांना अनावश्यक पुस्तके, वह्या व इतर अवांतर साहित्य दररोज आणण्याची सक्ती केली जाऊ नये. शाळांनी योग्य नियोजन करून केवळ आवश्यक तेच साहित्य मागवावे, जेणेकरून विद्यार्थ्यांच्या दप्तराचे वजन शासनाच्या नियमानुसार मर्यादित राहील, अशी अपेक्षा राजे ग्रुपने व्यक्त केली आहे.



राज्यस्तरीय 'डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन शिक्षणरत्न पुरस्कार-२०२६'ने राष्ट्रीय खेळाडू धनंजय मदने सन्मानित

■ कोरेगावमुळ (दै. संध्या)

शिक्षण क्रीडा आणि संशोधन क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या प्रसारासाठी सातत्याने कार्य करणारे आंतरराष्ट्रीय खेळाडू व क्रीडा शिक्षक डॉ.धनंजय लक्ष्मण मदने यांना प्रतिष्ठेच्या 'डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन शिक्षणरत्न पुरस्कार-२०२६'ने सन्मानित करण्यात आले.

ग्रीन वर्ल्ड व जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स यांच्या वतीने हा राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. शैक्षणिक संस्थांच्या स्थापना व विकासासाठी, गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या प्रसारासाठी तसेच संशोधनाला प्रोत्साहन देण्यासाठी डॉ. धनंजय मदने यांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

शिक्षण व क्रीडा क्षेत्रात अनेक वर्षे कार्यरत राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे, ग्रामीण भागातील खेळाडूंना विविध संधी उपलब्ध करून देणे आणि त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी योगदान देणे, या कार्याचाही विशेष गौरव करण्यात आला. डॉ. धनंजय मदने यांच्या शिक्षण, क्रीडा आणि संशोधन क्षेत्रातील सातत्यपूर्ण कार्याची दखल घेत मिळालेला हा सन्मान त्यांच्या कार्याला नवी प्रेरणा देणारा ठरला आहे.

त्यांच्या कार्यातून विद्यार्थ्यांसह भावी पिढीला प्रेरणा मिळत असून, त्यांच्या सन्मानाबद्दल शिक्षण, क्रीडा व सामाजिक क्षेत्रातून अभिनंदन करण्यात येत आहे. या पुरस्कार सोहळ्यास अजय केसरी, आयकर आयुक्त, पुणे, डॉ. संजय देशमुख, माधुरी सोलार, डॉ. निवेदिता एकबोटे, नगरसेविका, जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सचे अध्यक्ष मा. सुधाकरराव जाधवर यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन शार्दुलराव जाधवर, उपाध्यक्ष, जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स तसेच गौतम कोतवाल, लेखक, अध्यक्ष, लीड जीडब्ल्यू फाउंडेशन व संचालक, राजगुरुनगर सहकारी बँक लि. यांच्या वतीने करण्यात आले.

यशाचा प्रारंभबिंदू : कृषि उद्योग मूल शिक्षण संस्थेत आरंभ

व्याख्यानमालेचे नववे पुष्प उत्साहात संपन्न

■ बारामती (दै. संध्या)



कृषि उद्योग मूल शिक्षण संस्था, काऱ्हाटी यांच्या वतीने आयोजित 'आरंभ... यशाचा प्रारंभबिंदू' या प्रेरणादायी व्याख्यानमालेअंतर्गत नवव्या पुष्पाचे आयोजन उत्साहात संपन्न झाले. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून कॅप्टन (सेवानिवृत्त) श्री. रविंद्र लडकत, भारतीय सेना यांनी "ऑपरेशन सिंदूर" या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

आपल्या मार्गदर्शनात कॅप्टन (सेवानिवृत्त) रविंद्र लडकत यांनी ऑपरेशन सिंदूरची पार्श्वभूमी, भारतीय सुरक्षादलांची भूमिका, शौर्य, धैर्य, कर्तव्यनिष्ठा तसेच देशाच्या सुरक्षेसाठी जवानांचे योगदान याविषयी विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली. आपल्या अनुभवातून त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये देशाविषयी अभिमान, राष्ट्रनिष्ठा, राष्ट्रीय एकात्मतेची भावना आणि भारतीय जवानांप्रती आदर निर्माण होईल, अशा पद्धतीने मार्गदर्शन केले.

यावेळी त्यांनी भारतीय सैन्याच्या कार्यपद्धतीविषयी माहिती देताना शिस्त, धैर्य, संयम, नेतृत्वगुण, निर्णयक्षमता आणि कर्तव्याप्रती निष्ठा या गुणांचे महत्त्व अधोरेखित केले. देशाच्या संरक्षणासाठी सीमेवर कार्यरत असलेल्या जवानांच्या त्यागातून आणि समर्पणातून विद्यार्थ्यांनी प्रेरणा घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले.

"देश प्रथम" या भावनेला आपल्या जीवनात सर्वोच्च स्थान देत प्रत्येक विद्यार्थ्याने जबाबदार नागरिक म्हणून आपले कर्तव्य पार पाडावे. देशाच्या प्रगतीमध्ये योगदान देण्यासाठी शिक्षणासोबतच राष्ट्रप्रेम, शिस्त, प्रामाणिकपणा आणि सामाजिक बांधिलकी या मूल्यांची जोपासना करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

भारतीय सैन्याच्या शौर्यगाथा आणि प्रत्यक्ष अनुभवांमधून विद्यार्थ्यांना देशसेवा, राष्ट्रभक्ती आणि कर्तव्यनिष्ठेची प्रेरणा मिळाली. त्यांच्या प्रभावी आणि अनुभवसमृद्ध मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये विशेष उत्साह व कुतूहल निर्माण झाले.

ही व्याख्यानमाला संस्थेच्या अध्यक्षा तथा महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री मा. श्रीम. सुनेत्रा (वहिनीसाहेब) अजितदादा पवार यांच्या प्रेरणेतून व सर्व संचालक मंडळाच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक विचार, व्यक्तिमत्त्व विकास, नेतृत्वगुण, करिअरविषयक दृष्टीकोन, जीवनमूल्यांची जपणूक आणि भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्याचा आत्मविश्वास निर्माण करणे हा या व्याख्यानमालेचा प्रमुख उद्देश आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे कार्यकारी अधिकारी श्री. विकास निर्मळ यांनी करून 'आरंभ... यशाचा प्रारंभबिंदू' या व्याख्यानमालेमागील उद्देश स्पष्ट केला. विद्यार्थ्यांच्या मनात मोठी स्वप्ने निर्माण करून त्यांना योग्य दिशा, प्रेरणा आणि मार्गदर्शन देतानाच त्यांच्यामध्ये राष्ट्रप्रेम, सामाजिक बांधिलकी आणि जबाबदार नागरिकत्वाची भावना रुजविणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. राहुल जाधव यांनी केले, तर आभार प्रदर्शन सौ. सुषमा जाधव यांनी मानले. यावेळी संकुलातील सर्व विभागांचे प्राचार्य, प्राचार्या, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रमाला उपस्थितांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

'प्रेरणेतून दिशा... दिशेतून यश...' या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या 'आरंभ... यशाचा प्रारंभबिंदू' व्याख्यानमालेचे नववे पुष्प विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेम, शिस्त, धैर्य, कर्तव्यनिष्ठा आणि देशसेवेची भावना जागृत करणारे ठरले.

थोडक्यात पण महत्वाचे



पिंपरी- चिंचवड राष्ट्रवादी काँग्रेस शहर - जिल्हा अध्यक्षपदी देवेंद्र तायडे यांची नियुक्ती

पिंपरी : दैनिक संध्या

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या पिंपरी- चिंचवड शहर - जिल्हा अध्यक्षपदी देवेंद्र तायडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राष्ट्रीय अध्यक्ष पद्मविभूषण खासदार शरद पवार साहेब यांच्या मान्यतेने आणि शिरूर लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्या सूचनेनुसार, प्रदेशाध्यक्ष आमदार शशिकांत शिंदे यांनी आज श्री. देवेंद्र तायडे यांची नियुक्ती केली, अशी माहिती पक्षाचे प्रदेश सरचिटणीस व पिंपरी-चिंचवडचे पक्ष निरीक्षक सुनील माने यांनी दिली. पक्षाच्या मुंबईतील मुख्यालयात प्रदेश सरचिटणीस रविंद्र पवार यांनी त्यांना आज नियुक्तीचे पत्र दिले. याबाबत बोलताना ते म्हणाले, लोकनेते मा.श्री. शरदचंद्र पवार साहेबांच्या नेतृत्वावर आणि विचारांवर विश्वास असलेल्या पिंपरी चिंचवड शहराच्या शहराध्यक्षपदाची जबाबदारी पक्षाने संघटनात्मक अनुभव असलेल्या श्री. देवेंद्र तायडे यांच्यासारख्या चळवळीतून पुढे आलेल्या कार्यकर्त्यावर सोपविली आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे पिंपरी चिंचवड शहर व जिल्ह्यात पक्ष संघटनेला नवी दिशा प्राप्त होईल. त्यांच्या नेतृत्वात आगामी काळात पक्षाची संघटनात्मक बांधणी मजबुत होऊन कार्यकर्ते आणखी जोमाने पिंपरी चिंचवडच्या विविध प्रश्नांवर प्रभावीपणे काम करतील. पक्षाच्या राष्ट्रीय कार्याध्यक्षा खासदार सुप्रियाताई सुळे, प्रदेश सरचिटणीस व आमदार रोहित पवार आणि वरिष्ठ नेते, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्याशी सविस्तर चर्चा करून पक्ष संघटना वाढीसाठी याबाबत निर्णय घेण्यात आला आहे, असे माने यांनी सांगितले.

जागतिक महागणेशोत्सव रील स्पर्धेसाठी आता फक्त ५ दिवस शिल्लक

मुंबई : दैनिक संध्या

गणेशोत्सवातील कला, परंपरा आणि सांस्कृतिक वारसा डिजिटल माध्यमातून जगभर पोहोचविण्यासाठी महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या वतीने आयोजित 'जागतिक महागणेशोत्सव रील स्पर्धा २०२६'साठी आता फक्त ७ दिवस शिल्लक आहेत. स्पर्धेची अंतिम मुदत वाढविण्यात आली असून ४ ऑक्टोबर २०२६ पर्यंत रील सादर करता येणार आहे. 'जागर कलेचा, समृद्ध परंपरेचा..!' या संकल्पनेवर आधारित ही स्पर्धा महाराष्ट्रासह भारत आणि जगभरातील स्पर्धकांसाठी खुली आहे. स्पर्धेत 'नैवेद्य आणि परंपरा', 'गणराज रंगी', 'कलाधिपती गणपती', 'शब्दसुमनांकित गणराय' आणि 'AI मधून गणपतीचे नवदर्शन' अशा पाच विभागांचा समावेश आहे. AI-निर्मित किंवा AI-सहाय्यित सामग्री केवळ 'AI मधून गणपतीचे नवदर्शन' या विभागासाठी ग्राह्य राहणार आहे. अन्य विभागांमध्ये AI सामग्री स्वीकारली जाणार नाही. स्पर्धेतील जागतिक सर्वोत्तम रीलसाठी १ लाख रुपये, तर महाराष्ट्रातील आणि महाराष्ट्राबाहेरील सर्वोत्तम रीलसाठी प्रत्येकी ५० हजार रुपये पारितोषिक देण्यात येणार आहे. विविध विभागांमध्ये प्रथम, द्वितीय, तृतीय तसेच उत्तेजनार्थ पारितोषिकेही देण्यात येणार आहेत. रील उभी (9:16) आणि ३० ते ९० सेकंदांची असणे आवश्यक आहे.



भारतीय स्वयंपाकघरातील पारंपरिक स्वयंपाकाला आधुनिकतेची जोड

पुणे : दैनिक संध्या

जगभरातील हाऊसवेअर क्षेत्रातील प्रसिद्ध ब्रँड ट्रामॉन्टिनाने भारतीय स्वयंपाकघरातील गरजा लक्षात घेऊन 'हेरिटेज आयर्न' ही आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित कुकवेअर श्रेणी सादर केली आहे. भारतीय स्वयंपाकपद्धतीमध्ये लोखंडी कुक्वेअर पारंपरिक महत्त्व आहे. टिकाऊपणा, उष्णता टिकवून ठेवण्याची क्षमता आणि विविध प्रकारच्या पदार्थांसाठी उपयुक्तता यामुळे भारतीय स्वयंपाकघरांमध्ये आजही महत्त्वाचे स्थान आहे. तवा, कढई, अप्पेचट्टी यांसारखी लोखंडी भांडी आजही अनेक भारतीय स्वयंपाक घरांमध्ये वापरली जातात. मात्र, बदलत्या जीवनशैलीनुसार ग्राहकांना पारंपरिक गुणांसोबतच हाताळण्यास सुलभ, अधिक टिकाऊ आणि आधुनिक स्वरूपातील कुकवेअरची अपेक्षा आहे. पारंपरिक लोखंडी भांड्यांची स्वयंपाकातील कार्यक्षमता कायम ठेवत त्यामध्ये अधिक टिकाऊपणा, वापरातील सुलभता आणि आधुनिक डिझाइनचा समावेश या श्रेणीत करण्यात आला आहे. पारंपरिक भारतीय पदार्थांसाठी उपयुक्त कुक्वेअर वोकसारख्या आधुनिक प्रकारांचाही या श्रेणीत समावेश आहे. प्रत्येक भांडे कार्यक्षमता, टिकाऊपणा आणि दैनंदिन वापरातील सुलभता यांचा समतोल साधण्यासाठी तयार करण्यात आले आहे. पारंपरिक लोखंडी भांड्यांमध्ये आढळणारी उष्णता टिकवून ठेवण्याची क्षमता या कुकवेअरमध्ये असून, त्यासोबत अधिक प्रतिसादक्षम स्वयंपाकाचा अनुभव देण्यासाठी त्याची रचना करण्यात आली आहे. कुकिंग सरफेसवर प्री-सीझनिंग आणि सँडब्लास्टिंग प्रक्रिया केली जाते. तसेच नायट्रायडिंग तंत्रज्ञानामुळे पृष्ठभागाची कठीणता वाढण्यास मदत होते आणि गंज पासून अधिक प्रतिकार मिळतो. नियमित वापर आणि स्वयंपाकाच्या तेलामुळे होणाऱ्या सीझनिंगमुळे कालांतराने या पृष्ठभागावर नैसर्गिक नॉन-स्टिक गुणधर्म विकसित होऊ शकतात. यामध्ये सिंथेटिक नॉन-स्टिक कोटिंगचा वापर केलेला नाही. पारंपरिक स्वयंपाकपद्धतींना आधुनिक स्वयंपाकघराशी जोडण्यासाठी कुकवेअरमध्ये ब्रश्ड ३०४ स्टेनलेस स्टील हँडल्स आणि रिव्हेट्स, टफन्ड ग्लास झाकणे तसेच आधुनिक आकाररचना यांचा वापर करण्यात आला आहे. विविध स्वयंपाकाच्या गरजांसाठी वेगवेगळ्या गेजमध्ये भांडी तयार करण्यात आली असून, उष्णता कार्यक्षमता, टिकाऊपणा आणि वजन यांचा दैनंदिन वापरासाठी योग्य समतोल साधण्यात आला.



फ्लिपकार्टकडून १४ दशलक्ष घनफूट क्षमतेची भर

बिग बिलियन डेजचा ७५०+ नवीन पिन कोडपर्यंत विस्तार

■ मुंबई (दै. संध्या)

भारतातील स्वदेशी ई-वाणिज्य बाजारपेठ असलेल्या फ्लिपकार्टने 'द बिग बिलियन डेज' आणि सणासुदीच्या दिवसांच्या पार्श्वभूमीवर आज ईकार्टच्या पुरवठा साखळीच्या विस्ताराची घोषणा केली. ईकार्टने देशभरात १४ दशलक्ष घनफूट गोदामाची जागा वाढवली असून साठवण क्षमता ५० टक्क्यांनी वाढवली आहे. तंत्रज्ञान आणि ऑटोमेशनमधील सुधारणांमुळे कमाल प्रक्रिया क्षमतेतही ३० टक्क्यांहून अधिक वाढ झाली आहे.

देशभरात ग्राहकांकडून जलद वितरणाची अपेक्षा केली जात असल्याने, सणासुदीच्या काळात शेवटच्या टप्प्यापर्यंत पोहोच वाढवण्यासाठी आणि 'सेम-डे' व 'नेक्स्ट-डे' वितरणाचे प्रमाण वाढवण्यासाठी विशेषतः ९०० हून अधिक अतिरिक्त डिलिव्हरी हब्स सुरू करण्यात आले आहेत. यामुळे देशभरातील ८,२०० हून अधिक 'ईकार्ट' सुविधांमध्ये (फुलफिलमेंट सेंटर्स, सॉर्टेशन हब्स आणि लास्ट-माईल डिलिव्हरी ऑपरेशन्सचा समावेश आहे) आणि १५० हून अधिक शहरांमधील जवळपास १,२०० 'फ्लिपकार्ट मिनिट्स' मायक्रो-फुलफिलमेंट सेंटर्समध्ये भर पडली आहे. 'द बिग बिलियन डेज' दरम्यान एमएसएमई, छोटे विक्रेते, विणकर आणि कारागीर यांना जलद वितरण सक्षम करण्यासाठी, त्यांच्या उत्पादनांचे अडीच कोटींहून अधिक युनिट्स ईकार्टच्या फुलफिलमेंट सेंटर्समध्ये आधीच ठेवण्यात आले आहेत आणि विक्रेत्यांचा वितरणाचा वेळ कमी करण्यासाठी प्रमुख विक्रेता केंद्रांमध्ये ७० अतिरिक्त पिक-अप स्टेशन्स उघडण्यात आली आहेत. फ्लिपकार्ट मार्केटप्लेसच्या बाहेरील विक्रेते आणि एमएसएमई देखील सणासुदीच्या काळात देशभरातील ग्राहकांना वितरण करून आपला व्यवसाय वाढवू शकतील याची खात्री करण्यासाठी ईकार्टच्या ३पीएल फ्रँचायझींची संख्या लॉन्च झाल्याच्या दोन महिन्यांतच दुप्पट होऊन ६०० झाली आहे.

'द बिग बिलियन डेज' आणि सणासुदीच्या काळातील खरेदीची सुविधा भारतातील अधिक ठिकाणांपर्यंत पोहोचवण्यासाठी, 'ईकार्ट'ने फ्लिपकार्टच्या सेवा-व्याप्तीमध्ये ७५० हून अधिक नवीन पिन कोड्सचा समावेश केला आहे. यात लडाखमधील लेह, जम्मू-काश्मीरमधील कारगिल, राजस्थान आणि मध्य प्रदेशातील दुर्गम भाग, तसेच ईशान्य भारतातील विविध भागांचा समावेश आहे. तसेच मिझोराममधील कमला नगर आणि झमुआंग, मेघालयातील तुरा सिटी, रेसुबेलपारा आणि राजाबाला, आणि अरुणाचल प्रदेशातील बोमडिला व तेझू यांसारख्या ठिकाणांचा समावेश होतो.



विशमास्टर्समुळेच 'द बिग बिलियन डेज' साजरे करणे शक्य होते आणि फ्लिपकार्टची त्यांच्याप्रती असलेली जबाबदारी केवळ डिलिव्हरीपुरती मर्यादित नाही. प्रत्येक विशमास्टरला टर्म लाईफ इन्शुरन्स, वैयक्तिक अपघात विमा आणि मेडिक्लेम लाभांचे संरक्षण मिळते; प्रत्येक सणासुदीच्या काळात संरक्षणाची पातळी सातत्याने वाढवण्यात आली आहे. फ्लिपकार्टने 'डॉक्टर ऑन कॉल' सेवादेखील सुरू केली आहे. त्याचा लाभ विशमास्टर्स आणि त्यांचे कुटुंबीय कधीही घेऊ शकतात.

विशमास्टर्स या सणासुदीच्या काळात आपल्या कमाईनुसार जॉइनिंग आणि रिटेन्शन बोनससाठी पात्र आहेत. तसेच, रेफरल इन्सेंटिव्हसाठीही पात्र आहेत. त्यामुळे वर्षातील सर्वाधिक मागणीच्या काळात उत्पन्नाचा अतिरिक्त स्रोत निर्माण होतो. फ्लिपकार्ट डिलिव्हरी पार्टनर्स ॲपद्वारे एआयवर चालणारी पार्श्वभूमी पडताळणी, महत्त्वाच्या तपासण्या आणि नियमांशी कोणतीही तडजोड न करता, ऑनबोर्डिंगला १० मिनिटांपेक्षा कमी वेळेत पूर्ण करते. प्रत्येक विशमास्टरची पडताळणी एकाच मानकानुसार केली जाते; हे तंत्रज्ञान त्यांना अधिक वेगाने कमाई सुरू करण्यास सक्षम करते. हेच ॲप एक प्रशिक्षण प्लॅटफॉर्म म्हणूनही काम करते, त्यामुळे नवीन कर्मचाऱ्यांना त्यांच्या पहिल्या शिफ्टपूर्वी डिलिव्हरीचे मानक माहीत असते

फ्लिपकार्ट ग्रुपचे वरिष्ठ उपाध्यक्ष आणि पुरवठा साखळी (सप्लाय चेन) प्रमुख हेमंत बद्री म्हणाले,"दरवर्षी 'द बिग बिलियन डेज' ग्राहकांच्या अपेक्षांची—जसे जलद डिलिव्हरी आणि व्यापक पोहोच—पातळी उंचावते. यावर्षी लेह किंवा कारगिलमधील ग्राहकही पहिल्यांदाच 'द बिग बिलियन डेज'चा अनुभव घेतील. 'ईकार्ट' आणि 'फ्लिपकार्ट मिनिट्स'अंतर्गत आम्ही आता ८,२०० हून अधिक सुविधा चालवत आहोत; यामुळे आम्हाला सणासुदीच्या या अनुभवाचा लाभ अधिकाधिक ग्राहकांपर्यंत पोहोचवणे शक्य झाले आहे, तसेच विक्रेत्यांना अशा ग्राहकांपर्यंत पोहोचण्यास मदत होत आहे ज्यांच्यापर्यंत ते यापूर्वी पोहोचू शकले नव्हते."

फ्लिपकार्टने सणासुदीच्या काळात अडीच लाखांहून अधिक प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी निर्माण करण्याची घोषणा केली आहे. त्यातील जवळपास ७५,००० संधी अशा लोकांसाठी आहेत जे पहिल्यांदाच नोकरीच्या क्षेत्रात प्रवेश करत आहेत. या नवीन संधींपैकी ६० टक्के संधी 'लास्ट-माईल डिलिव्हरी' क्षेत्रातील आहेत. हे प्रमाण जलद डिलिव्हरीवर असलेला भर आणि 'टियर २' व 'टियर ३' बाजारपेठांमध्ये 'फ्लिपकार्ट मिनिट्स'चा होत असलेला विस्तार दर्शवते.

अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरण तातडीने लागू करा - लोकसेवक युवराजगिरी दाखले

■ पिंपरी (दै. संध्या)

मातंग समाजाच्या व इतर संपूर्ण जातीच्या शैक्षणिक आणि आर्थिक प्रगतीच्या संदर्भामध्ये मुंबई आझाद मैदान या ठिकाणी सकल मातंग समाजाच्या वतीने निर्धार महामोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विधान परिषदेचे आमदार अमितजी गोरखे सर, डॉ. अण्णाभाऊ साठे यांचे वंशज सचिन साठे, सुकुमार कांबळे, अखिल भारतीय हिंदू मातंग संघाचे ज्येष्ठ नेते मार्गदर्शक नामदेव रिटे साहेब यांच्या सह आदी प्रमुख नेत्यांच्या उपस्थितीमध्ये निर्धार महामोर्चा संपन्न झाला. यावेळी पिंपरी चिंचवड शहरातून हजारो मातंग बांधव सहभागी झाले होते.

यावेळी शिवशाही शासन पक्ष व अखिल भारतीय हिंदू मातंग संघ संस्थापक प्रमुख लोकसेवक युवराज गिरी दाखले यांनी आपली भूमिका मांडत असताना राज्याचे मुख्यमंत्री आदरणीय देवेंद्रजी फडणवीस साहेब त्यांच्या मंत्रिमंडळाला सोबत घेऊन उपवर्गीकरण तातडीने लागू करण्यासंदर्भात विनंती केली.

महायुतीचे सरकार आणण्यासाठी बहुजन समाजाला सोबत मातंग समाजाचे अग्रगण्य भूमिका होती असे स्पष्ट मत दाखले यांनी मांडले मातंग समाजाच्या व इतर तत्सम पोटजातीच्या शैक्षणिक आणि आर्थिक प्रगतीसाठी उपवर्गीकरण होणं गरजेचं आहे ,यावेळी राज्यभरातून अखिल भारतीय हिंदू मातंग व शिवशाही शासन पक्षाचे हजारो पदाधिकारी व कार्यकर्ते या महामोर्चामध्ये समाविष्ट झाले होते.



दरम्यान छावा मराठा सेना प्रदेशाध्यक्ष सचिन आण्णा लिमकर व योगेश शितोळे सरकार यांनी मराठा समाजाच्या वतीने तसेच मुस्लिम समाजाच्या वतीने शिवशाही अल्पसंख्याक आघाडी प्रदेश अध्यक्ष हर्षद भाई खान यांनी सक्रीय जाहीर पाठिंबा दिला. यावेळी जेष्ठ नेते नामदेवराव रिटे शिवशाही शासनपक्ष व अखिल भारतीय हिंदू मातंग संघाच्या महिला आघाडी अध्यक्ष नेत्या उषाबाई कांबळे, अखिल भारतीय हिंदू मातंग संघ पिंपरी चिंचवड शहर अध्यक्षा रुपालीताई केंगारे प्रदेश संघटक सुरज खंडागळे, प्रदेश अध्यक्ष कृष्णा साबळे, नाना राखडे, अर्चना शिंदे, अविनाश कांबीकर, जेष्ठ नेते शंकर भाऊ तडाखे, जेजुरी देवस्थान विश्वस्त अनिल सौंदडे, विक्रम गवळी, शरद गवळी, विलास गायकवाड, पप्पू कसबे, तसेच सतिष पात्रे, बाळू गवारे, मंगेश गायकवाड, सन्नी डाडर, सुशील शिंदे, भारत भोसले अनिता वैरागर, गिता आडागळे, समिरा राजगुरू सुनिता बेंगळे सतिश भवाळ, संजय ससाणे, साहित्यरत्न लोकशाहीर डॉ अण्णा भाऊ साठे प्रबोधन पर्व अध्यक्ष गणेश अवघडे, यांच्या सह हजारो समाज बांधव क्रांतीसम्राट बाबासाहेब गोफले आझाद मैदान मुंबई या ठिकाणी उपस्थित होते.

आर्थिक वर्ष २०२७ च्या पहिल्या तिमाहीत आयसीआयसीआय प्रुडेन्शियल लाईफचा ९९.३१% चा दमदार क्लेम सेटलमेंट रेशो

■ मुंबई (दै. संध्या)

आयसीआयसीआय प्रुडेन्शियल लाईफ इन्शुरन्सने आर्थिक वर्ष २०२७ च्या पहिल्या तिमाहीसाठी ९९.३१% चा क्लेम सेटलमेंट रेशो जाहीर केला आहे. अधिकृत आकडेवारीनुसार (फॉर्म L-39 आणि L-40) भारतातील आघाडीच्या जीवन विमा कंपन्यांमध्ये हा रेशो सर्वाधिक आहे. या तिमाहीदरम्यान, कंपनीने ४१४.०८ कोटी रुपयांच्या वैयक्तिक मृत्यू दाव्यांचे निवारण केले. विशेष म्हणजे, आर्थिक वर्ष २०२७ च्या पहिल्या तिमाहीत प्रमुख जीवन विमा कंपन्यांमध्ये कंपनीचे प्रति दावा सरासरी मूल्य सुमारे १५ लाख रुपये होते, जे सर्वात जास्त आहे.

आयसीआयसीआय प्रुडेन्शियल लाईफ इन्शुरन्सचे चीफ - अंडररायटिंग अँड रिटेल क्लेम्स, श्री. सारंग गोखले म्हणाले: "आयसीआयसीआय प्रुडेन्शियल लाईफमध्ये, आम्ही आमचे ग्राहक आणि त्यांच्या कुटुंबासाठी क्लेम प्रक्रिया सोपी, विनासायास आणि वेळेत पूर्ण करण्यासाठी कटिबद्ध आहोत. आर्थिक वर्ष २०२७ च्या पहिल्या तिमाहीत, आमचा क्लेम सेटलमेंट रेशो क्षेत्रात सर्वाधिक म्हणजेच ९९.३१% होता. तसेच, चौकशीची गरज नसलेल्या प्रकरणांमध्ये, अंतिम कागदपत्र मिळाल्यापासून क्लेम सेटल करण्याचा आमचा सरासरी वेळ (टर्नअराउंड टाइम) अवघा १ दिवस होता. याशिवाय, आम्ही मृत्यू दाव्यांपोटी ४१४.०८ कोटी रुपयांचे पेमेंट केले आहे.

आमचा 'ग्राहक-प्रथम' दृष्टिकोन आणि डिजिटलायझेशनवर असलेला विशेष भर आम्हाला क्लेम वेगाने सेटल करण्यास सक्षम करतो. यामुळे कुटुंबांना अशा वेळी वेळेत आर्थिक मदत मिळते, जेव्हा त्यांना तिची सर्वात जास्त गरज असते. क्लेम करणारे लोक आमच्या मोबाईल ॲप, व्हॉट्सॲप, चॅटबॉट आणि वेबसाईटच्या माध्यमातून सहजपणे क्लेम दाखल करू शकतात आणि तो ट्रॅकही करू शकतात.

आमच्या 'क्लेम फॉर शुअर' या उपक्रमांतर्गत, आम्ही पात्र दाव्यांसाठी एका दिवसाच्या आत जवळपास ७५ कोटी रुपयांचे पेमेंट केले आहे. आम्ही आमच्या डिजिटल प्रक्रिया आणखी मजबूत करत आहोत, जेणेकरून कुटुंबांना अत्यंत गरजेच्या वेळी वेळेत आधार मिळू शकेल."

'माझा शेतकरी राजा अडचणीत असताना सेलिब्रेशन कशासाठी?'

लग्नाच्या २० व्या वाढदिवसानिमित्त तृप्तीताई देसाई यांचे अनोखे आणि संवेदनशील आवाहन!

शुभेच्छांऐवजी गरजू शेतकऱ्यांना 'गूगल पे' द्वारे थेट मदत करण्याचे भूमाता ब्रिगेडच्या संस्थापक अध्यक्षांचे कार्यकर्त्यांना स्पष्ट निर्देश

■ पुणे (दै. संध्या)

सामाजिक क्षेत्रातील आपल्या आक्रमक आणि संवेदनशीलता जपणाऱ्या कार्यासाठी ओळखल्या जाणाऱ्या भूमाता ब्रिगेड आणि भूमाता फाउंडेशनच्या संस्थापक अध्यक्षा सौ. तृप्तीताई प्रशांत देसाई यांच्या लग्नाला आज दिनांक 29 सप्टेंबर 2026 रोजी २० वर्षे पूर्ण होत आहेत. मात्र, आपल्या लग्नाच्या २० व्या वाढदिवसाचे कोणतेही वलय किंवा सेलिब्रेशन न करता, त्यांनी महाराष्ट्रातील सद्य दुष्काळी परिस्थितीचे भान ठेवून अत्यंत संवेदनशील आणि आदर्श निर्णय घेतला आहे.

"महाराष्ट्रातील माझा शेतकरी राजा आज भीषण दुष्काळाच्या संकटाचा सामना करत आहे, त्याच्या घरात अन्नधान्याची टंचाई आहे. अशा गंभीर परिस्थितीत मी माझ्या लग्नाचा वाढदिवस साजरा करणे किंवा शुभेच्छा स्वीकारणे मला मनापासून पटत नाही," असे ठाम प्रतिपादन करत तृप्तीताई देसाई यांनी सर्व कार्यकर्ते, पदाधिकारी आणि हितचिंतकांना कुठलेही सेलिब्रेशन न करण्याचे आणि सोशल मीडियावर शुभेच्छा देणे टाळण्याचे आग्रही आवाहन केले आहे.



प्रेस नोटमधील प्रमुख मुद्दे व तृप्तीताई देसाई यांची भूमिका: सेलिब्रेशन व भेटीगाठींना पूर्णविराम: दरवर्षी भूमाता ब्रिगेड व भूमाता फाउंडेशनचे राज्यातील असंख्य पदाधिकारी आणि कार्यकर्ते उत्साहाने तृप्तीताईंची भेट घेऊन, केक आणून व भेटवस्तू देऊन वाढदिवस साजरा करतात. मात्र, यंदाच्या दुष्काळी परिस्थितीचे गांभीर्य ओळखून त्यांनी कार्यकर्त्यांना प्रत्यक्ष भेटायला येणे, केक आणणे किंवा सोशल मीडियावर शुभेच्छांचे बॅनर लावणे पूर्णपणे टाळण्यास सांगितले.

शेतकऱ्यांना थेट 'गूगल पे' द्वारे मदत करा: ज्या कार्यकर्त्यांना किंवा हितचिंतकांना मनापासून शुभेच्छा द्यायच्या आहेत, त्यांनी केक, बुके किंवा महागड्या भेटवस्तूंवर खर्च न करता, तोच पैसा एखाद्या गरजू आणि अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्याला थेट 'गूगल पे' (Google Pay) करून त्याच्या घरात आनंद निर्माण करण्यासाठी प्रयत्न करावा, असा संदेश तृप्तीताई यांनी दिला आहे.

लवकरच दुष्काळग्रस्त भागाचा दौरा: शेतकरी बांधवांच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्यासाठी तृप्तीताई देसाई स्वतः लवकरच राज्यातील दुष्काळग्रस्त भागाचा दौरा करून शेतकरी कुटुंबांची प्रत्यक्ष भेट घेणार आहेत आणि त्यांच्या अडचणी समजून घेणार आहेत.


समाजासाठी एक वस्तुपाठ: आपल्या वैयक्तिक आनंदापेक्षा समाजातील शेवटच्या घटकाच्या दुःखाचा विचार करणारा तृप्तीताई देसाई यांचा हा निर्णय सध्या राजकीय आणि सामाजिक वर्तुळात कौतुकाचा विषय ठरत आहे. वैयक्तिक सोहळ्यांवर हजारो रुपयांचा अवाजवी खर्च करणाऱ्या समाजातील घटकांसाठी तृप्तीताईंनी घेतलेली ही भूमिका एक आदर्श वस्तुपाठ ठरत आहे.

> "माझा शेतकरी राजा अडचणीत असताना आणि त्याच्या घरात खाण्याचे वांधे असताना आपण उत्सव साजरे करणे मला अजिबात मान्य नाही. मला वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यापेक्षा एका दुष्काळग्रस्त शेतकऱ्याच्या चेहऱ्यावर हसू आणणे हीच माझ्यासाठी खरी भेट ठरेल."
>
> - सौ. तृप्तीताई प्रशांत देसाई (संस्थापक अध्यक्षा - भूमाता ब्रिगेड, भूमाता फाउंडेशन)



दैनिक संध्या
निःपक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक
बुधवार, दि. ३० सप्टेंबर २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews



क्षेत्र लेण्याद्री येथे अंगारक चतुर्थीनिमित्त श्रींच्या दर्शनाकरीता भाविकांची गर्दी

■ जुन्नर (दै. संध्या)

मंगळवार दि.२९ सप्टेंबर २०२६ रोजी अंगारक संकष्टी चतुर्थीनिमित्त अष्टविनायक तिर्थक्षेत्र श्री क्षेत्र लेण्याद्री (ता. जुन्नर) येथील 'श्री गिरीजात्मज' गणपतीचे हजारो भाविकांनी दर्शन घेतले. भाद्रपद महिन्यातील अंगारक संकष्टी चतुर्थी आल्याने व या चतुर्थीला विशेष महत्व असल्याने दिवसभर भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होती. श्री क्षेत्र लेण्याद्री परिसरास यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते. यानिमित्ताने 'श्री गिरिजात्मज' गणेशाच्या मूर्तीस व मंदिरात फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली होती.

श्री लेण्याद्री गणपती देवस्थानचे वतीने पहाटे ०६.१५ वाजता देवस्थानचे अध्यक्ष ॲड. संजय ढेकणे, विश्वस्त सदाशिव ताम्हाणे व कैलास लोखंडे यांच्या हस्ते श्रींचा विधीवत अभिषेक व महापुजा करण्यात आली. त्यानंतर भाविकांनी दर्शनाचा लाभ घेतला. यानिमित्त 'श्री गिरिजात्मज' गणेशाच्या मूर्तीस व मंदिर परिसरात फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली होती. देवाचे नैवेद्याकरीता गोळेगाव येथील कैलास लक्ष्मण लोखंडे यांनी १ कॅरेट पेरु, गोळेगाव येथील सचिन सदाशिव ताम्हाणे यांनी २ कॅरेट पपई, नारायणगाव येथील संजय महादेव बनकर, दौंड येथील सरस्वती अष्टविनायक ग्रुप, गोळेगाव येथील संदेश उत्तम लोखंडे व महेश अशोक सरजिने यांनी प्रत्येकी २ कॅरेट केळी तसेच कुमशेत येथील



अंकुश जालिंदर डोके यांनी १ कॅरेट केळी प्रसाद दिला. मंदिरात सकाळी ७ वाजता, दुपारी १२ वाजता व सायंकाळी ७ वाजता महाआरती करण्यात आली.

अंगारक संकष्टी चतुर्थीनिमित्त देवस्थानचे वतीने दिवसभर विविध धार्मिकविधी करण्यात आले. भाविकांना देवस्थान ट्रस्ट मार्फत विविध सोयी सुविधा पुरविण्यात आल्या. तसेच यानिमित्ताने वै.ह.भ.प. लक्ष्मण केरु भोसले यांच्या स्मरणार्थ वारकरी संप्रदाय यांजकडून भाविक भक्तांकरीता खिचडी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. अंगारक संकष्टी चतुर्थीला विशेष महत्व असल्याने दिवसभर भाविकांची व पर्यटकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होती.

भाविक व पर्यटकांचे देव दर्शन सुलभ व्हावे याकरीता गर्दीचे नियोजन देवस्थान ट्रस्टच्यावतीने करण्यात आले होते. तसेच यानिमित्ताने देवस्थान ट्रस्ट व शिवनेरी ब्लड सेंटर यांचे संयुक्त विदयमानाने रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी देवस्थानचे अध्यक्ष ॲड. संजय ढेकणे, उपाध्यक्ष गोविंद मेहेर, सेक्रेटरी शंकर ताम्हाणे, खजिनदार भगवान हांडे, विश्वस्त मच्छिंद्र शेटे, सदाशिव ताम्हाणे, काशिनाथ लोखंडे, जयवंत डोके, जितेंद्र बिडवई, कार्यालयीन सचिव रोहीदास बिडवई, व्यवस्थापक निलेश सरजिने, कर्मचारी व गोळेगाव ग्रामस्थ तसेच भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. सायंकाळी श्री मुक्ताई प्रासादिक भजनी मंडळ, शिवेचीवाडी यांचे संगीत भजन झाले. रात्री चंद्रोदयाच्या वेळी श्रींची महाआरती करण्यात आली.

त्यानंतर नारायणगाव येथील सखाराम पारधी, जुन्नर येथील रामदास सखाराम ताजणे, जुन्नर येथील निखिल चंद्रकांत गोंगे, श्रीगोंदा येथील गणेश विजयकुमार ननवरे, पिंपळे गुरव येथील रविंद्र हनुमंत सावंत, नाशिक येथील योगेश भास्कररराव धारणकर यांच्यावतीने भाविकांकरीता महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. अंगारक संकष्टी चतुर्थीनिमित्त दिवसभरात विविध क्षेत्रातील मान्यवरांनी श्री गिरीजात्मज गणेशाच्या दर्शनाचा लाभ घेतला. तसेच पुणे, अहमदनगर, मुंबई, ठाणे, नाशिक, जुन्नर व आजुबाजूच्या परिसरातून मोठ्या प्रमाणात भाविक श्री गिरीजात्मज गणेशाच्या दर्शनासाठी येत होते. अशी माहिती देवस्थानचे अध्यक्ष ॲड. संजय ढेकणे व सेक्रेटरी शंकर ताम्हाणे यांनी दिली.

चंद्रप्रकाशात न्हाली जेजुरी नगरी...



सध्या रात्रीच्या निरभ्र आकाशात चंद्राच्या निळसर प्रकाशाने सर्व परिसर उजळून टाकत असताना तीर्थक्षेत्र जेजुरी गडाच्या ऐतिहासिक कमाणीतून लक्ष वेधून घेणारा जुनी जेजुरी परिसर प्रकाशात न्हात होता. (फोटो -विजयकुमार हरिश्चंद्रे)

४ ऑक्टोबर आळंदी येथे अखिल महाराष्ट्र कोष्टी समाज परिषदेची त्रैवार्षिक बैठक

■ पुणे (दै. संध्या)

महाराष्ट्रातील कोष्टी समाजासाठी आणि त्यांच्या पोटजातींच्या सामाजिक, आर्थिक, वैवाहिक, सांस्कृतिक, शैक्षणिक उन्नतीसाठी अखिल महाराष्ट्र कोष्टी समाज परिषद कार्यरत आहे. सर्व पदाधिकाऱ्यांना, समाज बांधवांना सोबत घेऊन परिषदेचे कार्य चालू आहे. त्याच अखिल महाराष्ट्र कोष्टी समाज परिषदेची त्रैवार्षिक बैठक रविवार दिनांक ४ ऑक्टोबर २०२६ रोजी जयश्री विद्यालय, आळंदी, पुणे रोड, देवकुळा पेट्रोल पंपा समोर, काळे कॉलनी, आळंदी देवाची, पुणे येथे सकाळी अकरा वाजता आयोजित केली आहे. अखिल महाराष्ट्र कोष्टी समाज परिषदेचे महाराष्ट्र राज्याध्यक्ष सतीश दाभाडे (नागपूर) हे अध्यक्षस्थानी असणार आहेत.

सदर त्रैवार्षिक बैठकी करिता अखिल भारतीय कोष्टी देवांग-देवांगन फेडरेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष अरुणभाऊ वरोडे यांची प्रमुख उपस्थिती राहिल.त्रैवार्षिक बैठकीमध्ये मागील सभेचे इतिवृत्त मंजूर करणे, मागील वर्षाचा ताळेबंद मंजूर करणे, नवीन अध्यक्ष व पदाधिकाऱ्यांची निवड करणे, आणि अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा करण्यात येणार आहे. अखिल महाराष्ट्र कोष्टी समाज परिषदेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी,सदस्यांनी उपरोक्त बैठकी करिता आवर्जून उपस्थित रहावे. सदर बैठक अतिशय महत्त्वाची असून कार्यकारिणीची निवड याच बैठकीत होणार असल्यामुळे कृपया राज्यातील सर्व पदाधिकारी, सदस्य आणि हितचिंतकांनी आवर्जून उपस्थित रहावे, असे आवाहन प्रदेशाध्यक्ष सतीश दाभाडे यांनी केले आहे.

थोडक्यात पण महत्वाचे



आदिशक्ती महिला पतसंस्थेची वार्षिक सभा उत्साहात संपन्न

नारायणगाव : दैनिक संध्या

नारायणगाव येथील श्री आदिशक्ती महिला नागरी पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. तीन वर्षाच्या कालावधीमध्ये संस्थेच्या सुमारे 59 लाख रुपयांच्या ठेवी, 33 लाख रुपयांचे कर्ज वाटप आणि 67 लाख 52 हजार रुपये खेळते भांडवल व 8 लाख 21 हजार रुपयांचे वसूल भाग भांडवल जमा झाले आहे. अशी माहिती संस्थेच्या अध्यक्ष सौ.अंजलीताई खैरे यांनी दिली. सभेचे प्रास्ताविक सचिव सौ. सुजाता ताई भुजबळ यांनी केले व अहवाल वाचन संस्थेच्या व्यवस्थापिका रोहिणी फुलसुंदर यांनी केले. अनेक सभासदांनी मनोगत व्यक्त करताना संस्थेच्या प्रगतीवर समाधान व्यक्त केले. यामध्ये संगीताताई बडेरा, ज्योतिताई गांधी, स्वाती ताई मुदगल, नंदाताई मुथ्था, हेमलताताई सोनवणे, हिराताई शेटे, सरिताताई मावळे व राजश्रीताई बोरकर यांनी संस्थेच्या कारभार समाधान कारक व फक्त महिला असूनही कर्ज वाटप आणि वसुली तसेच ठेवी यावर खूप चांगली प्रगती आहे. असे सांगून आपले मनोगत व्यक्त केले. संस्थेच्या अध्यक्षा यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात संस्थेचा लेखाजोखा मांडून सभासदांचे आभार व्यक्त केले. संस्थेच्या विकासासाठी कायम कटिबध्द राहून संस्थेचा विकास कसा होईल यासाठी माझा पूर्ण वेळ मी संस्थेला देणार आहे. अध्यक्ष भाषणामध्ये भविष्यामध्ये संस्थेच्या हितासाठी जे जे चांगले निर्णय घेऊन संस्था वाढीसाठी सर्व सभासद व संचालकांना विश्वासात घेऊन काम करू असा विश्वास अंजलीताई खैरे यांनी व्यक्त केला. या वार्षिक सभेच्या निमित्ताने संस्थेचे सर्व संचालक संस्थेच्या उपाध्यक्षा सविताताई खैरे, संस्थेच्या सचिव सुजाताताई भुजबळ, संस्थेच्या सहसचिव ज्योती ताई सोमवंशी, संस्थेचे इतर सर्व संचालक सभासद, व कर्मचारी वर्ग यांच्या उपस्थितीत सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली.

पुणे राज्यस्तरीय मराठी काव्य संमेलन संपन्न

पुणे : दैनिक संध्या

रानकवी प्रतिष्ठान, ज्ञानाई फाउंडेशन आणि विचार मंच, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय मराठी काव्य संमेलन उत्साहात, संपन्न झाले. या संमेलनाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक प्रा. डॉ. श्रीपाल सबनीस होते. उद्घाटक म्हणून भाऊसाहेब भोईर उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून नगरसेवक निवृत्ती अण्णा बांदल, प्रा. डॉ. शैलेंद्र भणगे, प्रा. हनुमंत धालगडे, अभिनेत्री प्रीती पौळ, सिने अभिनेते गुलाबराजा फुलमाळी, अभिनेत्री माया बोने आदी मान्यवर उपस्थित होते. मुख्य आयोजक रानकवी जगदीप वनशिव, लोककवी सीताराम नरके आणि राहुल जाधव यांनी केले. या एकदिवसीय काव्य संमेलनात महाराष्ट्रभरातून १४० कवींनी सहभाग नोंदवला. यामध्ये साहेबराव परबत, डॉ. विलास बाबर, योशोदा शिंदे, ज्ञानेश्वर शिळवणे, प्रवीण बोरसे, शिवाजी उराडे, विनोद अष्टुळ, प्रा. गुरुराज गर्दे, सुरेश वाळेकर, मच्छिंद्र नरके, उज्ज्वला यादव, प्रा. प्रज्ञा रोकडे, डॉ. लक्ष्मण हेंबाडे, अतुल पाटणे, बाळासाहेब गिरी, ॲड. अशोक भालेराव, सीमाराणी सावंत, देवेंद्र गावंडे, शाहीर शिवाजी थिटे, स्नेहा भोसले, प्रसन्नकुमार धुमाळ, अनुराधा वायकोस, पूजा सोनार, रसिका कदम, समीक्षा चव्हाण, अनिल केंगार, दशरथ दुनघव, प्रा. विजय अंधारे, अरुण कटारे, सौ. कांचन वनशिव, मानसी मेहर, कवी वैभव वनशिव आदींचा समावेश होता.



राजकीय साहित्याच्या विचारविश्वाला डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी सासवडमध्ये रंगणार नांदी

■ पुणे (दै. संध्या)

साहित्य आणि राजकारण यांचे नाते उलगडणाऱ्या विचारमंथनाला सासवडच्या ऐतिहासिक भूमीत पुन्हा एकदा नांदी मिळणार आहे. महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे, समर्थ युवा फौंडेशन, आचार्य अत्रे विकास प्रतिष्ठान पुरंदर तसेच महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या सासवड, सोपाननगर आणि जेजुरी शाखांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार, १ ऑक्टोबर रोजी दहावे नांदी साहित्य संमेलन 'राजकीय साहित्य संमेलन' म्हणून आयोजित करण्यात आले आहे. या संमेलनाच्या अध्यक्षपदाची धुरा, शिवसेना नेत्या, महाराष्ट्र विधान परिषदेच्या माजी उपसभापती व विद्यमान विधानपरिषद सदस्य डॉ. नीलम गोऱ्हे सांभाळणार आहेत.

सासवड येथील आचार्य अत्रे सांस्कृतिक भवन सकाळी १० वाजता संमेलनाची सुरुवात होईल. त्यानंतर सकाळी १०.३० वाजता उद्घाटन सोहळा होणार असून, महाराष्ट्र साहित्य परिषद पुणेचे अध्यक्ष श्री. योगेश सोमण व श्री . राजेश पांडे ,अध्यक्ष, समर्थ सेवा फाऊंडेशन यांच्या हस्ते संमेलनाचे उद्घाटन होईल. माजी जिल्हा परिषद अध्यक्ष श्री. विजय कोलते हे स्वागताध्यक्ष म्हणून उपस्थित



राहणार आहेत.

राजकीय जीवनातील अनुभव, सामाजिक परिवर्तन आणि साहित्यिक अभिव्यक्ती यांचा परस्परसंबंध या संमेलनातून उलगडणार आहे. 'राजकीय साहित्य', 'साहित्यामधील राजकीय व्यक्तिमत्त्वे', 'राजकीय साहित्य आणि विचारसरणी' अशा विविध विषयांवर व्याख्याने व परिसंवाद आयोजित करण्यात आले आहेत. त्यामुळे साहित्याच्या अंगणातून राजकीय विचारविश्वाकडे पाहण्याची आणि राजकारणातील अनुभवांना साहित्यिक दृष्टिकोनातून समजून घेण्याची संधी रसिकांना मिळणार आहे. संमेलनाच्या प्रमुख पाहुण्यांमध्ये माजी आमदार संजय जगताप तसेच महाराष्ट्र साहित्य परिषद पुणेचे कार्यवाह श्री. सुनील महाजन यांचा समावेश आहे.

याखेरीज श्री. मधुकर भावे, श्री. माधव भंडारी, प्रा. नारायण टाक, डॉ. नाना पवार, प्रा.डॉ. जगदीश शेवते, तर समारोपास श्रीं. फ. मु. शिंदे, रावसाहेब पवार, राजन लाखे, डॉ.पुरूषोत्तम काळे, प्रभाकर आव्हाळ, यांचा सहभाग असणार आहे. संमेलनात शेवटी संवाद पुणें यांच्या वतीने सत्यशोधक महात्मा हा प्रयोग सादर केला जाणार आहे. मसाप सोपाननगर शाखेच्या वतीने डॉ. नानासाहेब पवार, जेजुरी शाखेच्या वतीने डॉ. नारायण टाक, सासवड शाखेच्या वतीने ॲड. दिलीप निरगुडे यांनी निमंत्रण दिले आहे. डॉ. नीलम गोऱ्हे यांचे दीर्घ सार्वजनिक, सामाजिक आणि साहित्यिक क्षेत्रातील योगदान तसेच महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनातील प्रदीर्घ अनुभव या संमेलनाला वैचारिक परिपक्वता देणारा ठरणार आहे. साहित्य, समाज आणि राजकीय विचार यांच्या संगमातून आकार घेणाऱ्या या संमेलनाचा साहित्यप्रेमी आणि विचारवंतांनी आवर्जून आस्वाद घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

नागरिकांनी कचरा करताना स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या कष्टांची जाणीव ठेवावी

- अपर पोलीस आयुक्त राजेश बनसोडे

■ पुणे (दै. संध्या)

गणेशोत्सव आणि विसर्जन मिरवणुकीनंतर शहर स्वच्छ ठेवण्यासाठी काम करणाऱ्या स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या कष्टांची जाणीव प्रत्येकाने ठेवली पाहिजे. आपण किती कचरा करतो, याचे भान असणे आवश्यक असून स्वच्छतेची अपेक्षा ठेवताना स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या कष्टांचा विचार केला पाहिजे, असे मत अपर पोलीस आयुक्त राजेश बनसोडे यांनी व्यक्त केले.

अखिल मंडई मंडळाच्या वतीने गणेशोत्सव आणि विसर्जन मिरवणुकीनंतर शहराची स्वच्छता करणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांचा कृतज्ञता सन्मान सोहळा मंडई जवळील उत्सव मंडपात आयोजित करण्यात आला होता. यावेळी अद्वैत परिवाराचे संस्थापक संतोष डिंबळे, पालिकेचे आरोग्य निरीक्षक मिलिंद खानदोडे, लोकमान्य मल्टिपर्पज को. ऑप सोसायटीचे सहाय्यक क्षेत्रीय प्रबंधक हर्षद झोडगे, अखिल मंडई मंडळाचे अध्यक्ष अण्णा थोरात, खजिनदार संजय मते, सचिव विश्वास भोर, देविदास बहिरट, सामाजिक कार्यकर्ते आनंद सराफ, सूरज थोरात आदी उपस्थित होते. स्वच्छता कर्मचाऱ्यांचा भेटवस्तू, मानाचे उपरणे आणि मिठाई देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमात अद्वैत परिवार संस्थेच्या ११ दिव्यांग कर्तृत्ववान युवकांचा विशेष सन्मान करण्यात आला.

राजेश बनसोडे म्हणाले, अखिल मंडई मंडळातर्फे योग्य लोकांचा सन्मान होत आहे. प्रत्येकाला नागरिक म्हणून स्वच्छतेचे भान असतेच असे नाही. शहर स्वच्छ असावे, अशी अपेक्षा सर्वांची असते; मात्र स्वच्छतेचे कठीण काम स्वच्छता कर्मचारी न चुकता करतात. त्यांच्या कष्टांची जाणीव ठेवणे गरजेचे आहे.

अण्णा थोरात म्हणाले, कष्टकऱ्यांच्या सन्मानाची परंपरा मंडळाच्या वतीने आजतागायत सुरू आहे. विसर्जन मिरवणुकीत रथाच्या मागून स्वच्छता कर्मचारी काम करत असल्याने परिसर लगेच स्वच्छ होतो. या हातांचा सन्मान होणे गरजेचे आहे. त्यामुळे गेल्या ३० वर्षांपासून हा सन्मान सोहळा आयोजित करण्यात येत आहे.

कला-संस्कृती जोपासणाऱ्या कलाकारांच्या सदैव पाठीशी उभा राहू

चंद्रकांत पाटील यांचे मत; ऑल आर्टिस्ट फाऊंडेशन ट्रस्ट संस्थेच्या सिंहगड रस्त्यावर महाराष्ट्र प्रदेश कार्यालयाचे उद्घाटन

■ पुणे (दै. संध्या)

ऑल आर्टिस्ट फाऊंडेशन ट्रस्ट या संस्थेच्या अधिकृत कार्यालयाचे आज उद्घाटन करण्यात आले. महाराष्ट्रातील लावणी, लोकधारा, ऑर्केस्ट्रा, बॅकस्टेज कलाकार, नाटक, एकपात्री प्रयोग आणि चित्रपट क्षेत्रातील कलाकारांच्या पाठीशी उभी राहणारी एक महत्त्वाची सामाजिक संस्था आहे. सहा वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या या संस्थेचे कार्यालय झाल्याने कलाकारांना हक्काची जागा मिळाली आहे. येत्या काळात ही संस्था पुण्याच्या संस्कृतीचा केंद्रबिंदू बनेल, असे मत राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी व्यक्त केले. कला, संस्कृती जोपासणाऱ्या कलाकारांच्या सदैव पाठीशी राहू, असे आश्वासनही त्यांनी दिले.

सिंहगड रोडवरील पानमळा येथील मैथिली सभागृहाच्या आवारात ऑल आर्टिस्ट फाउंडेशन ट्रस्टच्या कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. चंद्रकांत दादा पाटील यांनी आभासी माध्यमाद्वारे यावेळी उपस्थितांशी संवाद साधला. याप्रसंगी नगरसेविका रुपाली धावडे, नगरसेविका मंजूश्री खर्डेकर, भारतीय जनता पक्षाचे प्रवक्ते संदिप खर्डेकर, नगरसेविका वृषाली रिठे, पिंपरी-चिंचवड कलाकार महासंघाचे अध्यक्ष विजयकुमार उलपे, लावणीसम्राज्ञी



सुरेखा पुणेकर, मैथिली स्टुडिओचे मिलिंद माळी, समुत्कर्षच्या मधुरा वैशंपायन व 'ऑल आर्टिस्ट फाऊंडेशन ट्रस्ट'चे अध्यक्ष योगेश सुपेकर उपस्थित होते.

चंद्रकांत पाटील म्हणाले, "आज व्यस्त दिनक्रमामुळे उपस्थित राहू शकलो नाही. मात्र येत्या काही दिवसांत कार्यालयाला निश्चितच भेट देणार आहे. कार्यालय असेल तर कोणतीही संघटना जोमाने काम करु शकते. कार्यालयाशिवाय संघटनेला रुप येत नाही. त्यामुळे ऑल आर्टिस्ट फाऊंडेशन ट्रस्टचे हक्काचे कार्यालय होणे हा संस्थेसाठी अतिशय महत्त्वाचा टप्पा आहे. समुत्कर्षच्या माध्यमातून आपण कलाकारांना स्वस्त दरात चांगले धान्य उपलब्ध करुन देत आहोत, येत्या काळात इतरही कोणती मदत लागली तर त्यासाठी आपण सदैव संस्थेसोबत असू." यावेळी कमी भाडे घेऊन संस्थेला कार्यालय उपलब्ध करुन दिल्याबद्दल मैथिली स्टुडिओचे मिलिंद माळी यांचे विशेष कौतुक केले.

'ऑल आर्टिस्ट फाऊंडेशन ट्रस्ट'चे अध्यक्ष योगेश सुपेकर म्हणाले, "संस्था सुरू होऊन सहा वर्ष झाली. मात्र, संस्थेला कार्यालय नसल्याने हॉटेलमध्ये किंवा इतर कुठेतरी भेटून संस्थेचे काम करावे लागत होते. मात्र आता शहराच्या मध्यवर्ती भागात हक्काची जागा मिळाल्याने संस्था आणखी जोमाने काम करेल. मागील सहा वर्षांत संस्थेने कलाकारांना या संस्थेच्या माध्यमातून सभासदांना खाना ते दवाखाना, शासनाच्या विविध योजना, समुत्कर्ष योजनेचे कार्ड, १० लक्ष रुपयाचे अपघाती विम्याचे वाटप करण्यात आले. कलाकारांच्या कुटुंबियांना अडचणीच्या प्रसंगी मानसिक आधार व अर्थिक सहाय्य देणे, युवा आणि ज्येष्ठ कलाकारांना हक्काचा मंच उपलब्ध करून देणे आणि त्यांना प्रोत्साहन देणे असे कार्य केले आहे. तसेच कलेच्या क्षेत्रात उत्कृष्ट योगदान देणाऱ्या कलावंतांचा 'कलाभूषण' किंवा 'कलादर्पण' यांसारख्या पुरस्कारांनी संस्थेमार्फत गौरव केला जातो. त्यासोबतच संस्था सामाजिक भान राखत समाजासाठीही वेळोवेळी काम करत असते."

रुपाली धावडे, मंजूश्री खर्डेकर, संदिप खर्डेकर यांनी संस्थेला शुभेच्छा देत मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संस्थेचे प्रवक्ते अभय गोखले यांनी केले व आभार अश्विनी कुरपे यांनी मानले. यावेळी संस्थेचे कार्याध्यक्ष बबलू खेडेकर, उपाध्यक्ष गणेश गायकवाड, खजिनदार रशिद शेख, उपखजिनदार राजरत्न पवार, सचिव मनोज माजिरे, उपसचिव अश्विनी कुरपे व विश्वस्त भाविका कुलकर्णी, सोमनाथ फाटके, गणेश मोरे, अमिर शेख व उषा करंबेळकर उपस्थित होते.